


...वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. २०५९१
IRBK-0120591

म. ग्रं. सं. आणि, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०५८९ नों. दि. २/११/५४
वि.

# देवांचं मनोराज्य

वसंत कानेटकर

IRBK-0120591

‘इंद्रायणी साहित्य’

© वसंत
कानेटकर

पहिली आवृत्ती
सप्टेंबर १९५८
दुसरी आवृत्ती
सप्टेंबर १९८४

प्रकाशक :
श्याम दयार्णव कोपर्डेकर
'इंद्रायणी साहित्य'
२७३ शनिवार पेठ, पुणे ३०

मुद्रक :
अजित शशिकान्त देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे - ३०

या नाटकाच्या प्रयोगाचे,
भाषान्तराचे, चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क
सौ. उषा वसन्त कानेटकर, बी. ए., बी. टी.
यांच्या स्वाधीन आहेत.
आगाऊ लेखी परवानगीशिवाय
ह्या नाटकाचा प्रयोग कोणीही करू नये.

परवानगी व परवानगीमूल्य याबद्दल
सौ. उषा वसन्त कानेटकर, बी. ए., बी. टी.
'शिवाई' शरणपूर रोड,
नासिक २. दूरध्वनी : ७३०९२
ह्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ह्या नाटकाचा पहिला प्रयोग 'प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन'ने शनिवार, दिनांक १३ सप्टेंबर, १९५८ रोजी रात्रौ ९ वाजता पुणे येथील भानुविलास नाट्यगृहात सादर केला.

# स्वगत

भोवरा गरगरतो आहे;
आणि माझ्या चिमुकल्या मनात प्रचंड विश्वमालेचे शल्य अजून सलते आहे !
विश्वमाला पिसाटपणे भिरभिरते आहे;
पण कोण्या एका चिमुकल्या ग्रहावर लाखांच्या समुदायात गरगरणाऱ्या मला मात्र भोवळ येत आहे. भोवळ येत आहे; तरीदेखील डोळे गच्च मिटून आणि ओठ घट्ट दाबून कसाबसा तोल सावरीत मी स्वतःभोवती गरागरा गिरक्या घेत आहे.
गिरक्या घेत, संसाराची कड धरून, जनरीतीच्या वर्तुळात बेहोषपणे मी रिंगण घालीत आहे. पण बेहोष झालेल्या मनालाही कधी कधी जाग येते. त्या वेळी आसमंतात वेडे वारे घोंघावू लागतात; विक्षिप्त विचारांचे आणि चमत्कारिक कल्पनांचे अक्राळविक्राळ मेघखंड एकमेकांवर तुटून पडतात; श्रद्धेचे वटवृक्ष-देखील आपली डेरेदार शिरे जमिनीत खोचून मुळांचे तुरे माथ्यावर मिरवू लागतात.
आणि मग युगायुगांची एकच व्यथा उद्दामपणे कल्पनेला, प्रतिभेला आणि प्रज्ञेला आसुडाचे फटके मारीत मला विचारू लागते—
" बोल, तू कोण ? तू कोठून आलास ? कशासाठी अवतरलास ? काय या जीवनातला हेतू ? काय या मरणातला अर्थ ? जीवनाच्या पेल्यात कोणी भरला हा अत्यानंद ? कोणी ओतले त्यात दुःखाचे हलाहल ?
आकाशात दिसणारे हे कोट्यवधी ग्रहगोल कोणत्या अपराधासाठी असे चैतन्य-हीन पडले आहेत ? कोणत्या उःशापासाठी असे एकाकी अवस्थेत खिन्नपणे खाली मान घालून स्वतःभोवती फिरत राहिले आहेत ? चैतन्याचे आणि जीवनानंदाचे चिमुकले ओघळ या पृथ्वीसारख्या एका क्षुद्र ग्रहावरच नेमके

कसे सांडले ? आणि सांडता सांडताच अनंत प्रकारच्या दुःखांची धग लागून जागच्या जागी करपून का गेले ? काळाला अंत नाही; विश्वाला मर्यादा नाही; चराचरात जिकडे नजर फेकावी तिकडे अनंत, अगाध, आणि अमर्याद ! मग या जीवसृष्टीच्या ललाटी तेवढा हा मृत्यू का म्हणून ? बोल, का म्हणून ? का ?...

कडकडून ओढलेल्या आसुडाच्या एकेका फटक्याबरोबर कल्पना सैरावैरा धावू लागते; प्रतिभा कळवळते, प्रज्ञा पांगळी होते;

आणि मग पुन्हा एकदा मला भोवळ येऊ लागते !

भोवरा गरगरतो आहे;

आणि माझ्या चिमुकल्या मनात प्रचंड विश्वमालेचे शल्य अजून सलते आहे !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
प्रा. क्र. २०५७९ नों. दि. २/११/६८
वि. नाटक

# अंक पहिला

[ धूसर प्रकाशात उजळलेले एक भव्य दालन. धूसरतेमुळे रंगरूप अथवा सजावट याबद्दल आरंभी अंदाजच करावा लागत असला तरी जेवढे दिसते आहे त्यावरूनही अपरंपार श्रीमंतीचा आणि चमत्कारिक भव्य प्राचीनतेचा साक्षात्कार झाल्याशिवाय राहात नाही. दोन्ही बाजूंना उंच भिंती, एका भिंतीत उंच कमानीचे आतल्या दालनाकडे नेणारे द्वार, त्यावर मखमलीचा पडदा, त्यापलीकडे प्रचंड वाटोळे नक्षीदार संगमरवरी खांब, दुसऱ्या भिंतीलगत एक बादशाही जिना, जिन्यालगतच्या चौथऱ्यावर उभा राहून अस्मानात घुसलेला एक पिळाचा खांब, दालनाच्या समोर पलीकडच्या कडेला पसरलेला लांबलचक व्हरांडा, व्हरांड्याला नक्षीदार सोनेरी कठडा, त्यापलीकडे पार्श्वभूमीवर दिसणारे निळे निळे आकाश इत्यादिकांच्या रूपरेखा दिसत आहेत. जिन्या-शेजारी एक शिसवीचे कपाट उभे असून त्यांत ग्रंथ आणि ताडपत्रे भरलेली आहेत. दालनाच्या मध्यभागी वाटोळे मेज उभे असून मेजाभोवती तीन सिंहासने ठेवलेली आहेत.

पडदा वर जातो त्या वेळी सर्वत्र सामसूम आहे. नाही म्हणायला दूरवरून कोठे तरी स्त्री-पुरुषांच्या संमिश्र आवाजात प्रार्थना-गायन चालले आहे. उदात्त करुण सुरावटीवरूनच ती प्रार्थना असावी असा तर्क. एरवी प्रत्यक्ष कानावर पडते आहे ती केवळ निःशब्द आलापी. ही आलापी चालली असतानाच मधूनच सामुदायिक रीतीने– "असतो मा सत् गमय। तमसो मा ज्योतिर् गमय। मृत्योर् मा अमृतं गमय" हे सूक्त धीरगंभीरपणे म्हटलेले ऐकू येते.

काही वेळाने पैंजणाची रुमझुम कानी येते. क्षणार्धात लगबगीने लचकत मुरडत विद्युल्लता– एक लावण्यमयी अप्सरा व्हरांड्यातून प्रवेशते. मागे न्याहाळून चाहूल घेत ती कमानीच्या द्वाराकडे जाऊ लागते तोच– " मी काय

सांगतो ते ऐक.... पळू नकोस... घाबरू नकोस... थांब थांब..." असे कोणा तरुण पुरुषाचे खणखणीत शब्द दुरून कानी पडतात. त्याबरोबर विद्युल्लता घाईने मागे वळून जिन्याने अन्तर्धान पावते. तोच "घाबरू नकोस... मी काही तुला ठार मारीत नाही...थांब..." असे ओरडत कॅप्टन प्रियदर्शन कीर्तीकर— नखशिखान्त लष्करी अधिकाऱ्याच्या पोशाखातील एक तरुण घाईघाईत प्रवेशतो. त्याच्या एका हातात पिस्तुल आहे आणि दुसऱ्या हातात टॉर्च आहे. धावत पळत आल्याने तो घामाघूम झाला आहे; त्याला धाप लागली आहे. व्हरांड्यातून आत येताच प्रियदर्शन दचकून थबकतो. दालनाचा अवतार आणि धूसर प्रकाशात उजळणाऱ्या वस्तू बघून तो विस्मित होतो. काबऱ्याबावऱ्या मनःस्थितीत सभोवताली तो पाहू लागतो.

प्रियदर्शनच्या पाठोपाठ आणखी एक व्यक्ती व्हरांड्यात येऊन कठड्या-जवळ उभी राहिलेली आहे. प्रियदर्शनच्या प्रत्येक हालचालीवर या व्यक्तीचे बारीक लक्ष आहे. त्याला मात्र या व्यक्तीच्या अस्तित्वाची जाणीव नसावी. जरा डोळे ताणून पाहिल्यावर या व्यक्तीच्या मस्तकावर बांधलेल्या जटा, गळ्यात अडकविलेली तंबोरी, आणि हातातल्या चिपळ्या दिसणे काही अशक्य नाही.

बघता बघता वर कोठे तरी क्षणार्धच ऐकू आलेल्या पैंजणाच्या रुमझुमीने प्रियदर्शन दचकून भानावर येतो आणि पिस्तुल सावरीत तो जिन्याकडे मोहरा करतो. दोन पायऱ्या तो वर चढला असेल नसेल तोच व्हरांड्यातून चिपळ्या वाजतात आणि तंबोरीच्या तारा झंकारतात. तत्क्षणीच प्रियदर्शन चपळाईने मागे वळून खाली येत टॉर्चचा प्रकाश टाकीत प्रथम घाबरून आणि मग दरडावून ओरडतो—

"क...कोण आहे ? कोण आहे पलीकडे ?"

त्या क्षणीच अचानक रीतीने पडलेल्या एका प्रकाशझोतात, "नारायण... नारायण..." असे उद्‌गारत हसतमुखाने पुढे आलेले नारदमुनी उजळतात, आणि मग— ]

**नारद** : ( हसून ) तुला कोण हवंय ? काय शोधतो आहेस तू इथं ?

**प्रियदर्शन** : ( बावचळून ) मी... मी...

**नारद** : घाबरू नकोस. स्वस्थ चित्तानं सांग ! कोण पाहिजे तुला ?

**प्रियदर्शन** : ( स्वतःला सावरीत ) ती... ती कुठं आहे ?

**नारद** : ती ? ती कोण ?

**प्रियदर्शन** : ती... ती... टपोऱ्या डोळ्यांची, तेजस्वी मुद्रेची, पायात पैंजण छुम-छुमत होते तिच्या. ( सुगावा घेत ) माझ्यासारखा जवानमर्द स्त्रीच्या अंगावर शस्त्र

चालवीत नाही म्हणूनच आज माझ्या पिस्तुलाच्या फैरीतून ती बचावली.

**नारद :** ( खट्याळपणे हसत ) अस्सं ? पण स्त्री म्हणून बचावली की... टपोऱ्या डोळयांची, तेजस्वी मुद्रेची, पायांत पैंजण छुमछुमणारी ती होती म्हणून—

**प्रियदर्शन :** ( गडबडून ) ऊं... ऊं .. काय... काय म्हणालास ?

**नारद :** नाही, तिच्या लावण्यानं तुझं देहभान हरपल्यासारखं दिसलं म्हणून विचारलं !

**प्रियदर्शन :** देहभान ?... ऊं... हो ! मला वाटतं क्षणभर माझं देहभान हरपल्यासारखं झालं. पण तिला अचानक आमच्या छावणीपाशी पाहिली म्हणून मी जरा बावरलो इतकंच. मी काही तिच्यावर भाळलो नाही. आमच्या छावणीतून अशा अपरात्री बर्फाचे पहाड तुडवीत मी तिचा पाठलाग करीत आलो, तो काय—

**नारद :** ( हसून ) पाठलाग करीत की तिच्यामागं घोटाळत ?

**प्रियदर्शन :** ( रागाने ) रणांगणावरील सैनिकांची छावणी, म्हणजे आघुकमाघुकांच्या रंगढंगांचे उद्यान समजलास काय तू ? बोल, कुठं आहे ती ? गिरफदार करून झिंज्या धरून फरफटत नेतो तिला. ( जिन्याकडे जातो ).

**नारद :** मेघांच्या मांडीवर बागडणाऱ्या विद्युल्लतेला गिरफदार करणार ?

**प्रियदर्शन :** ( जिन्याच्या पायरीवर थबकत ) विद्युल्लता ? म्हणजे ? ही विद्युल्लता कोण ?

**नारद :** अशीच एक अप्सरा.

**प्रियदर्शन :** ( जास्तच बुचकळ्यात पडून ) अप्सरा ? अप्सरा ? म्हणजे—

**नारद :** इथल्या सगळयाच अप्सरा टपोऱ्या डोळयांच्या, तेजस्वी मुद्रेच्या आणि पायात पैंजण छुमछुमणाऱ्या असतात.

**प्रियदर्शन :** सगळयाच अप्सरा ? ( काहीसा उमज पडून ) हां हां ! काश्मीरच्या या नंदनवनात हेरगिरी करणाऱ्या असल्या खूप अप्सरा भटकत असतात हे आम्हाला चांगलं ठाऊक आहे, समजलात बोवाजी ? ( जाऊ लागतो ).

**नारद :** पण ही अप्सरा काश्मीरच्या नंदनवनातील नव्हती– !

**प्रियदर्शन :** ( थबकून ) प्रत्यक्ष इंद्राच्या दरबारातली असली म्हणून काय झालं ?

**नारद :** इथल्या अप्सरांचं यौवन कधी कोमेजत नाही की लावण्य मावळत नाही !

**प्रियदर्शन :** ( ओरडून ) पण आमच्या सैनिकांच्या छावणीत अशा अपरात्री असल्या मोहक वेषात ती काय म्हणून ?

**नारद :** ती बिचारी हुकुमाची ताबेदार !

**प्रियदर्शन :** ( दोन पायऱ्या खाली येत, विस्मयाने ) हुकुमाची ताबेदार ? कोणाचा हुकूम ? याचा अर्थ काय ? आम्ही जिंकलेल्या या भूमीवर आमच्या डोळयांदेखत फितुरी ?

**नारद :** माफ करा कॅप्टनसाहेब, ही भूमी अद्याप तरी कोणाही मानवाला जिंकता आलेली नाही.

**प्रियदर्शन** : ( रागानें ) तर मग तूदेखील दुष्मनांचा कैवारी दिसतोस. ( संशयाने न्याहाळतो ).

**नारद** : मी दुष्मनांचा कैवारी ? नारायण... नारायण !

**प्रियदर्शन** : कोण आहेस तू ? बोल ? वेष तर धारण केला आहेस एखाद्या साधूचा, आणि आपल्याच भाईबंदांच्या उरावर ही दगलबाजी ?

**नारद** : कॅप्टनसाहेब, अहो मी मानवांचा पाठीराखा आहे.

**प्रियदर्शन** : ऊं ! मानवाच्या या लंब्याचवड्या गप्पा मलाही कळतात. आमच्या राजधानीत आजकाल असल्याच पायघोळ संतांचा सुळसुळाट झालाय. पण मी काही अशा अवताराला फसणार नाही, समजलांत राजेश्री ? मुकाट्यानं कबूल करा, कोण आहात आपण ? कोणाची आहे ही गढी ? कोण होती ती बया ?

**नारद** : छे छे छे छे ! नारायण नारायण ! अजून तू पुरा भानावर आलेला दिसत नाहीस !

**प्रियदर्शन** : ( पिस्तुल रोखीत, दरडावून ) बऱ्या बोलानं कबूल करून मोकळे होता, की इथल्या इथं गोळी घालून...

**नारद** : कशाला रोखतोस ते चिमुकलं शस्त्र ? असल्या अस्त्राचा इथं काडीमात्र प्रभाव पडणार नाही, समजलास का प्रियदर्शना ?

**प्रियदर्शन** : ( दचकून ) काय ? माझं नावही तुला ठाऊक आहे ? येथपर्यंत फितुरीची मजल गेली ?

**नारद** : हं ! उचल ते पिस्तुल ! झाड माझ्यावर गोळी. ( मोठ्याने हसून ) अरे माझ्यावर झाडायला तुझ्या त्या पिस्तुलात गोळी तरी उरली आहे का ?

**प्रियदर्शन** : ( पिस्तुलाचा चाप ओढतो. पण फक्त खटकन् आवाज होतो. मग पिस्तुलाचा हात खाली घेत ) तर मग तू माझा पाठलागच करीत आलेला दिसतोस. ( सभोवताली बघून किंचित चरकतो. पण उसने अवसान राखीत ) तुझ्या या गढीत मी एकटादुकटा सापडलो आहे म्हणून फार गमजा करू नकोस. दोन हाकांच्या अंतरावर आमच्या छावणीत शेकडो जवान शस्त्रसज्ज आहेत याची याद राख.

**नारद** : ( हसून ) दोन हाकांच्या अंतरावर ?

**प्रियदर्शन** : मग वाटलं काय तुला ? ( व्हरांड्यात जात ) मी नुसती इशारत देण्याचाच काय तो अवकाश, की– ( शिटीला हात घालतो. )

**नारद** : नारायण...नारायण ! राहू दे तुझी इशारत. अरे, तुझे जवान, तुझी छावणी या भूमीपासून शतयोजने दूर राहिली आहेत, समजलास का ?

**प्रियदर्शन** : काय ? काय म्हणालास ?

**नारद** : मी कशाला म्हणायला हवं ? पाहा, नीट डोळे उघडून पाहा. कुठं दिसते आहे का तुझी छावणी ?

[ प्रियदर्शन व्हरांड्यात उभा राहून चौफेर दृष्टी टाकतो. प्रथम कपाळावर

हात लावून आणि मग खांद्याला अडकवलेली दुर्बीण डोळ्यांना लावून तो दूरवर दृष्टिक्षेप टाकतो. मग मात्र तो भयचकित होतो. ]

**प्रियदर्शन** : ( घाबरून ) म्हणजे ? आसमंतात कोणाचा मागमूसदेखील नाही ?... याचा अर्थ ?...मी...मी आलो आहे तरी कोठे ? हे टोलेजंग प्रासाद...हे उत्तुंग सौध, ही रमणीय उद्याने, हे भव्य राजरस्ते...हे...हे...आहे काय गौडबंगाल ? ( मग नारदमुनींकडे वळून विस्मयाने न्याहाळत ) तू...तुम्ही...आपण आहात तरी कोण ?

**नारद** : भानावर आलास ? नारायण ! नारायण ! मी कोण तुझा शत्रू नव्हे.

**प्रियदर्शन** : ( गोंधळून ) खरंच...मला काहीच समजेनासं झालंय. ही ही गढी... नव्हे हा किल्ला...नाही नाही...ही नगरी...आपण कोण आहांत साधूमहाराज ?

**नारद** : ( मोठ्याने हसून ) साधूमहाराज ? मला ओळखलं नाहीस अजून ?

**प्रियदर्शन** : नाही...मी नाही ओळखलं. कुठं तरी पाहिल्यासारखं...

**नारद** : नारायण ! नारायण ! छे छे ! या कलियुगात माणसानं देवधर्मावर तुळशीपत्र सोडलं असं ऐकत होतो आजवर, ते काही खोटं दिसत नाही.

**प्रियदर्शन** : तसं नव्हे...पण...मला वाटतं...होय नक्कीच. कोठल्या तरी चित्रपटात—

**नारद** : ( मोठ्याने हसून ) चित्रपटात ! चित्रपटात पाहिलंस तू मला ? ( खळखळून हसतात. ) प्रथम तू मला हेर समजलास. मग केलंस साधूमहाराज, आणि आता तर चक्क—

**प्रियदर्शन** : नाही म्हणजे...खरंच—

**नारद** : अरे, त्रिखंडात संचार करणाऱ्या या नारदाला तू ओळखलं नाहीस ? नारायण ! नारायण !

**प्रियदर्शन** : ( ते ऐकताक्षणीच थक्क होऊन हातातील बॅटरी आणि पिस्तुल गळून पडतात. ) काय ? आपण ?...आपण नारदमुनी ? नारदमुनी ? म्हणजे ते...ते ते ? पण कसं शक्य आहे ?

**नारद** : का ? त्यात तुला एवढं अशक्य काय वाटलं ?

**प्रियदर्शन** : नाही पण...म्हणजे नारदमुनी इथं कसे ?

**नारद** : अरे नारदाचा वास या स्वर्गलोकात असायचा नाही तर कुठं पाताळात ?

[विविध रंगी प्रकाशझोताने रंगभूमी उजळते. प्रियदर्शन सभोवताली बघू लागतो.]

**प्रियदर्शन** : ते खरं...पण...( एकदम उमज पडून ) आ ? काय, काय म्हणालात ? म्हणजे हा...हा...हा...

**नारद** : हा काय ?

**प्रियदर्शन** : दिसतो आहे तो हा सगळा मृत्युलोक नव्हे ?

**नारद** : ऊं हू !

**प्रियदर्शन** : ( मटकन् खुर्चीवर बसून ) हा हा स्वर्गलोक ! म्हणजे मी...मी...

**नारद :** घाबरू नकोस. तुझा मृत्युयोग अद्याप काही समीप आलेला नाही. उगाच किंचित काळ...

**प्रियदर्शन :** (अधीरतेने) 'उगाच किंचित काळ' काय ?

**नारद :** जरा शुद्ध गेल्यासारखी...

**प्रियदर्शन :** म्हणजे मी बेशुद्ध पडलो की काय ?

**नारद :** तू नव्हे...तुझा देह. पण—

**प्रियदर्शन :** माझा देह ? माझा देह ? (स्वतःकडे विस्मयाने बघत) मग हा...हा मी आहे तरी कोण ?

**नारद :** (हसून) नारायण ! नारायण ! तुम्हा मानवांना देह आणि आत्मा यांची गल्लत करायची भारी खोड !

**प्रियदर्शन :** (तसाच स्वतःकडे अचंब्याने बघत) आय सी ! म्हणजे....म्हणजे... हा माझा आत्मा तर ?

**नारद :** हा– म्हणजे प्रत्यक्ष, खरा खरा तू.

**प्रियदर्शन :** आणि तो तो—

**नारद :** मृत्युलोकावर आहे तो तुझा देह. तोही सुरक्षित आहे. तुला काळजीचं मुळीच कारण नाही, समजलास !

**प्रियदर्शन :** मृत्यूला मी घाबरतो असं नाही. पण... (पुन्हा सभोवताली बघत) आश्चर्य आहे !

**नारद :** आश्चर्य कसलं ?

**प्रियदर्शन :** म्हणजे, मेल्याशिवाय माणसाला स्वर्ग दिसत नाही म्हणतात आणि—

**नारद :** आणि मेल्यावरही माणसाला हा स्वर्ग पाहण्याचं भाग्य कधीच लाभत नाही.

**प्रियदर्शन :** म्हणजे ?

**नारद :** (खोचकपणे) देवांचा स्वर्ग आहे हा !

**प्रियदर्शन :** देवांचा स्वर्ग ? म्हणजे–मी नाही समजलो ? देवांचा स्वर्ग काही वेगळाच असतो का ?

**नारद :** (हसतात) नारायण ! नारायण ! फार मोठ्या प्रश्नाला एकदम हात घातलास तू. पण हळूहळू एकेका भ्रमातून तू जागा होत चालला आहेस हे काही थोडं नाही.

[तेवढ्यात छुम् छुम् पैंजणांचा आवाज येतो आणि जिन्यांतून घाबऱ्या घाबऱ्या विद्युल्लता प्रवेश करते.]

**नारद :** ही आली तुझी विद्युल्लता. हिलाच गिरफदार करणार होतास ना तू ?

**विद्युल्लता :** (घाबऱ्या घाबऱ्या) मुनिवर्य—

**प्रियदर्शन :** (तिला पाहताच थक्क होऊन) ही ही विद्युल्लता ? अहो ही तर...

**विद्युल्लता :** (अधीरतेने) त्वरा करा मुनिवर्य, ते दोघे इकडेच येताहेत.

**नारद :** (चमकून) कोण दोघे ?

**विद्युल्लता :** मदनदेव आणि वरुणराज.

**नारद :** मदन आणि वरुण? हा घोटाळा कसा झाला? या वेळी ते इथं कसे आले? ही काही कार्यालयाची वेळ नाही?

**विद्युल्लता :** तेच मला कळत नाही. आपण आतल्या दालनात...

**नारद :** अमृतोत्सवात सगळे देव दंग झाले आहेत असं तर तू म्हणाली होतीस...?

**विद्युल्लता :** प्रत्यक्ष डोळ्यानंच बघून आले होते मी. महादेव आणि ब्रह्मदेव जातीनं उपस्थित होते. साक्षात् भगवंतदेखील या महोत्सवात भाग घेण्यासाठी निघाले होते.

**नारद :** मग मध्येच काय ही भानगड निघाली? (व्हरांड्यापाशी जाऊन बघतात.)

**विद्युल्लता :** (घाबरून) भगवंतांना आपल्या बेताचा सुगावा तर लागला नाही ना?

**नारद :** शक्यच नाही.

**विद्युल्लता :** देवांची आज्ञा मोडून मी एका मानवाला देवांच्या स्वर्गात घेऊन आले असा कोणाला नुसता संशय आला तरी... (अंग शहारते.) नको ग बाई!

**नारद :** भिऊ नकोस. मी तुझं रक्षण करीन. माझ्या आज्ञेवरूनच ना तू—

**विद्युल्लता :** त्वरा करा मुनिवर्य. ते पाहा, इकडेच वळले.

**नारद :** ठीक आहे. मी याला घेऊन आतल्या दालनात थांबतो. त्या दोघांना तुला परस्पर पिटाळून लावता आलं तर पाहा. आणि हे बघ, ती विश्वरहस्याची पोथी—

**विद्युल्लता :** आतल्या दालनात ठेवलेली आहे काढून.

**नारद :** चला कॅप्टनसाहेब—

[ इतका वेळ विस्मयचकित होऊन प्रियदर्शन विद्युल्लतेच्या मुखाकडे टक लावून बघतच राहिला आहे. ]

**प्रियदर्शन :** (प्रक्षोभाने) अहो ही...ही

**नारद :** ही ही काय?

**विद्युल्लता :** त्वरा करा ना मुनिवर्य?

**प्रियदर्शन :** अहो, ही तर नंदिनी.

**नारद**
**विद्युल्लता** } (परस्परांकडे विस्मयाने बघत) नंदिनी? कोण नंदिनी?

**प्रियदर्शन :** नंदिनी! माझी बायको—

**विद्युल्लता :** अय्या—!

**नारद :** बायको? (तिच्याकडे सार्थ कटाक्ष टाकीत) पाहिलंस ना विद्युल्लते? शाबास कॅप्टनसाहेब! स्वर्गात पाऊल पडायच्या आधीच सोयरीक पटवून मोकळे झालात का?

**प्रियदर्शन :** नाही— अहो खरंच...

[ तेवढ्यात बाहेरून मदन आणि वरुण तणतणत येत असल्याची चाहूल लागते. त्याबरोबर प्रियदर्शनाच्या दंडाला धरून नारदमुनी त्याला आत ओढून घेऊन

जातात. जाता जाताही तो मागे मान मुरडून तिच्याकडे बघत बघत जातो. तोच वरुण व मदन प्रवेशतात.

मदनाकडे पाहताच स्वारी दिसण्यात गुलजार आणि स्वभावाने उतावळी असावी असा ग्रह होतो. तर वरुणराज शरीराने जसे ऐसपैस तसेच हालचालीत सुस्त आणि कामकाजात ढिले, थोडे अजागळच असावेत असे वाटते. ]

**मदन :** ( तावातावाने ) वरुणराज, तुम्ही काहीएक सांगू नका. तुमचा नेहमीचा गोंधळ आहे हा.

**वरुण :** ( शरमिंदेपणाने ) तसं नव्हे मदनदेवा. या वर्षी झाला थोडासा घोटाळा—कबूल. पण—

**मदन :** ( उसळून ) या वर्षी ? दर वर्षाची रड आहे ही तुमची. या वर्षी काय सूर्यदेवांच्याकडून वेळेवर मेघांचा पुरवठा झाला नाही, पुढल्या वर्षी काय वादळाची दिशा चुकली—नाना तऱ्हेच्या सबबी मात्र चांगल्या सांगता येतात तुम्हाला !

**वरुण :** अहो सबबी नव्हेत त्या—

**मदन :** कधी वेळापत्रकात लिहून दिल्याप्रमाणं पाऊस पडला आहे असं आठवतंय का तुम्हाला ?

**वरुण :** का बरं ?

**मदन :** का बरं ? श्रावणात पर्जन्यवृष्टी करा म्हटलं की फाल्गुनात चार शिंतोडे टाकता आणि पूर्वेकडे मेघ धाडा म्हटलं की पश्चिमेच्या आकाशात गडगडाट करून धमाल उडवून देता. हा तर तुमचा कामाचा उरक !

**वरुण :** कबूल आहे, पण माझं म्हणणं तरी ऐकाल का—

**मदन :** काय ऐकायचं आहे ? वातावरणात केवढे घोटाळे माजले आहेत तुमच्या गलथानपणामुळं याची काही कल्पना आहे तुम्हाला ?

**वरुण :** मागचं झालं ते झालं. पण या वर्षापासून बघाल तुम्ही.

**मदन :** काय, काय बघाल ?

**वरुण :** अगदी नक्षत्रावर पाऊस पाडण्याची योजना आखून ठेवलीय आम्ही पहिल्यापासून. हे पाहा, दाखवतोच तुम्हाला— ( अजागळपणे हातातल्या फाइली धुंडाळू लागतो. )

**मदन :** हो — म्हणजे वेळापत्रकावर ? होय ना ? तशी वेळापत्रकाची हातचलाखी करण्यात आपण मोठे तरबेज आहात. आमचा संबंध आहे जन्ममरणाशी, आहे ठाऊक ? जरा घोटाळा झाला की वरपर्यंत पांचजन्य ! खाङकन् जाळून भस्मसात् करण्याची भाषा.

[ असे बोलत मदन शेल्फमधील काही ग्रंथ आणि कपाटातील काही ताडपत्रे नीट व्यवस्थेने मांडून ठेवू लागतो.]

**विद्युल्लता :** ( पुढे होऊन ) मी आपल्याला मदत करू का मदनदेवा ?

**मदन :** ( तीव्र कटाक्ष टाकीत ) नको ! ( कागदपत्रांच्या फाइली धुंडाळणाऱ्या वरुणाकडे बोट दाखवीत ) हे आपलं खातं नीट सांभाळा म्हणजे उपकार होतील.

**वरुण :** ( मान वर करून तिला पाहून विस्मयाने ) म्हणजे ? विद्युल्लता ? तू इथं कशी ? अग इंद्राच्या दरबारात केवढा अमृतमहोत्सव उसळलाय आणि तू—

**विद्युल्लता :** पण या अमृतमहोत्सवात भाग घ्यायला आपल्या खात्याला सवड नाही असं आज्ञापत्र आपणच काल काढलं होतं, नाही का ?

**वरुण :** ( डोके खाजवीत ) अरेच्या...म्हणजे...

**मदन :** त्याची स्वतःला आठवण असेल तर ना ? स्वारी खुशाल अप्सरांचा घोळका घेऊन अमृताचे पेले झोकण्यात गर्क झाली होती. शेवटी मला जाऊन ओढून आणावं लागलं या महाराजांना.

**वरुण :** ( एकदम आठवून ) अग हो— मेघांच्या पखाली कुठं आहेत ?

**विद्युल्लता :** महाराज, मेघांचा कारखानाच सूर्यदेवांनी बंद केला आजपासून.

**वरुण :** मेघांचा कारखाना बंद केला ? का म्हणून ? महासागर आटले बिटले की काय ?

**विद्युल्लता :** संहारखात्याकडून सूर्यदेवांना तसं आज्ञापत्र गेलंय म्हणे !

**वरुण :** संहारखात्याकडून आज्ञापत्र ? मग काय आमचं बोलणंच खुटलं. पाहिलंत मदनदेवा ? मेघांचा पुरवठाच झाला नाही तर आता आम्ही काय आकाशात जाऊन नुसती गर्जना करणार ? ( चुकचुकत ) अरे, पण नतद्रष्टांनो, आज पूर्वेकडे पर्जन्यवृष्टी ठेवली होती रे ? (फाइलीतून वेळापत्रक काढीत) हो— हे काय चक्क "मुसळधार वृष्टी" असं म्हटलंय इथं ?

**विद्युल्लता :** शिलकेतले चार मेघ होते तेवढे पाठवले.

**वरुण :** चारच ? चारांनी काय सडासंमार्जन का करणार आहेस ? आणि काय ग, परवा तर कोठारात शंभरांची रास भरलेली पाहिली मी ?

**विद्युल्लता :** पण ती पश्चिमेकडे रिकामी झाली नाही का ?

**मदन :** ( भडकून ) छा ऽ न ! म्हणजे या वर्षीदेखील पूर्वेकडे पाण्याचा टिपूस नाही ना ? चांगला कारभार चाललाय आपल्या खात्याचा ! म्हणजे या वर्षीदेखील दुष्काळ पडणार; अन्नपाण्यावाचून हजारो माणसं मरणार; आणि जन्ममृत्यूचं प्रमाण बरोबर राहिलं नाही म्हणून ब्रह्मदेवांचे शाप मात्र आम्हाला.

**वरुण :** शांत व्हा मदनदेवा, शांत व्हा— ( असे म्हणत ऐसपैस बैठक मारून बसलेले हे वरुणराज खिशांतून जरतारी चंची काढून पान तयार करू लागतात.

**मदन :** शांत काय व्हा ? भगवंत आज किती कोपायमान झाले आहेत याची तुम्हाला काही कल्पना आहे ?

**विद्युल्लता :** ( घाबरून ) भगवंत कोपायमान झाले आहेत ?

**मदन :** कोपायमान होतील नाही तर काय ? सगळे वृत्तांत त्यांच्या कानावर गेले

आहेत, समजलात !

**विद्युल्लता :** सगळे वृत्तांत ?

**वरुण :** ( थंडपणाने ) होईनात का भगवंत कोपायमान ? काही म्हणालात तरी आपलं काम अगदी लख्ख आहे. हो. आता संहारखात्यानंच हुकूम देऊन आमचा पुरवठाच बंद पाडला त्याला आमचा काय इलाज ? ' नका पाडू पाऊस ' म्हटलंत, राहिलं ! मेली हजारो माणसं तर मेली ! आमचं काय ? खरं की नाही ? खरं सांगू का मदनदेवा, आता आतल्या गोष्टी आम्ही बोलू नये, पण महादेवांत आणि ब्रह्मदेवांत पूर्वीसारखं सहकार्य राहिलं नाही.

**मदन :** म्हणूनच भगवंतांनी ऐन वेळी अमृतमहोत्सवाला येण्याचा बेत रद्द केला. आत्ताच्या आत्ता ब्रह्मदेवांना आणि महादेवांना खास बैठकीसाठी आदेश सुटला आहे आदेश, समजलांत ?

**विद्युल्लता :** ( घाबरून ) खास बैठक ? कुठं होणार ही बैठक ?

**मदन :** कुठं म्हणजे ? इथं— कार्यालयात !

**विद्युल्लता :** अग बाई, इथं ?

**मदन :** मग ? या वेळी मी इथं काय शिळोप्याच्या गप्पा मारायला आलोय असं समजलीस तू ? ( आदळ आपट करीत ) एक काम धड नाही ! कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही !

**वरुण :** हे मात्र लाख बोललात ! घ्या, तांबूल तरी घ्या मदनदेवा ?

**मदन :** घ्या, चघळा तुम्हीच !

**वरुण :** अहो घ्या हो ? ( मदन तांबूल घेऊन तोंडांत घालतो. ) हं, आता कसं ! अहो, आपल्या डोक्याला ताप करून काय होणार आहे मदनदेवा ? बड्यांचं सगळंच बडं ! बोलून चालून हा स्वर्गलोकचा कारभार. कामाची कोष्टकं भरली म्हणजे आपण सुटलो. चाललंय ते ठीक आहे झालं. संहारखात्याचं एक आज्ञापत्र की लगोलग त्याच्या विरुद्ध दुसरं आज्ञापत्र सृजनखात्याचं ! कामं करणाऱ्यांनी काय डोकी फोडायची ?

**मदन :** ( मेज धुंडाळीत ) विश्वरहस्याची पोथी काय झाली ?

**विद्युल्लता :** ( चमकून ) मला वाटतं मघाशी मी त्या पलीकडच्या दालनात पाहिली होती.

**मदन :** पलीकडच्या दालनात ? तिथं कशी गेली ही पोथी ?

**विद्युल्लता :** मला काय माहीत ?

**मदन :** मी तर या मेजाच्या खणात ठेवली होती. ( एकदम नाक फेंदारीत ) काय हो वरुणराज, तुम्हाला कसला वास नाही का आला ?

**वरुण :** ( दचकून ) वास ? हा आला आला खरा. ( हुंगत ) आहाहा—

**मदन :** अहो, वास म्हणजे दर्प, सुगंध नव्हे ?

**वरुण :** ( सावरून गडबडीने नाक फेंदारीत ) हो हो, म्हणजे मी तेच विचारणार

होतो की—
**विद्युल्लता :** ( गडबडीने ) मला वाटतं ब्रह्मदेवांनी सूर्यास्तापूर्वी संदर्भासाठी नेली होती ती पोथी.
**मदन :** ( विस्मयाने ) संदर्भासाठी ?
**विद्युल्लता :** घेऊन येते हं मी ती पोथी. ( असे म्हणून लगबगीने जाते. )
**मदन :** हा हा– त्या निवेदनाच्या प्रकरणात–
**वरुण :** निवेदन कसलं ?
**मदन :** ते हो–पृथ्वीवर चाललेल्या प्रयोगाबद्दल मानवाचं भवितव्य ठरायची वेळ आलीय ना ?
**वरुण :** ते काय आता ठरल्यासारखंच आहे !
**मदन :** तुम्हाला लागला वाटतं काही सुगावा ? भोळे सांब बोलले असतील काही तुमच्यापाशी ? महादेवांनीदेखील काही निवेदन सादर केलंय असं ऐकतो, वरुणराज ?
**वरुण :** महादेव कशाला येताहेत आम्हाला सांगायला. आमची आपली कार्यालयांतील वार्ता !
**मदन :** ( उत्सुकतेने ) काय, काय वार्ता आहे ?
**वरुण :** कसचं काय नि कसचं काय ! महादेवांनी साफ कळवून टाकलंय की हा प्रयोग सपशेल फसला आहे !
**मदन :** प्रयोग सपशेल फसला असं कळवलं महादेवांनी ?
**वरुण :** मग काय ? अहो मुळात भगवंतांच्याच डोक्यात या जीवसृष्टीबद्दल स्पष्ट कल्पना नाही, त्याला महादेव तरी किती सावरणार ? आणि ब्रह्मदेव तरी किती ठेपे देणार ?
**मदन :** ते काही खोटं नाही. एवढी अगडबंब विश्वमाला निर्माण करून ठेवलीय, पण—
**वरुण :** नाही, या विश्वमालेमुळे काही फारसं बिघडत नाही. अनंत आकाशात रिकामे लहानमोठे गोल गरगरा फिरताहेत, फिरू द्या ! तेवढीच देवांच्या मुलाबाळांना मौज ! पण हे सगळे ग्रहगोल, सगळे बरं का, वातावरणांनी भरायचे म्हणजे काय तोंडच्या गप्पा आहेत ? आणि ते म्हणे मानवांना वसतीसाठी द्यायचे ? काय न्याय आहे पाहा ?
**मदन :** हा पृथ्वीवरला एकच प्रयोग सांभाळता सांभाळता समस्त देववृंदांची त्रेधा उडालीय आणि म्हणे हे सगळे वसतीसाठी सिद्ध करायचे !
**वरुण :** पाहा ना ? नाही, मी विचारतो हा मानव कोण ? भगवंतांनी निर्माण केली म्हणून काय देवांनी का हाडांची काडं करायची या जीवसृष्टीसाठी ? बघायला गेलं तर मानवाचा हा टिचभर देह ! पण आवाका केवढा ? जंतू तो जंतू ! त्याला हातपाय लावा नाही तर खांद्यावर डोकं चढवा. अहो, जंतू तो जंतूच !
**मदन :** पण महादेवांनी आपल्या निवेदनात सुचवलंय तरी काय मग ?

**वरुण :** सुचवाचंय काय ? त्यांनी चक्क सांगितलंय की पृथ्वीवर प्रळय करा आणि हा प्रयोग आता कायमचा निकालात काढा.

**मदन :** प्रळय करून ?

**वरुण :** हो मग ? महादेवांचा तडाका आहे तो. वाटलं काय ? तेवढ्यासाठी भारीतली भारी अग्न्यस्त्रंसुद्धा मानवाच्या हाती संहारखात्यानं देऊन टाकली.

**मदन :** खरंच ?

**वरुण :** आता भगवंतांची अनुज्ञा आली की देणार युद्धाचा धुमधडाका उडवून ! दोन दणक्यांत पृथ्वी पार सप्पा ! मागमूसदेखील राहणार नाही.

**मदन :** पण असला अतिरेकी कारभार भगवंतांना मुळीच रुचणार नाही.

**वरुण :** नाही तर नाही ! सांभाळा तुमचं तुम्हीच हे...हे...हे...हे ! आमचे महाराज काही तुमच्या ब्रह्मदेव महाराजांच्यासारखे भगवंताच्या पुढे पुढे करणारे नाहीत. हो, मानवांची असली खरकटी काढण्याची इथं कोणाला आलीय हौस ? आम्ही चाल्लो कैलासावर.

[ तेवढ्यात विद्युल्लता मखमाली बास्तानात गुंडाळलेली पोथी घेऊन येते. ]

**मदन :** इतका वेळ का लागला ?

**विद्युल्लता :** ( चाचरत ) वेळ ? ऊं... ऊं... कुठं काय...?

**मदन :** ( एकदम नाक फेंदारीत ) काय उग्र दर्प आला एकदम.

**वरुण :** अरारारा ! आला खरा. कोणा मानवी आत्म्याचा—

**विद्युल्लता :** छे छे, इथं कुठला आलाय मानव ?

**मदन :** नाही आपली... उगाच शंका आली एक. पण...

**वरुण :** ते काही सांगू नका हं ! भगवंतांच्या कृपेचा ओघ जर का वळला तर या स्वर्गात, तुमच्या आमच्या उरावर, मानवी आत्म्यांचा सुळसुळाट व्हायला वेळ लागायचा नाही.

**मदन :** देवांच्या स्वर्गात मानवी आत्मे ? सगळा देववृंद बंड करून उठेल भगवंतांच्या विरुद्ध, आहे ठाऊक ?

**वरुण :** भगवंतांच्या विरुद्ध आणि बंड ? मदनदेवा, अमृताची धुंदी अजून उतरलेली दिसत नाही तुमची ! बाकी अमृत म्हणजे महाराजा...( असे म्हणत सुरईतील अमृत पेल्यात ओतून ओठाला लावतो. )

**मदन :** पुरे पुरे. आता आपलं अमृतपुराण ऐकायची इच्छा नाही. ( मांडामांडीचा अंदाज घेत ) बैठकीची सिद्धता तर झाली ?

**वरुण :** हो हो, झाली आहे, झाली आहे ! मग आता काय आज्ञा आहे, बोला ?

**मदन :** वरुणराज, तुम्ही महादेवांना निरोप द्या, मी ब्रह्मदेवांना घेऊन येतो. भगवंतांच्याकडे...

**वरुण :** म्हणजे ? इतक्यात उठायचं इथून ?

**विद्युल्लता** : मी भगवंतांना घेऊन येऊ का ?

**वरुण** : हं, जा जा जा ! हेच हेच ते ! तुम्ही अप्सरा म्हणजे अशा आहात— भगवंतांच्या पुढे पुढे करायची एकदेखील संधी गमावू नका. पूर्वेच्या पावसाचा सगळा बट्ट्याबोळ केलात—

**विद्युल्लता** : माझं काय चुकलं त्यात महाराज ?

**मदन** : पुरे पुरे, जा तू भगवंतांना घेऊन ये. भगवंतांच्या रथाची सिद्धता झाली आहे की नाही ते तुला जातीनं बघायला हवं हं.

**विद्युल्लता** : जशी आपली आज्ञा– ( अभिवादन करून आतल्या दालनाच्या दाराकडे जाता जाता सार्थ दृष्टिक्षेप टाकून निघून जाते. )

**मदन** : उठा वरुणराज. आता विलंब कराल तर मात्र—

**वरुण** : ( पसारा आवरीत ) उठतो बाबा. करता काय ? ताबेदारी पत्करली आहे ना ? ( जाऊ लागतो. )

**मदन** : ( ओरडून, जाणाऱ्या वरुणराजांना ) आणि हे पाहा, काही मेघांच्या पखाली शिल्लक असल्या तर पूर्वेकडे या थोड्याशा रवाना करून—

**वरुण** : ( व्हरांड्यातून ) अहो असल्या शिल्लक तर माझ्या अभ्यंगस्नानासाठी का मी वापरणार आहे ?

**मदन** : तसं नव्हे, वसंतऋतू जवळ आलाय. पीकपाण्याचं राहिलं. पण आमच्या उद्यानातल्या लतावेली तरी भिजवाल ?

[ वरुणराज पुटपुटत जातात. मदन स्वतःशीच गुणगुणत मखमाली बास्तानातील पोथी झटकून नीट टेबलावर मध्यभागी ठेवतो आणि मग चौफेर नजर टाकीत पुन्हा एकदा नाक फेंदारीत संशयाने सभोवताली पाहात निघून जातो. मदनाची पाठ वळताच प्रियदर्शन त्वेषाने प्रवेशतो आणि मदनाच्या पाठोपाठ व्हरांड्यापर्यंत जाऊन तो गेलेल्या दिशेकडे बघत राहतो. तोच नारदमुनी प्रवेशतात. ]

**नारद** : नारायण...नारायण ! पाहिलंस ? असा आहे हा इथला एकूण मामला. पटली खात्री ?

**प्रियदर्शन** : होय, स्वतःच्या डोळ्यानं पाहिलं आणि कानानं ऐकलं, तेव्हा विश्वास ठेवलाच पाहिजे. (करुण हसून ) हूं ! वेड्यासारखे आम्ही या असल्या देवांना आमचे तारक मानून त्यांची पूजा करीत आलो आहोत आजवर.

**नारद** : युगानुयुगे पाहातच आलो आहे ना मी ते ? ती देवांची भव्य मंदिरे, त्या पूजाअर्चा, ते नामसंकीर्तन, उत्सव, तपश्चर्या, उपासतापास, व्रतवैकल्यं—

**प्रियदर्शन** : हजारो साधुसंतांनी या देवभक्तीपायी राखरांगोळी केली आपल्या आयुष्याची. त्या देवांच्या मनात मानवाबद्दल इतका जळजळीत द्वेष ?

**नारद** : ते आता तूच पाहा म्हणजे झालं. देवांच्या वास्तव्याला हा असला थाटा-

माटाचा अमर्याद स्वर्ग—

**प्रियदर्शन :** आणि मानवांच्या वाट्याला मात्र पृथ्वीचा वीतभर तुकडा.

**नारद :** देवांना अमरत्व—

**प्रियदर्शन :** आणि मानवांना क्षणभंगुरत्व—

**नारद :** समस्त देववृंदांना चिरतारुण्याचं वरदान—

**प्रियदर्शन :** आणि मानवांना वार्धक्याचा शाप—

**नारद :** अशी आहे ही देवांची कारवाई.

**प्रियदर्शन :** पण साक्षात् भगवंतांनीदेखील या कारवाईला उघड्या डोळ्यांनी मान्यता द्यावी ?

**नारद :** एकटे भगवंत काय करणार ? असल्या देवांच्या गराड्यात सापडले आहेत आमचे ब्रह्मांडनायक भगवंत, समजलास ! अरे, थोर मनाचे आणि दिलदार अन्तःकरणाचे प्रत्यक्ष देवाधिदेव झाले म्हणून काय झालं ? सत्तेच्या सिंहासनावर साधुत्व जरी आरूढ झालं तरी अखेर विसं झडत जाणार साधुत्वाचीच.

**प्रियदर्शन :** मला वाईट वाटतं ते आम्हा दुर्दैवी मानवांबद्दल. देवांच्या या प्रचंड कारवाईची कल्पना आजपर्यंत एकाही ज्ञानवंताच्या बुद्धीला आकलन झाली नाही याचं मला आश्चर्य वाटतं. इतक्या थोर साधुसंतांना भगवंतांचं साक्षात् दर्शन घडलं पण—

**नारद :** साधुसंत बिचारे भोळेभाबडे— सरळमार्गी.

**प्रियदर्शन :** साधुसंत सोडा, पण मुनिवर्य, देवांनी मानवापासून लपवून ठेवलेल्या या विश्वरहस्याचा शोध एखाद्या शास्त्रज्ञाच्या बुद्धीला किंवा विचारवंताच्या प्रज्ञेला लागला असता तरी—

**नारद :** असल्या पोकळ पंडितांचे देव्हारे माजवावेत तुम्ही मानवांनीच.

**प्रियदर्शन :** म्हणजे ? आमच्या शास्त्रज्ञांना आणि विचारवंतांना ‘ पोकळ पंडित ’ समजता आपण मुनिवर्य ?

**नारद :** होय ! अरे तुमच्या शास्त्रज्ञांना आणि विचारवंतांना हवा आहे कुठं विश्व-रहस्याचा शोध ? विश्व उद्ध्वस्त करायला निघालेल्या शास्त्रज्ञांना कधी तरी विश्वरहस्य गवसेल का ? आणि गवसून त्याचा उपयोग काय ? साधुत्वाची साधना केल्याखेरीज महापंडितांनादेखील विश्वरहस्य समजणार नाही. नुसत्या पांडित्याचा तिथं काहीएक उपयोग नाही.

**प्रियदर्शन :** पण मुनिवर्य, एक शंका विचारू का ?

**नारद :** कसली शंका—?

**प्रियदर्शन :** नाही म्हणजे...विश्वरहस्य समजण्यासाठी माणूस पूर्णतेला पोचलाच पाहिजे असं भगवंतांनादेखील वाटतं का ?

**नारद :** ( चमकून ) ऊंऽऽऽ ? काय म्हणालास ?

**प्रियदर्शन :** नाही म्हणजे...माणसाच्या साधुत्वाचा आणि अमरत्व म्हणा, चिर तारुण्य म्हणा किंवा मानवाच्या वसाहतीसाठी ग्रहोपग्रह खुले होण्याची बाबत म्हणा, यांचा तसा काही संबंध नाही. म्हणजे मोठमोठे तत्त्ववेत्ते म्हणतात असं म्हणून विचारलं...

**नारद :** हूं ऽऽऽ ! विचारलास भलता प्रश्न. भलभलत्या चौकशा करणार नाही तो मानव कसला ?

**प्रियदर्शन :** तसं नव्हे मुनिवर्य, पण...

**नारद :** मला वाटत होतं की तुझ्यासारखा सैन्यातला शिपाईगडी तरी शंका विचारीत बसत नाही; तो फक्त आज्ञापालन जाणतो. पण...

**प्रियदर्शन :** (विस्मयाने) शिपाईगडी ? म्हणजे शिपाईगडी म्हणून का तुम्ही माझी या कामगिरीसाठी निवड केलीत ?

**नारद :** अर्थात्. येऱ्या गबाळाचे हे कामच नव्हे. मुकाबला आहे देवांशी. मार म्हटलं की डुक्कर-मुसंडी मारून कोणी काम फत्ते करील तर तो तुझ्यासारखा रांगडा सैनिकच करील !

**प्रियदर्शन :** आम्हा मानवावर तुमचे अनंत उपकार आहेत मुनिवर्य.

**नारद :** वत्सा, यात उपकार कसले ? कर्तेकरविते सारे तुमचे तुम्हीच आहात !

**प्रियदर्शन :** तरीदेखील हे विश्वरहस्य आपण माझ्यासारख्याच्या हाती दिलंत म्हणून तर—

**नारद :** पुन्हा तेच ! अरे, या विश्वरहस्याचा उगमदेखील तुझ्याच जाणिवेत आहे. तुला जे अस्फुटपणे जाणवलं ते मी आज स्पष्टपणे तुला दाखवलं, इतकंच.

**प्रियदर्शन :** मला निघायला हवं आता मुनिवर्य—!

**नारद :** होय, देवाधिदेव इथं येऊन पोचण्यापूर्वी तुला स्वर्गापार झालंच पाहिजे. मी जे जे सांगितलं ते नीट ध्यानात ठेव. पूर्णतेची बीजं आहेत प्रत्येक माणसात. ती कौशल्यानं फुलवली पाहिजेत, अध:पतनापासून दक्षतेनं वाचवली पाहिजेत. मग मानवांचा उज्ज्वल काल काही फार दूर नाही. मात्र थोडी जरी गफलत झाली...

**प्रियदर्शन :** त्याबद्दल निश्चित असा आपण. आपला प्रत्येक शब्द न् शब्द अन्तःकरणावर कोरून ठेवलाय मी.

**नारद :** तसं नव्हे, तू एकटा आहेस. एकट्याला सापडलेलं सत्य ही शक्ती होण्याऐवजी अनेक वेळा शाप होतो, म्हणून बजावतो.

**प्रियदर्शन :** चुकीची समजूत आहे ही मुनिवर्य. या क्षणाला मी एकटा असलो तरी मृत्युलोकी परत जाताच माझ्या आप्तजनांचं सहकार्य मला तात्काळ मिळेल.

**नारद :** (हसून) आप्तजनांचं सहकार्य ? नारायण ! नारायण !

**प्रियदर्शन :** हसू नका मुनिवर्य ! फार मोठी मोठी माणसं आहेत माझ्या आप्तजनांत.

**नारद :** अस्सं ! म्हणजे तुझ्या आप्तजनांच्यापासून या विश्वरहस्याच्या प्रसाराला तू आरंभ करायचा ठरवला आहेस तर ? ठीक ! ठीक ! फार उत्तम ! पण हे काय ?

( प्रियदर्शन विश्वरहस्याचा ग्रंथ गुंडाळून खाकोटीला मारू लागलेला पाहून ) ही विश्व-रहस्याची पोथी बरोबर घेऊन का जाणार आहेस तू ?

**प्रियदर्शन :** त्याखेरीज मी माझ्या प्रसारकार्याला प्रारंभ कसा करणार ?

**नारद :** त्यासाठी या पोथीची काही गरज आहे का ?

**प्रियदर्शन :** तरीदेखील...म्हणजे...नीट डोळ्यांखालून घातला एकदा ग्रंथ म्हणजे...

**नारद :** असं असं ! म्हणजे तुला जे काय हवंय ते सगळं लेखी पाहिजे ! माझ्या शब्दावर विश्वास नाही तर तुझा ? मृत्युलोकचा माणूस शोभतोस खरा !

**प्रियदर्शन :** तसं नव्हे, पण... ( घुटमळतो. ) हा एवढा ग्रंथ घेऊन जाण्याची अनुज्ञा द्याच मला मुनिवर्य.

**नारद :** अनुज्ञा मी कोण देणार ? नेणार असशील तर ने पण वाटेत कोणी तुला पकडलं तर ?

**प्रियदर्शन :** कोणाची हिंमत आहे आता मला पकडण्याची ! माझ्यासारख्या साक्षात्कारी—

**नारद :** हं हं, मी सांगितलेलं विसरलास इतक्यात ? चुकूनदेखील विश्वरहस्य शब्दात उच्चारशील तर—

**प्रियदर्शन :** क्षमा करा मुनिवर्य. उत्साहाच्या भरात होऊ नये ती आगळीक घडली. ( देवांचा जोरजोराने बोलण्याचा गलबला कानी येतो, त्याबरोबर प्रियदर्शन लगबगीने पोथी खाकोटीला मारीत- ) देवांचे रथ आलेले दिसतात. येतो तर मी निरोप- ! ( अभिवादन करतो. नारद आशीर्वाद देतात. )

**नारद :** मार्ग नीट लक्षात राहील ना ?

**प्रियदर्शन :** त्याबद्दल आपण निश्चिंत असा. बघता बघता वायुवेगानं पाहा कशी स्वर्गाची सीमा ओलांडून जातो मी !

[ व्हरांड्यातून पळत निघून जातो. नारदमुनी ' नारायण ! नारायण ! ' असे म्हणत क्षणभर तो गेलेल्या दिशेकडे बघतात. देवांचा गलबला जास्त जवळ येतो तेव्हा नारदमुनी दुसऱ्या बाजूने अन्तर्धान पावतात. मग तावा-तावाने बोलत प्रवेशतात महादेव आणि ब्रह्मदेव. पाठोपाठ अदबीने वरुण आणि मदन प्रवेशतात व दूर मागे उभे राहतात.

महादेवांचा एकंदर अवतार आणि बोलणे चालणेच असे काही कडक आहे की त्यांच्या तिसऱ्या डोळ्याची सतत दहशत राहावी; त्या मानाने ब्रह्मदेव सौम्य दिसतात, पण त्यांच्या सौजन्यातही धूर्तपणाच जास्ती प्रगट होतो. ]

**महादेव :** ( तावातावाने ) नीट विचार केलात तर तुम्हांलाही माझं म्हणणं पटल्या-शिवाय राहणार नाही ब्रह्मदेवा.

**ब्रह्मदेव :** क्षमा करा महादेवा, पण आपला फार मोठा गैरसमज होतोय असं वाटतं मला. विश्वमालेच्या स्थापनेच्या वेळी देवसभेनं ज्या संकल्पांचा उच्चार केला होता—

**महादेव :** ( आसनस्थ होत ) देवसभेचे संकल्प काहीही असोत. आज प्रत्यक्षात

वस्तुस्थिती काय आहे यावर माझा कटाक्ष आहे. जीवसृष्टीचा प्रयोग सुरू होऊन लक्षावधी वर्षं उलटली. मानवाच्या जन्मानंतरचा काळ जरी घेतलात, तरी त्याच त्या इतिहासाची शेकडो आवर्तनं आपण पाहिली. पण माणसाच्या जातीत तुम्हाला काही फरक पडलेला दिसला आहे का ? जीवसृष्टीचं रहस्य मानवाला उमगलेलं आहे का ? मनुष्य पूर्णावस्थेला पोचण्याची अंधुक शक्यता तरी तुम्हाला या प्रयोगात आढळली आहे का ? सरळ सरळ या प्रश्नांची उत्तरं द्या !

**ब्रह्मदेव** : ( हसून ) नाही, अगदी असंच जरी म्हणता आलं नाही तरी—

**महादेव** : ही अशी लटपट नको. स्पष्ट काय ते सांगा ! तुमच्या या असल्या गुळमुळीतपणामुळंच सगळे घोटाळे माजले आहेत आजवर, समजलात ब्रह्मदेवा ?

**ब्रह्मदेव** : माझ्या गुळमुळीतपणामुळं ?

**महादेव** : तुमच्याच नाही तर काय ? ही जीवसृष्टीची मूळ कल्पना आणि त्यातली मानवाची धारणा म्हणजे भगवंतांचा एक चमत्कारिक हट्ट आहे, दुसरं काही नाही, असं मी आरंभापासून बजावत होतो. त्या वेळीच जर तुम्ही आम्हांला भरघोस पाठिंबा दिला असता तर आज ही पाळी आली नसती.

**ब्रह्मदेव** : पण मला अजून हे कळत नाही की मंगळ म्हणा, शुक्र म्हणा, यांसारखे काही थोडे फुटकळ ग्रह मानवजातीला वसाहतीसाठी आपण खुले करून दिले तर तेवढ्यानं देववृंदाचं बिघडलं कुठं ?

**महादेव** : तुम्ही ही अशी विचारांची गल्लत करू नका ! वसाहतीसाठी मंगळ आणि शुक्र खुले करून देणारे तुम्ही कोण ? विश्वमालेच्या परिभ्रमणात हस्तक्षेप करण्याचा तुम्हांला अधिकारच काय ? देवाधिदेव झाले म्हणून विश्वमालेचे सिद्धान्त फिरतील की काय ? ब्रह्मदेवा, विश्वमाला हे एक सनातन सत्य आहे. मानव हा भगवंताच्या कल्पनेचा एक चंचल तरंग आहे. विश्वमालेच्या यंत्रणेत आपण ढवळाढवळ आरंभली तर याचे किती घोर परिणाम होतील याचा कधी विचार केलात का ?

**ब्रह्मदेव** : परिणाम ? तेही घोर परिणाम ? ( हसून ) घोर परिणाम कसले ? हे पाहा महादेवा, विश्वमालेत आपण कोणतेही प्रयोग केले तरी देवांच्या स्वर्गाला तरी कसलाही धोका नाही याची खात्री आहे मला.

**महादेव** : भ्रम आहे तुमचा हा ब्रह्मदेवा ! विश्वमालेच्या कक्षेतून देवांचा स्वर्गदेखील सुटलेला नाही. शिवाय ' माणूस ' या प्राण्याची दुर्दम्य जिज्ञासा आणि त्याच्या भयानक इच्छाशक्तींचा पल्ला तुम्ही अजून पुरता हेरलेला नाही. तुमचा संबंध आहे फक्त जीवसृष्टीच्या निर्मितीशी. मानवाच्या सगळ्या उपद्व्यापांची अखेरची आवराआवर करावी लागते मला ! तुम्ही तेवढी मातेच्या मांडीवर खेळणारी गोजिरवाणी बालकंच पाहिली आहेत. पण त्यांच्यातून परस्परांच्या नरडीचा घोट घेणारे नरराक्षस निर्माण झालेले बघितले आहेत मी, समजलात ?

**ब्रह्मदेव** : मला वाटतं त्याची कारणं आपण शोधायला लागलो तर देवांच्या अंगाशीच

हे प्रकरण येऊन ठेपल्याखेरीज राहणार नाही.

**महादेव :** ( क्रोधाने ताड्कन् उठत ) खुद्द देवांनीच अशी पडखाऊ भाषा वापरायला सुरुवात केली म्हणजे संपलंच म्हणायचं. स्वर्गाचा विनाशकाळ जवळ आला आहे यात शंका नाही.

**ब्रह्मदेव :** शांत व्हा, शांत व्हा महादेवा—

**महादेव :** ( त्वेषाने जाऊ लागत ) तुम्ही आणि तुमचे भगवंत, देवांच्या भवितव्याशी वाटेल तसे खेळायला मोकळे आहात. मी या चर्चेत भाग घेऊ शकत नाही— !

[ असे उद्‌गारून त्वेषाने महादेव जाऊ लागतात. पण त्याच वेळी महाद्वारातून भगवान विष्णु आत येतात. त्यांच्या मागे विद्युल्लता. भगवंतांना पाहताच वरुण, मदन आणि ब्रह्मदेव ' भगवंतांचा जयजयकार असो ' अशी घोषणा करतात. महादेव भगवंतांच्या समोर चपापून उभे राहतात. भगवंत महादेवांच्याकडे बघून मधुर स्मित करतात. ' थोर मनाचे आणि दिलदार अन्तःकरणाचे ' अशी नारदमुनींनी जी भगवंतांची प्रशस्ती केली होती ती यथार्थच आहे असे त्यांना पाहताच खात्री पटते. अधिकाराचा रुबाब आणि शिरावरील जबाबदारीची चिंता भगवंतांच्या मुद्रेवरच जणू कोरलेली दिसते. ]

**भगवंत :** ( महादेवांसमोर थबकत, स्मित करीत लाघवी शब्दात ) आपण आजच्या चर्चेत भाग घेणार नाही ? आपण माझ्या कार्यात मला सहकार्य देणार नाही ?

**महादेव :** ( विरघळून मागे वळत ) माझ्या म्हणण्याचा असाच काही अर्थ नव्हता... पण...

**भगवंत :** ज्यांच्या आधारावर मी या प्रचंड प्रयोगाला हात घातला ते माझे डावे-उजवे हातच गळून पडणार असतील तर मला वाटतं माझं हे उच्चासनच मी रिकामं केलेलं बरं.

**महादेव :** असं नव्हे देवाधिदेवा. म्हटलं म्हणून मी काही खराच चालता होणार नव्हतो.

**भगवंत :** त्याबद्दल मला खात्री आहे. बसा, बसा महादेवा, आपणात काही गैरसमज असले तर मोकळ्या मनानं बोलून आपण ते दूर करू. मतभेद असले तर विचार-विनिमय करून हा गुंता आपण सोडवून टाकू. पण काही झालं तरी पृथ्वीवरला हा मानवाचा प्रयोग आपण तडीला नेलाच पाहिजे.

[ भगवंत आणि महादेव आसनस्थ होतात. ]

**ब्रह्मदेव :** पाहा, हेच अगदी हेच म्हणत होतो मी महादेवांना पण .. ( महादेवांकडे बघून थबकतात. )

**महादेव :** बोला, थांबलात का ? तुम्हाला काय सांगायचंय ते सांगून टाका भगवंतांना.

**भगवंत :** तुम्हाला दोघांना काय म्हणायचं आहे हे मला पूर्णपणे समजलं आहे. तुम्ही दोघांनी सादर केलेल्या निवेदनांचा अभ्यास करूनच मी ही तातडीची बैठक

बोलावली.

**ब्रह्मदेव :** नाही, पण तातडीच्या बैठकीची काय गरज होती ? म्हणजे आमचे मतभेद तसे विकोपाला गेले नव्हते.

**भगवंत :** मतभेद विकोपाला जाण्याचाच केवळ प्रश्न असता तर मी इतकी घाई केलीही नसती, पण मला वाटतं मानवाबद्दलची माझी भव्योदात्त कल्पनाच तुमच्या हाती उद्‌ध्वस्त होण्याचं संकट आलेलं आहे !

**महादेव :** मला वाटतं ही भव्योदात्त कविकल्पना आपण केवळ महाकाव्यात गुंफली असती तर फार बरं झालं असतं.

**भगवंत :** महादेवा—

**महादेव :** क्षमा करा महाराज, पण या कविकल्पनेच्या प्रयोगापायी विश्वमालेच्या शाश्वत प्रपंचात ढवळाढवळ करण्याचा कोणालाही अधिकार नाही हे निदान आपल्याला तरी उमजायला हवं होतं भगवंत. क्षुद्र मानवाचा हा प्रचंड प्रयोग म्हणजे विश्वमालेचा विध्वंस आणि स्वर्गलोकावर कोसळणाऱ्या संकटाची नांदी आहे असं माझं स्पष्ट मत आहे.

**भगवंत :** ते मला ठाऊक आहे. पण तुम्ही आपापली नेमून दिलेली कामं समजदार-पणानं केली असती तर तुम्हाला क्षुद्र वाटणाऱ्या मानवातून मी थोर वैष्णव निर्माण करून दाखवला असता, आणि निर्जीव शाश्वताऐवजी चिरंतन जीवनानंदानं मी ही सबंध विश्वमाला उजळून टाकली असती.

**महादेव :** विश्वयोजनेसाठी आम्ही परिश्रम घेतले नाहीत असं आपल्याला म्हणायचं आहे का ?

**भगवंत :** होय, परिश्रम घेतलेत. पण त्यात तुमचं अंतःकरण कधीच नव्हतं. श्रमाच्या पाठीशी पोटातली आच उभी नव्हती.

**महादेव :** अस कसं म्हणता आपण देवाधिदेवा ?

**भगवंत :** अशी आच असती तर महादेवा, मानवाच्या हातात अग्न्यस्त्र देण्याचा अविचार तुम्ही केलाच नसता.

**महादेव :** विश्वरहस्यातच आपण अग्न्यस्त्रांची सूचना दिली होती.

**भगवंत :** होय, पण ती मानवाच्या संहारासाठी नव्हे.

**महादेव :** देवाधिदेवा—

**भगवंत :** थांबा ! ब्रह्मदेवा, विश्वरहस्याचा ग्रंथ आणायला सांगा पाहू ?

**ब्रह्मदेव :** विश्वरहस्याचा ग्रंथ ना ? हा काय समोर मेजावर— ( बघून विस्मयाने ) म्हणजे ? मदना, विश्वरहस्याचा ग्रंथ का नाही काढून ठेवला ?

**मदन :** आपल्या पुढंच आहे मेजावर.

**ब्रह्मदेव :** मेजावर तर दिसत नाही ?

**मदन :** ( विस्मयाने ) म्हणजे ? असं कसं होईल ?

**ब्रह्मदेव** : हो, आतल्या दालनात आहे का बघा—?

**मदन** : पण खात्री आहे मला. मी इथंच माझ्या हातानं...विद्युल्लते, ( विद्युल्लता येते. ) मेजावर ठेवलेला विश्वरहस्याचा ग्रंथ काय झाला ?

**विद्युल्लता** : ( चकारून ) मी...मला माहीत नाही ! आपल्या आधीच मी बाहेर नाही का पडले ?

**मदन** : आतल्या दालनात मीच बघून येतो.

[ जातो आणि क्षणार्धात बाहेर येतो. ]

**ब्रह्मदेव** : काय झालं ?

**मदन** : आतल्या दालनात दिसत नाही. महाराज, मी सर्वत्र शोध घेऊन येतो.(जातो.)

**ब्रह्मदेव** : ( रागाने ) शोध घेऊन येतो ! खरोखरच या कार्यालयाला कशी शिस्त लावावी याबद्दल माझी मती तर गुंग झालीय !

**महादेव** : म्हणजे हा ग्रंथ खुशाल उघड्यावर ठेवता तुम्ही ?

**ब्रह्मदेव** : नेहमी भांडागारातच पूर्ण दक्षतेने ठेवण्यात येत असतो हा ग्रंथ. पण आज—

**भगवंत** : पण इतकी दक्षता घेण्याचं कारण काय ? आपल्या कारभारात गुप्त काही नाही.

**महादेव** : देवांना नसेल, पण देवांच्या हिताच्या दृष्टीनं काही गोष्टी निदान मानवापासून तरी गुप्त ठेवणं भाग आहे.

**भगवंत** : पण मानवाबद्दल तरी हा अविश्वास काय म्हणून ? महादेवा, असंख्य वेळा निरनिराळ्या मानवांची आपण सत्त्वपरीक्षा पाहिलीत पण एकदा तरी मानवाचं अधःपतन तुम्हाला सिद्ध करता आलेलं आहे का ?

**महादेव** : हूं ! इतिहासाच्या मंथनातून निर्माण झालेले सिद्धान्त एकदोन माणसांच्या सत्त्वपरीक्षेने बदलत नसतात. एखादा हरिश्चंद्र आणि एखादी चांगुणा म्हणजे काही सबंध मानवजात नाही.

**ब्रह्मदेव** : कबूल. पण मग स्वर्गातले सगळे देव काही—

**महादेव** : ( रागाने ) ब्रह्मदेवा, प्रत्येक वेळी स्वयंसिद्ध देव आणि मातीतून जन्माला आलेला मानव यांची तुलनादेखील करीत जाऊ नका. मी एकदाच स्पष्ट सांगतो, देव ते देव आणि मानव तो मानव !

[ तेवढ्यात मदन आणि विद्युल्लता धावऱ्या धावऱ्या येतात. ]

**मदन** : क्षमा करा महाराज—

**ब्रह्मदेव** : काय झालं ?

**मदन** : बाहेरच्या उद्यानात हे मखमाली बास्तान कल्पवृक्षाखाली सापडलं.

**ब्रह्मदेव** : कल्पवृक्षाखाली मखमाली बास्तान ? ( ताड्कन् उठत ) म्हणजे ?

**विद्युल्लता** : याच बास्तानात ग्रंथ गुंडाळून ठेवला होता महाराज.

**महादेव** : ( ताड्कन् उठत ) म्हणजे ग्रंथ सापडला नाही ?

**मदन** : क्षमा असावी महाराज. आम्ही सगळीकडं शोध केला, पण—

**ब्रह्मदेव** : ( क्रोधाने ) ग्रंथ सापडत नाही याचा अर्थ काय ?

**महादेव** : याचा अर्थ स्पष्ट आहे. ग्रंथ चोरीला गेला. ज्या प्रकाराला मी भीत होतो तोच अखेर घडला. आता मला देवांची धडगत दिसत नाही.

**ब्रह्मदेव** : स्वर्गामध्ये ? आणि या ग्रंथाची चोरी ? अशक्य ! मदना, या कार्यालयातले कानेकोपरे धुंडाळून नीट शोध घ्या. सूर्योदयापूर्वी हा ग्रंथ सापडला नाही तर कार्यालयातल्या सगळ्या अधिकाऱ्यांना सात सात जन्म मृत्युलोकी जन्माला घाला—

**महादेव** : नुसतं जन्माला घालून ताळ्यावर येणार नाहीत ही मंडळी. चांगले जन्मभर अठरा विश्वे दारिद्र्यात पिचत ठेवा एकेकाला !

[तोच व्हरांड्यातून प्रियदर्शन पुढे येतो आणि पाठोपाठ काळाकभिन्न यमधर्म प्रवेशतो. प्रियदर्शन व्हरांड्यात थबकून ओरडतो—]

**प्रियदर्शन** : थांबा – !

( सगळे देव विस्मयाने बघू लागतात; तोच पुढे येऊन प्रियदर्शन ) कोणालाही इतकी भयंकर सजा फर्मावण्याची गरज नाही. हा घ्या तुमचा ग्रंथ.

[ मेजावर ग्रंथ टाकतो. भगवंतांच्या खेरीज सर्व देव विस्मयाने थक्क होऊन नकळत उभे राहतात. ]

**ब्रह्मदेव** : तू...तू कोण ? देवांच्या समोर अशी उद्दाम भाषा !

**यमधर्म** : साक्षात् देवाधिदेव भगवान् विष्णूच्या समोर कृतकर्माचा जाब द्यायला तू उभा आहेस.

**प्रियदर्शन** : (विस्मयाने) साक्षात् देवाधिदेव ? भगवान् विष्णु. ( अभिवादन करीत ) प्रतिभेच्या दिव्य उन्मेषातून मानवाला निर्माण करणाऱ्या परमेश्वरा, आपल्याला माझे शतशः प्रणाम !

**भगवंत** : यमधर्मा, हा काय प्रकार आहे ?

**ब्रह्मदेव** : मृतात्म्यांची वसाहत ओलांडून देवांच्या स्वर्गात पाऊल टाकायला हा मृतात्मा धजलाच कसा ? स्वर्गाचे सगळे रक्षक गाफील झाले की बेइमान ?

**यमधर्म** : क्षमा करा महाराज ! हा मृतात्मा नव्हे.

**ब्रह्मदेव** :<br>**महादेव** : } ( ताड्कन् उठत ) हा मृतात्मा नव्हे ?

**महादेव** : म्हणजे स्वर्गावर स्वारी करण्याइतकी मानवाच्या धाडसाची मजल गेली काय ?

**भगवंत** : हा मृतात्मा नव्हे तर हा आहे कोण ? पृथ्वीवरून स्वर्गात हा आला कसा ? विश्वरहस्यासारखा ग्रंथ देवांच्या सचिवालयातून याच्या हाती गेलाच कसा ?

**यमधर्म** : महाराज, हे गूढ मलाही अद्याप उकललेलं नाही. स्वर्गाच्या सीमेवर मी या मानवाला संशयास्पद स्थितीत परवान्याखेरीच हिंडताना बघितला. त्याच्या

हातात हा मौल्यवान् ग्रंथही आढळला म्हणून त्याला पकडून आपल्यापुढं आणून मी उभा केला आहे.

**प्रियदर्शन :** खोटं आहे. विश्वरहस्यातल्या तरतुदीनुसार मला अटकाव करण्याचा यमधर्मांना अधिकार नाही !

**महादेव :** देवांच्यापैकी कोणाचा तरी हात या कृटात असल्याखेरीज एकट्या मानवाच्या हातून हे कृत्य घडेल असं मला मुळीच वाटत नाही.

**भगवंत :** आपण तर्क करीत बसण्यापेक्षा यालाच खुलासा करायला सांगू या. सांग, तू कोण आहेस ? इथं आलास कसा ? हा ग्रंथ तुझ्या हातात कोणी दिला ?

**प्रियदर्शन :** देवाधिदेवा, आपल्याला काय हवंय ते मी जाणतो. पण...

(घुटमळतो.)

**भगवंत :** पण काय ? घाबरू नकोस. मोकळ्या मनानं सांग.

**प्रियदर्शन :** देवाच्याप्रमाणं मलाही काही गुप्त रहस्यं आहेत, आणि या रहस्यांच्या गुप्ततेबद्दल मी वचनबद्ध आहे.

**महादेव :** ( यमधर्माकडे मोठ्या डोळ्याने रागाने बघत ) यमधर्म—

**यमधर्म :** क्षमा करा महाराज ! माझी कोणतीच अस्त्रं या मानवावर चालू शकत नाहीत.

**प्रियदर्शन :** आपला ग्रंथ मी परत केला आहे. देवाधिदेवा, विश्वरहस्यातल्या शर्तीप्रमाणं आपण मला सन्मानानं मृत्युलोकी परतण्याची अनुज्ञा द्यावी.

**महादेव :** इतक्या प्रकारानंतर मृत्युलोकी परत जायला मिळेल अशी आशा वाटते तुला ?

**प्रियदर्शन :** हा आशेचा प्रश्नच नाही. विश्वरहस्याचा साक्षात्कार झालेल्या मानवाला प्रतिबंध करण्याचं कोणालाही सामर्थ्य नाही.

**महादेव :** काय ? काय म्हणालास ?

**प्रियदर्शन :** रागावू नका महादेवा. विश्वरहस्य तुमच्या समोरच आहे. त्यातल्या सातव्या सर्गात भगवंतांनी सविस्तर स्पष्टीकरण केलेलं आहे.

**भगवंत :** जीवसृष्टीचं रहस्य तुला समजलेलं आहे, असं तर—

**प्रियदर्शन :** होय देवाधिदेवा, असंच मला म्हणायचं आहे. जीवसृष्टीच्या रहस्याचा मला संपूर्ण साक्षात्कार झालेला आहे.

**ब्रह्मदेव :** ( धूर्तपणाने ) कोणतं रहस्य ? कसला साक्षात्कार ?

**प्रियदर्शन :** माफ करा ब्रह्मदेवा. ते रहस्य शब्दात व्यक्त होताच मातीमोल होईल हे काय कला ठाऊक नाही ? ते आता मानवाच्या जीवनातच तुम्हाला यापुढं दिसेल.

**महादेव :** ( क्रोधाने ) त्यापूर्वीच माझं सगळं तपोबल पणाला लावून—

**भगवंत :** शांत व्हा महादेवा. सत्याचा साक्षात्कार झालेल्या कोणाही मानवाला शापदग्ध करता येणार नाही. आपला शब्द गेला आहे त्याबद्दल...

**महादेव :** विश्वमालेच्या यंत्रणेत हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही वचनांची तमा बाळगण्याचं मला कारण दिसत नाही. अविचारानं शब्द गेला असला तर वेळीच तो परत घेण्यात शहाणपणा आहे !

**भगवंत :** आपल्या शब्दाला देव जागणार नसतील तर देवांचं देवपणही संपुष्टात आल्याखेरीज राहणार नाही.

**महादेव :** मग काय उघड्या डोळ्यानं मृत्युलोकी या साक्षात्काराचा प्रसार झालेला आपण बघणार ? आपल्या मर्जीखातर विश्वमालेचा सनातन प्रपंच आपण उधळून लावणार ?

**भगवंत :** महादेवा आज ना उद्या सत्याचा साक्षात्कार मानवाला होणारच होता, त्याबद्दल इतका खेद करण्याचं काय कारण ? देवांच्या मनात सद्भावना असेल आणि उत्कट इच्छा असेल तर विश्वमालेचे नियमदेखील फिरलेच पाहिजेत ! सत्, चित् आणि आनंद यांची संगती विश्वमालेच्या यंत्रणेत नसली तर देवांनी ती आपल्या तपोबलानं निर्माण केली पाहिजे !

**ब्रह्मदेव :** मला वाटतं या प्रकरणात काही तडजोड शोधून काढणं शक्य आहे.

**महादेव :** तडजोड ? तडजोड कोणाबरोबर ? कशासाठी ? ब्रह्मदेवा, आपल्या बुद्धीलाही भ्रम झालेला नाही ना ?

**ब्रह्मदेव :** शांत व्हा महादेवा. ज्या गोष्टी शक्तीनं लाभत नाहीत त्या युक्तीनंच साध्य कराव्या लागतात, समजलात ! ( प्रियदर्शनकडे वळून ) मृत्युलोकी सत्याच्या साक्षात्काराचा प्रसार करण्याचा अविचार तू सोडून देणार असलास तर---

**प्रियदर्शन :** देवांच्या स्वर्गात आपण मला मानाचं स्थान देणार आहात ?

**ब्रह्मदेव :** अं...अं...

**महादेव :** स्पष्ट नाही म्हणून सांगा ब्रह्मदेवा. देवांच्या स्वर्गात जे जन्मानंच देव आहेत त्यांनाच फक्त स्थान आहे.

**प्रियदर्शन :** त्यासाठी मी आपल्यापुढं मुळीच पदर पसरला नाही. देवांच्या स्वर्गाचा आम्हा मानवांना मुळीच लोभ नाही. पण मानवांच्या जे हक्काचं आहे तेवढंही आम्हाला मिळू नये का ?

**ब्रह्मदेव :** मानवांच्या हक्काचं ? मानवांच्या हक्काचं असं काय आहे ?

**प्रियदर्शन :** विश्वरहस्याच्या बाराव्या सर्गात तुम्हाला त्याची माहिती सापडेल.

**भगवंत :** तुला निश्चितपणे हवं आहे तरी काय ?

**प्रियदर्शन :** तीन गोष्टी देवाधिदेवा. मानवाच्या वसतीसाठी या विश्वमालेतले सगळे ग्रहगोल, मृत्यूला हद्दपारीचा आदेश, आणि देवांच्याप्रमाणंच मानवालाही चिरतारुण्याची संजीवनी. या तीन अटी पूर्ण होणार असतील तर—

**महादेव :** अशक्य. सर्वथा अशक्य. भगवंतांची कविकल्पना म्हणजे विश्वांतले रूढ सिद्धांत नव्हेत !

**प्रियदर्शन** : ठीक आहे. मी काही भिक्षा मागत नव्हतो आपल्यापुढं. मला झालेला सत्याचा साक्षात्कार सबंध मानवजातीला प्राप्त करून द्यायचाच काय तो अवकाश—
**भगवंत** : पण त्यासाठी ही अशी दण्डेली काय म्हणून? देवांच्या सहकार्यानं आणि सदिच्छेनं मानवाला आपलं ईप्सित साध्य करता येणार नाही का?
**ब्रह्मदेव** : हप्त्याहप्त्यानं आम्ही साऱ्या गोष्टी मानवाला देणारच आहोत.
**प्रियदर्शन** : क्षमा करा देवाधिदेवा, पण देवांच्याकडून मानवाला आजवर कोणता न्याय मिळाला आहे म्हणून या न्यायाची आम्ही अपेक्षा करावी?
**भगवंत** : कृतघ्नपणाचा हा कळस झाला.
**प्रियदर्शन** : आराधनेचे लुसलुशीत शब्द ऐकण्याची सवय झालेल्या देवांना माझी स्पष्टोक्ती इतकी लागत असेल तर महादेवा माझा नाइलाज आहे त्याला.
**भगवंत** : पण देवांनी असा कोणता अन्याय केला मानवांवर?
**प्रियदर्शन** : अन्यायाची यादी वाचू लागलो तर महाभारतापेक्षा महाग्रंथ होईल.
**महादेव** : मानवजात पूर्णतेला पोचत नाही हा काही देवांचा अपराध नाही.
**प्रियदर्शन** : आता मी स्पष्ट बोललो तर महादेवा, आपला कोप होईल—
**भगवंत** : बोल, अगदी खुल्या दिलानं बोल. स्पष्ट बोलल्याबद्दल कोणाच्याही कोपाची तुला तमा बाळगायचं कारण नाही.
**प्रियदर्शन** : इतकी युगं उलटूनही माणूस अपूर्ण राहिला असला तर त्याची जबाबदारी आहे तुम्हा देवांवर. विश्वाचं कोडं माणसाला कधीच उलगडू नये, आपला जीवितहेतू माणसाला कधीच सापडू नये, याची तुम्ही देवांनी पक्की तजवीज करून टाकली आहे.
**महादेव** : असत्य! त्रिवार असत्य!

[याच क्षणी नारदमुनी मुकाट्याने व्हरांड्यात येऊन उभे राहतात. त्यांचे अस्तित्व कोणाच्याही लक्षात येत नाही.]

**प्रियदर्शन** : (अनावर प्रक्षोभाने) तर मग महादेवा, मला सांगा, मानवानं तुम्हा देवांचा असा काय अपराध केला होता म्हणून तुम्ही फत्तरालाही अमरपद दिलंत, आणि मानवाला मात्र अल्पायुषी केलंत? उदारहस्ते मानवाला शंभर वर्षांची हयात दिलीत पण अज्ञात अंगुलीनं बहुतेकांच्या भाळी अकाली मृत्यू का लिहिलात? हजारो मातांच्या मांडीवरून गोजिरवाणी बालकं ओढून मृत्यूच्या घशात नेऊन का टाकलीत? चिरंजीव झालेला मानव आपल्या पराक्रमानं देवांचीही भूषणं हिरावून नेईल अशी भीती वाटली तुम्हाला. होय ना? बोला, अवघ्या साठाव्या वर्षी ज्ञानवंतांच्या बुद्धीला भ्रम निर्माण करणारं वार्धक्य मानवावर का लादलंत? वातावरणात रोगजंतू पसरून बलवंतांनाही जर्जर करतील अशा व्याधी का निर्माण केल्यात? सांगा, कोणत्या पातकाची शिक्षा म्हणून मानवांनी अलोट कष्ट करून उभारलेली संस्कृतीची शिखरं जमीनदोस्त करणारे प्रचंड धरणीकंप तुम्ही घडविलेत? पोटाच्या विवंचनेतून मानव मुक्त झाला तर तो पूर्णतेला पोचल्याशिवाय राहणार नाही या भयानं मानवाला

'अन्न अन्न' करीत सैरावैरा धावायला लावणारे भयंकर दुष्काळ तुम्ही निर्माण केलेत! हाती घेतलेल्या प्रचंड कार्यात केवळ आत्मविश्वासाच्या आधारावर मानव यशस्वी होईल म्हणून त्याच्या डोक्यावर नियतीची सदैव टांगती तलवार तुम्ही ठेवलीत! मानवी आयुष्याची जर हीच लाजिरवाणी गती असेल तर देवाधिदेवा, आपल्या प्रतिभेच्या उन्मेषातून मानवाला तुम्ही निर्माण केलातच कशाला? स्फूर्तीच्या तेजस्वी क्षणी पाहिलेलं हे मानवाचं उदात्त स्वप्न आपण अन्तःकरणाच्या गाभाऱ्यात का ठेवलं नाही? (प्रक्षोभाने त्याचे शब्द ओठातच गोठतात. क्षणार्धाने—) देवाधिदेवा, मानवाचं दुःख मानवी जन्म घेतल्याखेरीज देवांना कधीही समजणार नाही. या विशाल विश्वात मानव एकाकी आहे.

**भगवंत :** अरे एकाकीपणाचं दुःख केवळ मानवांच्याच ललाटी नाही. स्वर्गातलं उच्चासन भूषविणारा माझ्यासारखा देवाधिदेवदेखील एकाकी आहे. एकाकीपणाच्या या व्यथेतून तर मानवाचा जन्म झाला आहे. महादेवा, ब्रह्मदेवा—वार्धक्य, रोगराई, अपमृत्यू, दुष्काळ, धरणीकंप काय काय ऐकतो आहे मी हे? हे शाप मानवाच्या शिरावर कोणी लादले? माझ्या विश्वयोजनेत तर असल्या सैतानी शापांचा उल्लेखदेखील नव्हता.

**ब्रह्मदेव :** गैरसमज होतोय देवाधिदेवा! हे शाप नव्हेत. आता एवढा प्रचंड प्रयोग सांभाळायचा म्हणजे देवांच्याकडून असल्या किरकोळ चुका घडायच्याच! काय महादेवा?

**भगवंत :** ब्रह्मदेवा, असल्या अनर्थांची किरकोळ चुका म्हणून विल्हेवाट लावणं हे देवांच्या कार्यक्षमतेला शोभत नाही.

**महादेव :** थांबा! देवाधिदेवा, असा घाईनं निष्कर्ष काढून देवांच्या कर्तृत्वाचा तेजोभंग करू नका. ब्रह्मदेव म्हणतात तशा या किरकोळ चुकाही नव्हेत आणि आपण मानता तसे देवांनी मानवांच्या माथी मारलेले हे शापही नव्हेत.

**भगवंत :** मग मृत्युलोकावर घडणाऱ्या या सगळ्या उत्पातांचा मी अर्थ काय समजायचा?

**महादेव :** त्याबद्दल देवांच्या सभेत सविस्तर खुलासा करायला माझी केव्हाही सिद्धता आहे— पण ती देवांच्या सभेत एका मानवासमोर या प्रश्नाची झाली एवढीच चर्चा फार झाली.

**प्रियदर्शन :** पृथ्वीवरल्या अनर्थांचा खुलासा देवसभेत? जिथं प्रश्न विचारणारे देव, उत्तर देणारे देव, आणि अखेर न्याय देणारेही देवच— असल्याच देवसभेत ना!

**भगवंत :** फार गुंतागुंतीचा व्हायला लागला आहे हा प्रश्न!

**प्रियदर्शन :** देवाधिदेवा, आपण मला साहाय्य द्या, आपण माझे सारथी व्हा. स्वर्गातलं हे उच्चासन सोडून आपण भूलोकी या. स्वर्गाला लाजवतील असली शेकडो नंदनवनं या विश्वमालेत आपल्या नेतृत्वाखाली आम्ही निर्माण करू.

**भगवंत :** ते शक्य नाही. तुझा हेतू स्तुत्य असला तरी तुझे मार्ग मला पसंत नाहीत.

देवांच्या सदिच्छेनं आणि सहकार्यानं मानवाला जे मिळवता येईल ते तुझ्या असल्या आततायीपणामुळं मात्र तो गमावून बसेल.

**प्रियदर्शन** : देवांची सदिच्छा ? जन्मजन्मान्तरी देवांची सदिच्छा मानवांना प्राप्त होणं शक्य नाही. मग सहकार्याची गोष्ट कशाला ?

**भगवंत** : माझ्यावर विश्वास ठेव. देव आणि मानव यांच्यात कलहाची ही बीजं बरी नव्हेत. तुम्हा मानवांचं गाऱ्हाणं मला समजलं आहे. आता यासंबंधातली शिष्टाई स्वतः जातीनं करून मानवी दुःखाचं मी संपूर्ण निवारण करीन.

**प्रियदर्शन** : पण विश्वरहस्याची गुरुकिल्ली माझ्या हातात गवसली असताना आपल्या शिष्टाईची मुळी गरजच काय ?

**भगवंत** : आपलाच हटवाद तू चालवणार असशील तर तुझा मार्ग तुला मोकळा आहे.

**प्रियदर्शन** : ( निराशेने ) मानवाच्या निर्मात्यानंच मानवाकडे पाठ फिरवली तर...

**भगवंत** : मी नुसता मानवांचा निर्माता नाही. स्वर्गाचा शास्ता आणि देवांचा नेता म्हणून मला माझी कर्तव्यं पार पाडलीच पाहिजेत.

**प्रियदर्शन** : आपली मर्जी ! आपल्या साहाय्याशिवायच आम्ही मानव आपलं भवितव्य घडविण्याचा प्रयत्न करू. देवाधिदेवा, निदान परतण्यापूर्वी मला आपण आशीर्वाद द्यावेत.

**भगवंत** : माझ्या आशीर्वादांना फलदायी सामर्थ्य असल्यानं तेही मी तुला देऊ शकत नाही.

**प्रियदर्शन** : तर मग मानवांच्या हक्कासाठी आता देवांशी झुंज घेण्यावाचून आम्हांला गत्यंतर उरलं नाही. ( अभिवादन करतो. )

**भगवंत** : जा, मृत्युलोकांवर पोचेपर्यंत तरी तुझ्यावर कोणतीही संकटं येणार नाहीत.

[ प्रियदर्शन निघून जातो. तो जात असतानाच— ]

**ब्रह्मदेव** : भगवंता, फार उशीर होण्यापूर्वी आपण पुन्हा एकदा विचार करा.

**भगवंत** : भगवान विष्णु फक्त एकदाच विचार करतात.

[ तोच नारदमुनी ' नारायण ! नारायण ! ' उच्चारीत पुढे येतात व भगवंतांना अभिवादन करतात. ]

**भगवंत** : नारदा, तू या वेळी इथं कसा ?

**नारद** : जिथं भगवंत, तिथं त्याचा भक्त. मी अन्यत्र कुठं असणार ?

**महादेव** : तुम्ही तरी भगवंतांना देवांच्या वतीनं चार समजुतीचे शब्द सांगावेत अशी विनती आहे मुनिवर्य. देवाधिदेवांनी अविचार आरंभला तर विश्वमालेवर आणि समंध स्वर्गलोकांवर अनर्थ गुदरल्याखेरीज राहणार नाही.

**नारद** : हो ! इथं जो प्रकार मी पाहिला त्यावरून असं दिसतं खरं !

**भगवंत** : ( विस्मयाने ) नारदा, तू... तूदेखील असं म्हणावेस ? मानवांचा मी पक्षपाती झालो, देवांचा मी हितशत्रू झालो असं तुलाही वाटावं ?

**नारद** : नारायण ! नारायण ! (हसून) भगवंता, स्वर्गलोकावर होणाऱ्या गंभीर परिणामांचा तुम्ही विचार केलात तर तुम्हालाही माझं म्हणणं पटल्याशिवाय राहणार नाही.

**भगवंत** : गंभीर परिणाम ? कोणते परिणाम ?

**नारद** : असं पाहा, सबंध मानवजातीला विश्वरहस्याचा साक्षात्कार झाला म्हणजे ही प्रचंड विश्वमाला खुली करून देणं आपल्याला भागच आहे.

**भगवंत** : होय, पण तेवढ्यानं देवांच्या हिताला–

**नारद** : जरा थांबा. विश्वमाला द्यायची म्हणजे आज ती आहे त्या अवस्थेत नव्हे हे तर खरं ना ? या मालेत फिरणारे असंख्य लहानमोठे ग्रहोपग्रह वातावरणांनी भरावे लागतील. बरोबर आहे ना ?

**ब्रह्मदेव** : देवांना हे प्रचंड काम कसं झेपेल ?

**नारद** : झेपणार नाही असं काही मी म्हणत नाही. पण त्यासाठी कित्येक युगेपर्यंत देवांना ग्रहाग्रहांवर अहोरात्र राबत बसावं लागेल, इतकंच !

**महादेव** : देवांना युगानुयुगे राबत बसावं लागेल, ही घटना तुम्हाला इतकी क्षुद्र वाटते ?

**नारद** : नाही, म्हणजे तेवढ्यानंही भागेल असं नाही. कारण ही विश्वमाला विस्तार पावणारी आहे. तेव्हा माझ्या म्हणण्याचा अर्थ–

**महादेव** : (ताड्कन् उठत) याचा अर्थ देवांचं स्वातंत्र्य जाणार आणि देव मानवांचे गुलाम होणार, असाच ना ? मग तसं स्पष्ट का नाही सांगत ?

**नारद** : (हसत) नारायण ! नारायण ! ते मी कसं सांगणार ? इतकी युगे देवांनी वैभव भोगलं. आता मानवाची पाळी आलेली दिसते आहे.

**महादेव** : (रागाने उठत) देवाधिदेवांच्या दुराग्रहापायी विश्वमालेचा विध्वंस व्हावा आणि देवांच्यावर स्वातंत्र्य गमावण्याची पाळी यावी ही लाजिरवाणी घटना आहे. असल्या स्वर्गात राहण्यापेक्षा...

**भगवंत** : थांबा, महादेवा असा अविचार करू नका. तुमच्याइतकीच देवांच्या हिताची मलाही चिंता आहे. देवांना मी असल्या गुलामगिरीत लोटेन असं तुम्हाला वाटतं का ?

**महादेव** : आता हा आमच्या काहीही वाटण्याचा प्रश्नच उरला नाही. विश्वरहस्याचा पक्षी तर स्वर्गातून केव्हाच उडाला. आता उरला आहे फक्त अवधीचाच प्रश्न.

**ब्रह्मदेव** : भगवंता, या संकटातून काही तरी मार्ग काढलाच पाहिजे.

**महादेव** : मार्ग एकच. विश्वरहस्याचा प्रसार होण्यापूर्वीच मानवजात बेचिराख करून टाकली पाहिजे. भगवंता, आपण अनुज्ञा द्या, एका क्षणात–

**भगवंत** : अशक्य. असल्या अविचाराला मी कधीच संमती देणार नाही.

**महादेव** : तर मग विश्वमालेतले प्रचंड उत्पात आणि देवांच्या भवितव्यातली गुलाम-

गिरी काही टळत नाही.

**नारद :** नारायण ! नारायण ! छे छे छे ! इतका साधा, सोपा आणि जवळचा मार्ग असून तुमच्या लक्षात तो येऊ नये ?

**भगवंत :** कोणता मार्ग नारदा ? मानवाचा संहार करण्याखेरीज दुसरा कोणताही मार्ग मला सुचव. देवांच्या रक्षणास मी वचनबद्ध आहे.

**नारद :** भगवंता, ब्रह्मांडनायक आपण. मी लेकरूं आपल्याला काय सुचविणार ? पण असा विचार, आपली एक शंका मनात येते की—एका मानवाच्या हातात सापडलेल्या या विश्वरहस्यावर, समंध मानवजातीचा राहू दे पण त्याच्या आप्तजनांचा तरी चटकन् विश्वास बसेल ? अहो, सत्याची कास धरणाऱ्या मोठमोठ्या महात्म्यांनादेखील—

**भगवंत :** ते ठाऊक आहे मला. मग तुझं म्हणणं तरी काय नारदा ?

**नारद :** नारायण ! नारायण ! म्हणणं काय असणार ? अहो विश्वरहस्याचा प्रसार करायला निघालेल्या या एका माणसाला मानवाच्या समाजात—

**भगवंत :** समजलं मला !

**नारद :** भगवंतांची प्रतिभा, महादेवाची शक्ती आणि ब्रह्मदेवांची बुद्धी एकत्र झाली तर काय अशक्य आहे ?

**भगवंत :** देवांच्या रक्षणाचा तोच एक उपाय दिसतो आहे मला. (एकदम उठत) चला. ताबडतोब उठा. ब्रह्मदेवा, महादेवा या क्षणी निघायला हवं आपल्याला. मदना, तूही बरोबर राहा आमच्या.

**महादेव :** म्हणजे ? कुठं जाणार आहोत आपण ?

**भगवंत :** मृत्युलोकी.

**ब्रह्मदेव :** मृत्युलोकावर ? इतक्या तातडीनं जाऊन आपण काय कारणार आहोत ?

**भगवंत :** ते मी तुम्हाला आता वाटेतच सांगेन. विद्युल्लते, गरुडाला ताबडतोब बोलावून घे आणि तूही आमच्याबरोबर चल ! देवांच्या रक्षणासाठी आता पडेल तो त्याग मला केलाच पाहिजे.

**नारद :** पडेल तो त्याग ?

**भगवंत :** होय, नारदा. तितकाच प्रसंग पडला तर माझ्या सुंदर स्वप्नाचाही !

**ब्रह्मदेव, महादेव आणि इतर :** (अत्यानंदाने, भगवंतांचा जयजयकार असो !

[भगवंतांच्या समवेत सर्व देव जातात. उरतात एकटे नारदमुनी. भगवंत गेलेल्या दिशेकडे करुण दृष्टीने पाहून—]

**नारद :** नारायण...नारायण... देवाधिदेवा, या मनोराज्यातून आपण केव्हा जागे होणार ?

**प ड दा**

20509 21991

# अंक दुसरा

[ पूर्वीचेच भव्य धूसर दालन. पण ते आता स्वर्गलोकातून मृत्युलोकावर एका बादशाही बंगल्यात अवतरल्यामुळे पूर्वीची 'चमत्कारिक प्राचीनता' कोठेही शिल्लक उरली नाही. उरल्या आहेत त्या प्रचंड भिंती, बाजूचा जिना, कमानीचे द्वार, वाटोळे खांब, तो लांबलचक नक्षीदार कठड्याचा व्हरांडा आणि त्यामागील भव्य आकाश. या आकाशात आता फक्त शुक्राची एकुलती एक चांदणी लुकलुकते आहे.

या दालनातील पूर्वीची सगळी चीजवस्त मयसभेप्रमाणे अन्तर्धान पावली आहे. उरली असलीच तर क्वचित एखाददुसरी वस्तू, जी स्वर्गाच्या आणि-पृथ्वीच्याही कोंदणात सुबकतेने बसावी. आता सकाळच्या अंधुक प्रकाशात दिसते आहे ती एका बड्या कारखानदाराच्या बंगल्यातील दर्शनी हॉलमधील आधुनिकतेने नटलेली सजावट. या सजावटीतून श्रीमंतीचे ओघळ ओसंडून चालले आहेत, तर कलाकुसरीच्या दुर्मिळ मौल्यवान वस्तुसंग्रहातून विलासाकडे झुकलेली सौंदर्यदृष्टी भरभरून वाहते आहे. गांधीजींच्या पुतळ्याप्रमाणे नटराजाचा पुतळाही एका कोपऱ्यात दालनाची शोभा वाढवीत आहे. भिंतीवर निसर्गदेखाव्याच्या चित्रमालिकेतच नटश्रेष्ठांच्या तसबिरीही लटकल्या आहेत. आकर्षक मुखपृष्ठांची पुस्तके आणि जाडेजाडे विद्वत्तादर्शक देशीविदेशी ग्रंथ काचेच्या तावदानाच्या सुबक कपाटांतून, ( बहुधा सजावटीचा एक भाग म्हणूनच— ) दाटीवाटीने उभे असलेले दिसत आहेत.

पडदा वर जातो तेव्हा पहाटेचा अंधुक प्रकाश ओसरून उगवतीची कोवळी प्रसन्न उन्हे आत येऊ लागलेली दिसतात. माडीवर कोठे तरी नंदिनी भूपाळी गात आहे. त्या भूपाळीचे गोड स्वरशब्द वातावरण भरून टाकू लागतात. व्हरांड्यात कठड्याला टेकून नाइट-सूटमध्ये प्रियदर्शन

आकाशात कोठे तरी दृष्टी लावून कधीचा पाठमोरा उभा आहे. मध्येच केव्हा तरी तो मागे वळतो. विचारमग्न मुद्रेने आणि शोधक दृष्टीने काही हरपले श्रेय धुंडाळीत हॉलमध्ये तो धीम्या पावलाने हिंडू लागतो. आदल्या रात्री जे पाहिले, ऐकले आणि अनुभविले त्याच्या 'जागा' तो निश्चित करू लागतो. प्रियदर्शनचे ते रोखून बघणे, विचित्रपणे काही तरी शोधणे आणि हातवारे करीत मध्येच पुटपुटणे यावरून काही तासांपूर्वी घडलेल्या घटनांचा अर्थ लावण्याचा त्याचा प्रयत्न अगदी उघड दिसतो. मध्येच केव्हा तरी तो खिशातून एक छोटे नोटबुक आणि पेन्सिल ( लष्करी पेशाचीच एक उपाधी– ) बाहेर काढतो. एका कोचाशेजारी उभ्याउभ्याच, एक पाय दुमडून आधाराला घेत तो त्या छोट्या वहीत स्मरणातून भराभर नोंदी करू लागतो. नोंदी करता करता मध्येच हात खिशाकडे जातो. बहुधा सिगारेटची तल्लफ आली असावी. सिगरेटकेसमधून सिगरेट तोंडात ठेवून ती शिलगावी। तो धुराची वर्तुळे सोडू लागतो.

तेवढ्यात हातात पूजेचे साहित्य घेऊन देवदर्शनाला जाण्याच्या तयारीत नंदिनी प्रवेशते. तिच्या थाटामाटाच्या शृंगारभूषेत नव्या जुन्याची गल्लत झाली आहे. पण त्यातही तिचे निरागस लावण्य उठून दिसते. मुखावरील प्रसन्न भोळे-भाव तिच्या निर्मळ, सरळ आणि तितक्याच बोथट मनाची साक्ष देतात. तिला पाहताच विद्युल्लतेची आठवण सहजच होते. जिन्यावरून येता येताच मागे वळून ती ओरडते... "विठोबा, जाऊन येते रे मी. यांच्याकडे जरा लक्ष ठेव हं !" असे म्हणून ती खाली येते तो समोर प्रियदर्शन दृष्टीला पडताच नंदिनी दचकून 'इश्यऽऽ' असा प्रदीर्घ उद्गार काढून थबकते. वहीत नोंदी करणाऱ्या प्रियदर्शनच्या समाधीत थोडाही भंग पडत नाही हे पाहून नंदिनी पुढे येते आणि कमरेवर हात ठेवून ठसक्यात विचारते– ]

**नंदिनी :** हे काय ? तुम्ही इथं ? बाई बाई बाई ! हद्द झाली बाई तुमच्यापुढं ! इथं खाली केव्हा आलात ?

**प्रियदर्शन :** ( आपल्याच तंद्रीत ) ऊं ? खाली केव्हा आलो ? हूं ऽऽ ! दॅट्स द प्रॉब्लेम !

**नंदिनी :** ( हसत ) प्रॉब्लेम ? कसला प्रॉब्लेम ?

**प्रियदर्शन :** तेच गूढ पडलंय् मला !

**नंदिनी :** हं ऽऽ ! गूढ पडायला मोठा गहन प्रश्न का विचारलाय मी ? झोप लागली होती तुम्हाला म्हणून उठून अंग धुवायला गेले मी, तर तेवढ्यात तुम्ही ऽऽ— चला पाहू माडीवर. हे पाहा, ऐकलंत का, स्वस्थ पडून राहा आजच्या दिवस तरी. चार दिवस पाहुणे आहोत आपण या घरात तोपर्यंत तरी बायकोचं ऐकत जा जरा ! चला,

तुम्हाला इथं पाहिलं तर चारुताई आणि धनंजय काय म्हणतील काय मला ?

**प्रियदर्शन :** ( तंद्रीतच ) चारु ? धनंजय ? हां हां, म्हणजे ते मानव !

**नंदिनी :** ( विस्मयाने ) काय म्हणालात ?

**प्रियदर्शन :** काही नाही ! ( पुन्हा लिहू लागतो. )

**नंदिनी :** इश्श ! अहो सांगा तरी ? लिहिता आहात काय एवढं तंद्री लावून ? कविता ऽऽ ?

**प्रियदर्शन :** ऊं हूं !

**नंदिनी :** मग काही कामाचं ?

**प्रियदर्शन :** हूं !

**नंदिनी :** छान ! तुम्हाला अगदी अंथरुणावरून उठू द्यायचं नाही असं बजावून गेले होते डॉक्टर आणि तुम्ही तर खुशाल—

**प्रियदर्शन :** डॉक्टर ? कोण डॉक्टर ?

**नंदिनी :** इश्य ऽ म्हणजे काऽय ?

**प्रियदर्शन :** अस्सं ! म्हणजे तो– तो–, कोणी का असेना, पण म्हणजे मृत्युलोकातलाच ! ( हसून ) बिचारा स्वतः मर्त्य तो इतरांना काय वाचवणार ?

**नंदिनी :** ( चिडून ) होय का ? मग तुमच्यासाठी कोण अश्विनीकुमार येणार आहेत की वरून धन्वंतरी अवतरणार आहे ? काही तरीच बोलत सुटायचं म्हणजे काय माणसानं ?

( जवळ जाऊन न्याहाळत, काळजीच्या स्वरात ) अजून पुरती उतरली नाही का ?

**प्रियदर्शन :** उतरली नाही ? काय ?

**नंदिनी :** वाटलंच मला !

**प्रियदर्शन :** अग पण काय उतरली नाही ?

**नंदिनी :** ग्लासभर ताक घेतलंत म्हणजे बरं वाटेल.

**प्रियदर्शन :** ताक ! ताक कशाला ?

**नंदिनी :** काल संध्याकाळी तुम्ही पार्टीला गेला होता त्या वेळी जातानाच बजावलं होतं की नाही मी तुम्हाला ?

**प्रियदर्शन :** म्हणजे ? काय समजलीस काय तू मला ? मी...मी...काय...

**नंदिनी :** मी कुठं म्हणते तुम्ही नेहमी घेता म्हणून ? पण डॉक्टरच म्हणाले की—

**प्रियदर्शन :** काय म्हणाला तो डॉक्टर ? दारू पिऊन मी बेहोष झालोय म्हणून. स्वतः पिऊन बिऊन नव्हता ना आला हा डॉक्टर ? सरकारी मेजवानीला दारू ? तो डॉक्टर एक शहाणा आणि तू...

**नंदिनी :** ( फणकाऱ्याने ) शहाणपणा काढायला नको लागलीच कोणाचा ! काल रात्रीची तुमची अवस्था बघून कोणालाही तस्संच वाटलं असतं, बरं का ?

**प्रियदर्शन :** ( दचकून ) अवस्था बघून ? माझी अवस्था बघून ? कोणती अवस्था ?

काय पाहिलंस तू काल ?

**नंदिनी :** घटकाभर शुद्ध तर नव्हतीच पण डॉक्टर म्हणत होते की किती तरी वेळ नाडीसुद्धा लागत नव्हती. घाबरून गेले होते मी तरी बाई.

**प्रियदर्शन :** आता शंकेला जागाच उरली नाही !

**नंदिनी :** अहो, डॉक्टरना काही निदानच होईना. म्हणजे ते म्हणाले नाही तसं, पण—

**प्रियदर्शन :** साहजिक आहे. त्यांच्या निदानाच्या पलीकडचाच होता तो प्रकार !

**नंदिनी :** होय ना ऽऽ ! आता चारुताईंचं नाटक म्हणून त्या थिएटरवर गेलेल्या. धनंजय कारखान्यात गेलेले. मिळून ऐनवेळी बंगल्यावर पुन्हा मी आपली एकटी. मेला फोनसुद्धा नीट लागेना कोणाला.

**प्रियदर्शन :** हू ! पूर्वयोजनाच असली पाहिजे तशी !

**नंदिनी :** ( हसत ) पूर्वयोजना ? कोणाची पूर्वयोजना ?

**प्रियदर्शन :** ऐकायचंय तुला ? बैस इथं अशी. मला मदत केलीस तर हा सगळाच प्रश्न सुटायला फार मोठं साहाय्य होईल !

**नंदिनी :** कसला प्रश्न ? कोणती मदत ? लवकर सांगून टाका बाई. आधीच उशीर झालाय मला गौरीशंकराच्या मंदिरात जायला.

**प्रियदर्शन :** ( विस्मयाने ) गौरीशंकराच्या मंदिरात ? तू... तू ?

**नंदिनी :** महाशिवरात्र आहे आज. इथल्या रेजिमेन्टच्या कमांडरीण बाईदेखील नेमानं येतात म्हणे गौरीशंकराच्या मंदिरात, इतकं जागृत दैवत आहे. तुमच्यासाठी अंगारा आणि तीर्थ आणणार आहे आज !

**प्रियदर्शन :** ( रागाने ) माझ्यासाठी ? त्या शंकराचा अंगारा आणि तीर्थ ? बैस इथं अगोदर. ( ओरडून ) बैस म्हणतो ना ? ( ती घाबरून मटकन् बसते. सुगावा घेऊन तिच्याशेजारी ठाण मांडीत, एखादी महत्त्वाची वार्ता सांगावी तशा गंभीरपणाने ) काल रात्री, माझा देह निपचित पडला म्हणालीस ना, त्या वेळी— नीट लक्ष दे, नखं मग कुरतड, नेमक्या त्या घटकेला, मी कोठे होतो अशी कल्पना आहे तुझी ?

**नंदिनी :** कुठं म्हणजे ? माडीवर झोपायच्या खोलीत ? ( प्रियदर्शन मानेनेच ' नाही नाही ' असे म्हणतो. ) म्हणजे प्रत्यक्ष डोळ्यानं बघत होते मी आणि—

**प्रियदर्शन :** अग आत्म्याचा प्रवास डोळ्यांना कसा दिसेल ? मूर्खासारख्या मध्येमध्ये शंका विचारू नकोस. नीट लक्ष दे. (आकाशात बोट दाखवीत) वऽऽर. काय समजलं ? वऽर— वर गेलो होतो मी. आलं लक्षात ?

**नंदिनी :** ( तितक्याच निर्बुद्धतेने जिन्यातून वर बघत ) होऽऽ ! म्हणजे गच्चीवर ना ?

**प्रियदर्शन :** ( चुकचुकत ) नव्हे ग. वऽर, वऽऽर, अगदी वऽऽर ? कसं सांगू तुला ? पार अस्मानात— ( हलकेच ) स्वर्गात.

**नंदिनी :** ( विस्मयाने उठत ) काय म्हणालात ? स्वर्गात ?

**प्रियदर्शन :** हं हं. अग मोठ्यानं बोलू नकोस ! ( पुन्हा हलकेच ) देवांच्या स्वर्गात ( नंदिनी थक्क होऊन " आ—? " करते. तोच नाकावर बोट ठेवून ' शूऽऽ ' करीत प्रियदर्शन ) बोलावणं आलं होतं मला !

**नंदिनी :** स्वर्गातून का बोलावणं आलं होतं तुम्हांला ? आ हा हा, दिवे ओवाळा ! स्वर्गातून बोलावणं यायला तुकारामाचे अवतारच लागून गेला की नाही आपण ? इश्श ! काही जिभेला हाड तरी ? चांगलं खाता पिता जिवंतपणी असली कसली मेली अभद्र हौस ?

**प्रियदर्शन :** गैरसमज झालाय तुझा. म्हणजे मी मी...माझं...म्हणजे तसं काही बरं वाईट झालं नव्हतं माझं ?

**नंदिनी :** ते दिसतंच आहे. उचलली जीभ लावली टाळ्याला. सुट्टीत सिमल्याला जाऊ या म्हणत होते तर ते झालं नाही आणि म्हणे स्वर्गात गेलो होतो. ऐकून घ्यायला लागलं म्हणजे फारच करायचं. कुठं गेला नव्हता बरं तुम्ही ! चांगले रात्रभर घोरत पसरला होता तुम्ही पलंगावर !

**प्रियदर्शन :** ( चुकचुकत ) अग तो मी नव्हे.

**नंदिनी :** बाई बाई बाई ! तुम्ही नव्हे ? पलंगावर तुम्ही निजला नव्हतात ?

**प्रियदर्शन :** तो माझा देह ! ( ती थक्क होऊन बघतच राहते. ) बघतेस काय अशी ? छे छे छे, तुम्हा बायकांना देह आणि आत्मा यांची गल्लत करायची भारी खोड !

**नंदिनी :** हूंऽऽ ! बघायलाच नको. काल्ची पार्टीच बाधली तुम्हांला ? ( उठून जवळ जात ) चला माडीवर. आधी थोडं ताक प्या आणि स्वस्थ पडून राहा, आजच्या दिवस तरी. ( ती त्याच्या हाताला धरू लागते. )

**प्रियदर्शन :** ( तिला दूर सारीत, रागाने ) स्वस्थ पडून राहण्यासाठी मी आलो नाही, समजलीस ?

**नंदिनी :** बरंऽऽ ! आमच्यावर उपकार करण्यासाठी आला आहात, मग तर झालं ? कबूल आहे मला. चला. ( त्याच्या हाताला धरून ओढीत ) असं काय करावं गडे, चला अगोदर माडीवर. तुम्हांला पूर्ण विश्रांतीची गरज आहे, असं डॉक्टर म्हणाले होते.

**प्रियदर्शन :** ( सोडवून घेत, ओरडून ) विश्रांती ? आणि तीदेखील या घटकेला ? अग सबंध मानवजातीच्या मुक्ततेचा क्षण आला आहे, आणि तू मला—

**नंदिनी :** हो हो हो, पण बरं वाटल्यावर कोणी नको का म्हणतंय मानवजातीची मुक्तता करायला ! उद्या करा, परवा करा; पण आज मी तुम्हाला काहीएक करू द्यायची नाही. चला मुकाट्यानं वर. ( ती त्याच्या हाताला धरून ओढू लागते. प्रियदर्शन हिसडा मारून तिला दूर ढकलतो. )

**प्रियदर्शन :** ( ओरडतो. ) तू...तू...नंदिनी, तू मला काहीएक करू देणार नाहीस ? माझी बायको तू— ऐन वेळी तू माझा असा घात करणार ?

...३

**नंदिनी** : ( रागाने ) शिरा ताणून एवढं ओरडायला काय झालं हो ? ज्याचं करावं बरं तो म्हणतो माझंच खरं ! ( फणकाऱ्याने ) नसेल ऐकायचं तर हव्वं ते करा, जा ! आजच्या आज भाऊंनाच तार करून बोलावून घेते दिल्लीहून, आणि सांगते, सांभाळा आपल्या लाडक्या लेकाला. ( फणकाऱ्यातच बाहेर निघून जाते. )

**प्रियदर्शन** : ( तिच्या पाठोपाठ व्हरांड्यापर्यंत जात ) नंदिनी, नंदिनी, मी काय सांगतो ते ऐक ? ( तिची फणकाऱ्याने बाहेर जाणारी पाठमोरी मूर्ती पाहून एकाएकी त्याला विस्मयाचा धक्का बसतो. ) विद्युल्लता ! शंकाच नको ! ( क्षणार्ध ती गेलेल्या दिशेने चकित होऊन बघत राहतो. ) थेट माझ्या संसारात देवांची पंचमस्तंभी कारवाई ? डॅम इट् ! ( हातातली जळती सिगरेट भिरकावतो. ) आणि हिच्या सहकार्यावर मी माझ्या बेताचे मनोरे उभारत होतो.

[ तेवढ्यात फोनची घंटा खणखणू लागते. माडीवरून कोठून तरी चारुशीला : "विठोबा, कोणाचा फोन आहे बघ रे ?" प्रियदर्शन मागे वळून फोन घेतो.]

**प्रियदर्शन** : ( फोनमध्ये ) हॅलो...कोण आहे... ? मी कॅप्टन प्रियदर्शन कीर्तिकर, पार्डन ?...मुख्यमंत्री ? हं हं, मुख्यमंत्र्यांचे चिटणीस ! मला वाटलं...( हसतो. ) नमस्ते. बोला, काय आज्ञा आहे ? गव्हर्नरसाहेब ? अस्सं म्हणजे आमचे भाऊ ? गव्हर्नरसाहेब म्हणालात, म्हणून लक्षात नाही आलं एकदम !...ते बरोबर आहे, पण भाऊ दिल्लीला !...ऊं ? नाही, इथं तरी काही पत्र नाही त्याचं...हूं...हूं... हू...ऊं ? मागच्या आठवड्यात आलो तर येईन असं कळवलं होतं त्यांनी. मग बेत का रद्द झाला कोण जाणे ! हूं...हूं , बरं ते ठीक आहे, पण येणार असते तर आमच्या अगोदर सचिवालयातच मेसेज आला नसता का ? हूं...हूं...राजीनामा ? गव्हर्नरपदाचा राजीनामा ? दॅट्स न्यूज ! नाही, आजचे पेपर्स पाहिले नाहीत अजून मी...हूं...हूं... असं असं, ..बरं आहे मग...जयहिंद !

[ रिसीव्हर खाली ठेवून विचारमग्न मुद्रेने मागे वळतो. तोच जिन्यातून चारुशीला प्रवेशते. रूपाने सुंदर,वृत्तीने कलावेडी. नुकतीच झोप झाल्यासारखा अवतार असला तरी तिचे लावण्य लपत नाही. रडून रडून डोळे सुजले आहेत, लाल झाले आहेत, पण बोलण्याचालण्यात मनातले मंथन लपविण्याची निष्फळ धडपड अगदी उघड दिसते. ]

**चारुशीला** : ( जिन्यातूनच ) कोणाचा फोन होता रे प्रिया ? यांचा ?

**प्रियदर्शन** : ( आपल्याच तंद्रीत ) ऊं हूं ! मुख्यमंत्र्यांच्या चिटणिसांचा !

**चारुशीला** : ( खाली येत ) आठ वाजून गेले, तरी पत्ता नाही. काही घरादाराची शुद्ध आहे का पाहा !

**प्रियदर्शन** : ऊं ? ( चपकून ) मुख्यमंत्र्यांच्या चिटणिसाला घरादाराचीदेखील शुद्ध नाही ?

**चारुशीला** : नव्हे यांना ! तिन्ही त्रिकाळ कारखाना, कारखाना, कारखाना !

**प्रियदर्शन :** हां— म्हणजे धनंजय—!

**चारुशीला :** नाहीतर काय ? माझं एक ऐकून दे. पण कधी नव्हे ते घरात तुम्ही दोघे पाहुणे आलात त्याची तरी काही आठवण ? त्यातून तुझी प्रकृती ही अशी—!

**प्रियदर्शन :** ' ही अशी ' म्हणजे ? झालंय काय माझ्या प्रकृतीला ? त्या माउलीनं कालचा प्रकार घातला वाटतं तुझ्या कानावर ?

**चारुशीला :** घालील नाही तर काय ? एवढा गोंधळ घातलास तू काल रात्री ?

**प्रियदर्शन :** गोंधळ मी घातला ? आता कमाल झाली ! अग गोंधळ घालणाऱ्या त्या आमच्या पत्नी; मी नव्हे बरं का ? एखाद्याचा कानफाट्या करायचा याचा अर्थ काय ? मी नुसता निपचित पडून राहिलो होतो.

**चारुशीला :** निपचित पडून काय ध्यानधारणा करीत होतास वाटतं ? तू प्रकृतीची अशी हेळसांड करतोस आणि मग नंदिनी बिचारी घाबरून जाते.

( प्रियदर्शन कपाळाला हात लावीत ' नशीब माझं ' असा आविर्भाव करीत वहीत पुन्हा नोंदी करू लागतो.क्षणार्धाने चारुशीला विचारते— ) मुख्यमंत्र्यांच्या चिटणिसांनी कशाला फोन केला होता ?

**प्रियदर्शन :** चौकशी करीत होते भाऊ कधी येणार आहेत त्याची ! मुख्यमंत्र्यांना फारच तहान लागलेली दिसतेय भाऊंची.

**चारुशीला :** त्यात नवीन काय आहे ? गंडांतरं यायला लागली म्हणजे सगळ्यांनाच भाऊंची तहान लागते.

**प्रियदर्शन :** काल रात्रीपासून काही तरी चमत्कारिक घटना घडायला लागल्या आहेत राजधानीत. भाऊंनी राजिनामा दिलाय गव्हर्नरपदाचा असं चिटणीस सांगत होते.

**चारुशीला :** दिला असला राजिनामा तर त्यात काही आश्चर्य वाटत नाही मला. अधिकाराचं सुख अंगी लावून घ्यायचं रक्तातच नाही त्यांच्या. आता बसतील जाऊन पुन्हा जोगाइच्या आश्रमात कष्ट उपसत !

**प्रियदर्शन :** ( उत्साहाने ) असं खरंच वाटतं तुला ?

**चारुशीला :** ( विषादाने ) वाटतं नव्हे, खात्रीच आहे माझी. मागच्या खेपेला भाऊ आले होते त्याच वेळी मला सांगत होते. ( ते ऐकून प्रियदर्शन वहीतल्या एका नोंदीवर खुषीत टिकमार्क करतो. )

**प्रियदर्शन :** ( खुषीत ) दॅट्स व्हेरी फाइन ! पहिल्या सपाट्यात ही लढाई जिंकली तर मग आणखी काय पाहिजे.

**चारुशीला :** कसली लढाई ? व्हेरी फाइन काय ?

**प्रियदर्शन :** ( मान वर करून ) ऊं ? काही नाही. तुझा संबंध नाही त्यात. ( वही मिटवून खिशात घालीत ) तू केव्हा परत आलीस काल रात्री ?

**चारुशीला :** नाटक संपायलाच मुळी एक वाजला. मेकअप उतरवून बंगल्यावर येई-पोत्तर दोन वाजले.

**प्रियदर्शन :** नाटक कसं झालं हे विचारण्यातच अर्थ नाही. तू डायरेक्ट केलेलं आणि शिवाय तुझं मुख्य काम म्हणजे ( तिला न्याहाळत ) हे काय ? डोळे सुजलेले दिसताहेत तुझे ताई ?

**चारुशीला :** ( चमकून ) डोळे ? ( हसून सावरीत ) जागरणामुळं असतील.

**प्रियदर्शन :** नुसत्या जागरणाची दिसत नाही ही सूज ?

**चारुशीला :** ( हसून ) मग काय ? डोळे का येणार आहेत माझे ?

**प्रियदर्शन :** ( रोखून बघत ) ताई, तू रडत होतीस रात्रभर ?

**चारुशीला :** मी ? वेडा तर नाहीस ? ( हसते, पण त्यातही व्यथा लपत नाही. ) अरे भरल्या संसारात सुखासुखी रडायचं रे काय कारण आहे मला ? काही तरीच तुझे तर्क !

**प्रियदर्शन :** भरला संसार ? इतके दिवस राहतो आहे मी तुझ्या घरी, पण मला कुठं भरलेला दिसला नाही बुवा तुझा संसार ? मला आपल्या शोभेच्याच वस्तू पुष्कळ दिसताहेत या घरात ?

**चारुशीला :** ( कडवटपणाने ) त्यातलीच मी एक बायको ! झालं समाधान ?

**प्रियदर्शन :** ताई—

**चारुशीला :** काही तरीच विचारीत बसतोस, मग काय उत्तर द्यायचं माणसानं ?

[ तेवढ्यात बाहेर शामसुंदरचा आवाज ऐकू येतो. " बाईसाहेब उठल्या का रे ?... साहेब कारखान्यात ? म्हणजे अजून परतलेच नाहीत घरी ? " अशी शामसुंदरनी केलेली चौकशी ऐकू येते. त्या क्षणी प्रणयिनीसारखी हर्षभरित होऊन, चारुशीला " अगबाई, शामसुंदर ? इतक्या सकाळी आलात ? " असे उद्गारून बाहेर धावते. तिच्याकडे लक्षपूर्वक बघणारा प्रियदर्शन चुकचुकत मान हालवीत जिन्याच्या बाजूला जाऊन पुनः वहीत नोंदी करू लागतो. बाहेरून येणाऱ्या माणसांना अर्थातच सहजगत्या तो उभा असलेला दिसणे शक्य नाही. तेवढ्यात हसत बोलत चारुशीला आणि शामसुंदर प्रवेशतात. शामसुंदर खेळाडू आहेत, कलावंत आहेत आणि 'चारुशीला इंडस्ट्रीज 'मध्ये लेबर ऑफिसर आहे. पण रूपात मदनाची आणि पोशाखात, हावभावात आणि संभाषणचातुर्यात मदनवृत्तीची सहज ओळख पटावी. शामसुंदरच्या हातात ताज्या वर्तमानपत्रांचा भारा आहे. ]

**शामसुंदर :** तुला इथं सोडलं आणि थेट बीचवर जाऊन बसलो होतो उजाडेपर्यंत.

**चारुशीला :** अगबाई ! म्हणजे रात्रभर जागा होतास तू ?

**शामसुंदर :** कालच्या सगळ्या प्रकारानंतर झोप येणं शक्य तरी होतं का ? सकाळी घरी गेल्याबरोबर सगळी वर्तमानपत्रं पाहिली आणि तस्सा धावत आलो तुझ्या बंगल्यावर. पाहा, वाच एकदा ही वर्तमानपत्रं. तोंड फाटेपर्यंत स्तुती केलीय तुझी या सगळ्या पत्रकारांनी.

**चारुशीला :** आणि तुझी ?

**शामसुंदर :** महादेवाच्या दर्शनाबरोबर नंदीला हात लावतात तसा माझाही उल्लेख आहे.

**चारुशीला :** असं का म्हणतोस ? माझं कौतुक हा वर्तमानपत्रांचा नित्याचाच परिपाठ आहे. पण काल तुझ्या गुणांचं प्रेक्षकांनी आणि पत्रकारांनी चीज केलं तेव्हा मला माझ्या सगळ्या श्रमांचं सार्थक झाल्यासारखं वाटलं.

( वर्तमानपत्रे घाईघाईने चाळू लागते. शाम तिच्याकडे टक लावून बघत राहतो. त्याच वेळी प्रियदर्शनही त्या दोघांकडे लक्षपूर्वक बघतो. )

**चारुशीला :** अय्या ऽ ! हे पाहिलंस का ? आपल्या दोघांचा फोटोदेखील आलाय् छापून ! काढला केव्हा, ब्लॉक्स कधी केले आणि छापला केव्हा– सगळा चमत्कारच आहे बाई !

**शामसुंदर :** तुझ्या फोटोसाठी प्रेसच्या लोकांनी केली असली एवढी धावपळ तर त्यात काही आश्चर्य नाही. आता तू काही नुसती एका कारखानदाराची बायको राहिलेली नाहीस. श्रेष्ठ कलावंतांच्या श्रेणीत तुला केव्हाच मानाचं स्थान प्राप्त झालंय, समजलीस ? तुला एक गंमत दाखवू का चारू ? हा हा पॅरिग्राफ वाच–( एक वर्तमानपत्र उघडून तिच्यासमोर नेत तिला त्यातील एक परिच्छेद दाखवू लागतो. असे करताना अगदी सहजगत्या तिच्या अंगाशी केलेली लगट आणि तिच्या हाताला स्पर्श करण्याची साधलेली संधी प्रियदर्शनच्या काक-नजरेतून सुटत नाही. स्पर्श होताच चारु दचकून ' हां हां ' असे उद्गारून मोठे डोळे करीत दूर होते. शामसुंदर चपापून मागे पाहतो आणि प्रियदर्शनची आणि त्याची दृष्टभेट होते. शामसुंदर वरमतो, पण मग लागलीच स्वतःला सावरीत– )

**शामसुंदर :** ओ हो ! कोण कॅप्टन प्रियदर्शन की काय ? मीटिंग आफ्टर एजिस ?

**प्रियदर्शन :** हॅलो शामसुंदर ! सो ग्लॅड टु मीट यू. ( शेकहँड करतात. )

**शामसुंदर :** व्हेरी सॉरी. मी पाहिलंच नाही तुम्हाला !

**प्रियदर्शन :** डोन्ट यू वरी, मीदेखील ' काही एक ' पाहिलं नाही.

**शामसुंदर :** ( चापून ) ऊं...ऊं...?

**प्रियदर्शन :** ( हसून ) फर्गेट इट् ! पण बराच फरक पडलाय तुमच्यात, नाही शामसुंदर ?

**शामसुंदर :** ( स्वतःकडे बघत ) फरक ? हा हा– ती सगळी या बाईसाहेबांची कृपा.

**प्रियदर्शन :** बाईसाहेबांची कृपा ? म्हणजे ?

**शामसुंदर :** दोन वर्षांपूर्वी आपली भेट झाली होती त्या वेळी नोकरीसाठी वणवण करत हिंडणारा मी एक बेकार तरुण होतो. सध्या आहे मी लेबर ऑफिसर ' चारुशीला इंडस्ट्रीज '.

**प्रियदर्शन :** ओ, आय सी !

**शामसुंदर :** बाईसाहेबांच्या खास रेकमेंडेशनवरून गेल्या वर्षी साहेबांनी नेमणूक केली माझी.

**चारुशीला :** तर तर, खरंच वाटायचं एखाद्याला ! नुसत्या माझ्या रेकमेंडेशनवरून तुझी नेमणूक करायला तुमचे साहेब काही एवढे बाईलवेडे नाहीत. कारखान्याचं हिता-हित त्यांना चांगलं कळतं.

**शामसुंदर :** मग काय, कामगार चळवळीतला माझा मोठा अधिकार जाणून का त्यांनी मला नेमलं ! माझ्या नेमणुकीच्या वेळी केवढा शंख केला होता त्या कामगार-पुढाऱ्यांनी ते लक्षात आहे ना आपल्याला बाईसाहेब ?

**चारुशीला :** आणि तरीदेखील केवळ क्रिकेटमधल्या तुझ्या नैपुण्यावर भाळून यांनी तुझी नेमणूक कशी केली तेही चांगलं लक्षात आहे माझ्या.

**प्रियदर्शन :** अस्सं, म्हणजे तुम्ही क्रिकेटदेखील खेळता का ?

**शामसुंदर :** तसे पुष्कळ खेळ खेळतो मी. पण खरं सांगायचं तर आम्ही आहोत आपले जॅक ऑफ ऑल ट्रेड्स ! अहो, कुठं सहजस्फूर्त प्रतिभेचा उन्मेष आणि कोणीकडे कमावलेला कसबीपणा !

**चारुशीला :** झाली पुन्हा भाटगिरीला सुरुवात.

**प्रियदर्शन :** पण हा खेळ जरा जपूनच खेळा तुम्ही शामसुंदर.

**शामसुंदर :** कोणता खेळ ?

**प्रियदर्शन :** कोणताही नेमबाजीचा ! नेमबाजीचा खेळ म्हणजे जरा धोक्याचाच, नाही का ? म्हणजे आम्हा पामर मानवांबद्दल बोलतोय हो मी !

**चारुशीला :** (रागाने) प्रिया –

**प्रियदर्शन :** त्याचं असं आहे शामसुंदर, बाण मारणारे मारून जातात मोठ्या मजेत पण घायाळ होणारे मात्र सापडतात जनरीतीच्या फुंफाट्यात.

**चारुशीला :** लोकांच्या उटाठेवी पुष्कळ झाल्या. अजून सकाळच्या औषधाचा डोसदेखील घेतला नाहीस तू प्रिया ?

**प्रियदर्शन :** ( तिला रोखून बघत ) अस्सं ! म्हणजे तुमचं खाजगी बोलणं अजून संपलेलं दिसत नाही. ठीक आहे. आपण काय – औषध पिऊ ( जिन्याने जाता जाता वळून ) पण माझी प्रकृती निदान तुमच्या पथ्यावर पडली हे काय कमी झालं ?

**चारुशीला :** ( रागाने ) प्रिया ! प्रिया ! प्रिया ! —

**प्रियदर्शन :** (वहीवर भली मोठी फुली मारीत) ही लढाई बहुतेक हातची गेली. हॅटस् ऑफ टू हेवन्स ! (असे पुटपुटत जातो.)

**शामसुंदर :** ( प्रियदर्शन गेलेल्या दिशेकडे डोळे विस्फारून बघत ) चमत्कारिकच दिसतो आहे तुझा भाऊ ! डोकंबिकं ठिकाणावर आहे ना त्याचं !

**चारुशीला :** आधीच विक्षिप्त आणि काश्मीरच्या आघाडीवर आजारी पडून परतल्यापासून डोकं फार हलकं झालंय त्याचं.

**शामसुंदर** : नाही म्हणजे सैन्यात भरती होण्याऐवजी कवी झाला असता हा इसम तर—

**चारुशीला** : कवीच होता तो. कॉलेजमध्ये असताना किती सुन्दर कविता करीत होता प्रिया— !

**शामसुंदर** : मग या कविराजांना असल्या हडेलहप्पी पेशात कोणी अडकवलं ? तुझ्या वडिलांनी ?

**चारुशीला** : नव्हे, आमच्या आजोबांनी. राजकारणाच्या उलाढालीपुढं भाऊंना स्वतःच्या संसाराची आठवण होती कधी ! माझं लग्न आणि प्रियाचा पेशा— ( सुस्कारते. ) दैवाचेच फासे उलटे पडले तर दाद कोणाकडे मागायची ?

**शामसुंदर** : स्वतःच्या अंतःकरणाला.

**चारुशीला** : काय म्हणालास ?

**शामसुंदर** : अन्तःकरणाच्या प्रेरणेपुढे जगातले सगळे धरबंध तुच्छ मानतो मी चारू.

**चारुशीला** : म्हणून आपली शपथ मोडून काल तू—( थांबते. )

**शामसुंदर** : बोल बोल, थांबलीस का ? असा कोणता अनर्थ घडला माझ्या हातून ते तरी कळू दे.

**चारुशीला** : अनर्थ अजून घडला नाही. पण आता माझ्यावरचा विश्वास उडालाय,

**शामसुंदर** : म्हणजे ?

**चारुशीला** : आजवर तू एवढा पोलादी संयम दाखवलास आणि कालच मला कशा-साठी मोहात पाडलंस ?

**शामसुंदर** : माझ्या प्रांजळ भावनेचा तुला धिक्कार करायचा असला तर खुशाल कर. पण स्पर्शावाचून प्रणयाची पूर्तता होऊ शकत नाही याची काल एका क्षणात मला प्रचीती आली.

**चारुशीला** : मोहाचा क्षण होता तो.

**शामसुंदर** : नव्हे, प्रीतीच्या विराट दर्शनाचा साक्षात्कार होता तो.

**चारुशीला** : तुला सारी दुनियाच उलटी दिसायला लागली आहे का ? मी विवाहित स्त्री आहे हे तू विसरलास शाम ?

**शामसुंदर** : माहीत आहे मला. पण तुझं प्रेम नाही माझ्यावर ? सांग ! एखाद्या चमत्कारानं माझ्याशी लग्न करायची संधी मिळाली तर माझ्याकडं काय पाठ फिरवशील तू ?

**चारुशीला** : उगीच भलतं सलतं बोलून माझ्या मनातलं मोहोळ डिवचू नकोस. पावलागणिक असले चमत्कार घडायला आयुष्य म्हणजे काही पऱ्यांची सृष्टी नव्हे.

**शामसुंदर** : चमत्कारानं साध्य होत नाही ते जगाशी बंडखोरी करून हिसकावून घेतलं पाहिजे.

**चारुशीला** : ( विकलतेने ) असं बोलू नको शाम. मला तुझी भीती वाटते.

( तेवढ्यात मोटरचा हॉर्न ऐकू येतो. )

**शामसुंदर** : ( दचकून घड्याळात बघत ) आली वाटतं मंडळी.

**चारुशीला** : ( विस्मयाने ) मंडळी ? कोण मंडळी ? ( धनंजयाची " चारू, अग चारू " अशी हाक ऐकू येते. " अगबाई, हे आले ? " असे उद्गारून गृहिणीच्या लगबगीने बाहेर जाते. )

**शामसुंदर** : साहेब आले !

[ व्हरांड्यापाशी जाऊन बघू लागतो तोच जिन्यातून औषधाचा पेला घेऊन प्रियदर्शन प्रवेशतो. ]

**प्रियदर्शन** : ( शामसुंदरकडे बघून ) ऊं ? तुम्ही एकटेच ?

**शामसुंदर** : हो, म्हणजे चारू— ( बाहेर बोट दाखवतो. )

**प्रियदर्शन** : असं असं ! धनंजय आले वाटतं ! मग— गडबडीनं आटोपतं घ्यावं लागलं असेल तुम्हाला, नाही ?

**शामसुंदर** : काय ?

**प्रियदर्शन** : आपलं शरसंधान. ( त्या क्षणी शामसुंदर वर्तमानपत्राची गुंडाळी रागाने आपटतो. ) अरे अरे, राग आला वाटतं ?

[ असे हसत उद्गारत कोचावर बैठक मारीत वहीपेन्सिल काढून नोंदी करण्याचे काम चालू करतो. इतक्यात धनंजय गडगडीने येतात. पोषाख साधा, किंचित गबाळ आणि अतिशय मळलेला. धनंजय चाळिशीच्या सुमारचे असावेत. त्यांच्या मुद्रेवर कष्टाच्या खुणा दिसतात; आणि बोलण्याचालण्यात यंत्राच्या सतत सहवासाची छाप उमटलेली दिसते. त्यांचा उजवा हात कोपरापर्यंत प्लॅस्टरमध्ये आहे. धनंजयांच्या बरोबरच चारुशीला प्रवेशते. ]

**चारुशीला** : पाहिलंस, शामसुंदर, केवढा उपद्व्याप करून ठेवलाय यांनी तो ?

**शामसुंदर** : म्हणजे ? काय भानगड झाली ?

**धनंजय** : अग त्यात उपद्व्याप कसला चारू ? यंत्राचा अपघात म्हटला म्हणजे किरकोळ इजा व्हायचीच !

**चारुशीला** : ही काय किरकोळ इजा का ? अहो एवढा ॲक्सिडेन्ट झाला, तेव्हा निदान फोन तरी करायचा नाही का मला ?

**शामसुंदर** : म्हणजे हात फ्रॅक्चर झाला वाटतं ?

**धनंजय** : उगीच लहानसा तडा गेलाय. पण डॉक्टर म्हणाले, प्लॅस्टरमध्ये घाला हात. म्हटलं द्या टाकून. उजवा हात नाही तर आपण डाव्या हातानं काम रेटू. आहे काय त्यात ! ( असे म्हणत डाव्या हातानेच सिगारेट-केसमधील सिगारेट काढून तोंडात ठेवतात आणि लाइटरने पेटवतात. )

**चारुशीला** : पण हात बरा होईतोवर विश्रांती काही घेणार नाही, असंच ना ?

**धनंजय** : ( कोचावर बसून बूट काढू लागतात. चारुशीला मदत करते. ) कारखान्यात

एक्स्पानशन्ची जगड्व्याळ योजना पसरून बसलो आहे मी, अणि तू मला ‘ विश्रांती घ्यायला सांग. तुला कसं समजत नाही चारू ? कारखानदाराच्या कोशात विश्रांती या शब्दाला मुळी जागाच नाही. हा माझा अवतार पाहा. रात्रभर यंत्राशी झगडलो तेव्हा सकाळी कारखाना चालू झाला. गलेलठ्ठ पगार घेतात लेकाचे एंजिनीयर्स; पण यूसलेस ! सगळी मशिन्स मला खोलावी लागली, आहे माहीत ?

**चारुशीला :** तुम्हाला नाही तरी यंत्र खोलायची आणि जोडायची म्हणजे ब्रह्मानंद !

**धनंजय :** फिटर म्हणून कामाला आरंभ केलाय मी याच कारखान्यात. सुशिक्षित माणसासारखी नुसती कपड्याची कडक इस्त्री सांभाळून निभायचं नाही माझं !

**चारुशीला :** कळलं ! यंत्राशी धडपडला नसतात तर जशी काही माझ्या घरची चूलच खोळंबणार होती ?

**धनंजय :** अग तुझ्या घरची नाही तरी त्या किसनच्या घरची चूल नक्कीच थंड झाली असती आज, आहे माहीत ? यंत्राशी मी धडपडलो म्हणून तो आज जिवंत तरी राहिला. समजलीस ?

**शामसुंदर :** म्हणजे ? किसननं काय घोटाळा केला ?

**धनंजय :** अतिशहाणे ! गेले यंत्राशी सलगी करायला आणि सापडला पट्ट्यात हात.

**चारुशीला :** अगबाई ! आणि मग ?

**धनंजय :** मग काय ? ‘ गेला गेला, किसन यंत्रात गेला—’ म्हणून सगळ्या कामगारांनी शंखध्वनी केला. पण पुढं होऊन फिरत्या चाकावरचा पट्टा ओढून काढायची काही हिंमत होईना कोणाला—असले नरकेसरी आहेत आमच्या कामगारवर्गात !

**प्रियदर्शन :** ( ताड्कन् उठत ) म्हणजे ? धनंजय, तुम्ही स्वतः फिरत्या चाकावरचा पट्टा ओढून काढलात ?

**धनंजय :** अरे प्रिया आहे काय त्यात ? तू असतास तरी तेच केलं असतंस. बसला एक झणझणीत धक्का आणि तीन ताड उडून कोसळलो फरशीवर. पण पोरगा वाचला की नाही ?

**चारुशीला :** अगबाई ! आणि भलतं सलतं काही झालं असतं तर ?

**शामसुंदर :** कशाला वाचवलात त्या किसनला ? मरू द्यायचा होता. रास्कल, मागच्या संपात हाच किसन तुमच्या जिवावर उठला होता, माहीत आहे ना साहेब ?

**धनंजय :** अरे त्याचं पाप त्याच्याबरोबर, म्हणून माझ्या यंत्रात मी त्याला मरू देऊ की काय ? शामसुंदर, तुम्ही कलावंत आहात. खेळाडूदेखील आहात मोठे, पण कारखानदाराचा दिल नाही तुमच्यापाशी ! चारू जा, पळ, टॉवेल घेऊन ये. दोन दिवसांत आंघोळ नाही तर निदान वॉश तरी घेऊ. तसंच माडीवरून वॉर्डरोबमधून माझा रेशमी झब्बा आणि धोतर घेऊन ये.(घड्याळात बघत) हे काय, नऊ वाजायला आलेच.

**चारुशीला :** आता कुठं निघालात आणखी ? पायावर चक्रच पडलंय की काय

तुमच्या ?

**धनंजय :** बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची मीटिंग आहे आत्ता महत्त्वाची.

**चारुशीला :** अहो पण–

**धनंजय :** पण नाही न् बीण नाही. मीटिंग आहे म्हणजे गेलं पाहिजे. विठोबा कुठं गेला ? त्याला सांग की माझ्या टेबलावर फाइल्स पडल्या आहेत तेवढ्या गाडीत नेऊन ठेव. ( चारुशीला जाऊ लागते. ) आणि हे पाहा, सेफमधून माझं चेकबुक आणि पेन काढून पोर्टमेंटोमध्ये घालून ठेवायला विसरू नकोस हं ?

**चारुशीला :** चहा घेण्याइतका तरी वेळ आहे का ?

**धनंजय :** तयार असला तर पिण्याइतका आहे. तयार होईपर्यंत थांबण्याइतका नाही. ( " नेहमीचंच आहे हे " असे पुटपुटत चारू माडीवर जाते. अंगातला मळका शर्ट काढून कुठे तरी भिरकावीत धनंजय– ) शामसुंदर, नाटकं संपली की नाही अजून ?

**शामसुंदर :** होय साहेब.

**धनंजय :** मग तुम्ही आता इथं का रेंगाळता ? अगोदर ऑफिसकडं चला. त्या किसनची बायको अर्ज घेऊन येईल नुकसानभरपाईसाठी. मीच सांगितलंय तिला, तेव्हा—

**शामसुंदर :** आता आणखी कसली आली आहे नुकसानभरपाई ?

**धनंजय :** कच्चीबच्ची आहेत तिच्या घरी. किसनचे दोन्ही हात गारद झाले तर तिनं कोणाच्या तोंडाकडं बघावं ? तिला घ्या नेमून कोठल्यातरी खात्यात आणि ऑफिसला पाच हजारांचा चेक काढायला सांगा तिच्या नावाचा–

**शामसुंदर :** पाच हजाराचा चेक ? पाच हजार रुपये ? दॅट्स टू मच ! कायदेशीर नियमाप्रमाणंदेखील–

**धनंजय :** माझ्या कारखान्यात माझा शब्द हाच कायदा ! रेसिसला गेलो तर एकेका मीटवर याच्या चौपट रक्कम उधळतो मी आणि तुम्ही हजार हजार काय करीत बसला आहात ? जा लवकर– (शामसुंदर जातो. चारुशीला टॉवेल व इतर कपडे घेऊन प्रवेशते. तिच्या हातातलं सामान घेऊन जात– ) ' शहेनशहा ' होऊन बसले आहेत एकेक. अंग मोडून कामं करायला नकोत कोणाला. नोकरीवरून डिसमिस केले मी म्हणजे बसतील डोळे पांढरे करून ! यूसलेस् ! ( जातो. )

( धनंजय गेले असे पाहून नोंदी करण्यात मग्न झालेल्या प्रियदर्शनजवळ जाऊन )

**चारुशीला :** प्रिया, माझं ऐकणार आहेस का तू ?

**प्रियदर्शन :** बोला, काय आज्ञा आहे ताईसाहेब ?

**चारुशीला :** शामबद्दल यांच्यापाशी तू यत्किंचितही उल्लेख केलेला मला आवडणार नाही.

**प्रियदर्शन :** शामसुंदरशी तू यत्किंचितही संबंध ठेवलेला मला आवडणार नाही.

**चारुशीला :** (रागाने) तो माझा खाजगी आणि वैयक्तिक प्रश्न आहे.

**प्रियदर्शन :** भ्रमात आहेस तू चारू. आता हा प्रश्न केवळ तुझा खाजगी आणि वैयक्तिक राहिलेला नाही. संबंध विश्वाचा झालाय विश्वाचा, समजलीस ?

**चारुशीला :** विश्वाचा ? काय बडबडतो आहेस-काय प्रिया ?

**प्रियदर्शन :** "प्रतिभासंपन्न माणसांना क्षुद्र मोहपाशात पडायचा अधिकार नाही...." विश्वरहस्याचा स्पष्ट इशाराच आहे असा !

**चारुशीला :** (विस्मयाने) विश्वरहस्याचा ? कोणत्या विश्वरहस्याचा ?

**प्रियदर्शन :** भगवंतांनी सांगितलेल्या विश्वरहस्याचा !

**चारुशीला :** भगवंतांनी ! भगवंतांनी... म्हणजे...

**प्रियदर्शन :** होय, तेच. देवाधिदेव आपले भगवान विष्णु.

**चारुशीला :** ठिकाणावर आहे ना तुझं डोकं ?

**प्रियदर्शन :** माझं डोकं ठिकाणावरच आहे. पण तुझं मात्र त्या शामसुंदरच्या मागं पसार झालेलं दिसतंय !

**चारुशीला :** (रागाने) प्रिया—

**प्रियदर्शन :** बैस इथं, रागावू नकोस. मी काय सांगतो ते नीट ऐक. तुझ्या कसोटीचीच वेळ आहे ही चारू. तू पूर्णतेला पोचल्याखेरीज विश्वरहस्याचा साक्षात्कार तुला करून देता येणार नाही हे तर तुला पटतं ना ?

**चारुशीला :** आं ? काय– काय म्हणालास ?

**प्रियदर्शन :** आणि असल्या क्षुद्र मोहात तू गुरफटलीस तर पूर्णतेला कशी पोचणार, सांग पाहू ?

**चारुशीला :** (घाबरून) प्रिया, प्रिया तुला बरं वाटत नाही का ?

**प्रियदर्शन :** स्वर्गात जाऊन देवांना आव्हान देऊन आलोय मी चारू, म्हणून सांगतोय तुला—

**चारुशीला :** (किंचाळते.) नंदिनी...नंदिनी... अहो ऐकलंत का—अहो—अहो....

**प्रियदर्शन :** ओरडू नकोस. चांगला शुद्धीत बोलतो आहे मी. (जवळ जाऊन तिच्या खांद्यावर दोन्ही हात ठेवून तिला गदागदा घुसळतो.)

**चारुशीला :** नंदिनी ! नंदिनी ! अगं धाव. अहो... अहो...

[प्रियदर्शन चिडून हताशपणे कोचावर दाण्कन् अंग टाकून डोके धरून बसतो, तेवढ्यात बाहेरून नुकतीच परत येत असलेली नंदिनी आणि कपडे घालता घालता धनंजय धावाधाव करीत येतात.]

**नंदिनी :** (चारुशीलेला जवळ घेऊन सावरीत) काय झालं चारुताई ? ओरडतात का अशा ?

**धनंजय :** काय गडबड आहे ? कसला दंगा चालला आहे ?

**चारुशीला :** अहो, हा हा हा...

**नंदिनी :** काही वेडंवाकडं बरळले का हे? (भेदरलेली चारुशीला मानेने 'होय' म्हणून सांगते.)

**धनंजय :** म्हणजे? शिव्याबिव्या.तर नाही ना दिल्या? लष्करी माणूस हा!

**चारुशीला :** नव्हे हो. (आवंढा गिळते.)

**नंदिनी :** (संशयाने) स्वर्गाबिर्गाची भाषा काढली का यांनी?

**चारुशीला :** (सावरीत) होय होय, तेच! अग मला म्हणाला की स्वर्गात जाऊन देवांना आव्हान देऊन आलोय मी!

**नंदिनी :** वाटलंच मला! सकाळपासून ताळतंत्रच सोडलाय त्यांनी.

**धनंजय :** (मोठ्याने हसत) हात्तिच्या, एवढंच ना? मग त्यासाठी गळा काढून एवढं ओरडायला काय झालं? काय घाबरलो मी. मला वाटलं आमच्या कारखान्यालाच आग लागली वाटतं.

**चारुशीला :** तुम्हाला फक्त आपल्या कारखान्याचीच काळजी.

**धनंजय :** नेम नाही आमच्या कामगारांचा. त्यांचा संप ठेचून काढल्यापासून डोळ्यांत तेल घालून बसावं लागतं रात्रंदिवस. प्रिया, या वयात कसलं देव देव करीत बसला आहेस? माझं ऐक. देवबीव सब झूट आहे. पैसा हाच आजच्या युगाचा देव, आणि यंत्र ही त्याची पूजा, समजलास! अच्छा! बायू बाय मंडळी! (जाऊ लागतो– तोच आठवण होऊन मागे वळून) खरंच चारू, काल रात्री तुझं नाटक होतं नाही का?

**चारुशीला :** फारच लवकर आठवण झाली.

**धनंजय :** आम्ही रांगडी माणसं. त्या नाटकाबिटकातलं काही गम्य नाही आम्हाला. पण चांगलं झालं ना तुझं नाटक?

**चारुशीला :** व्हायचं तसं झालं!

**धनंजय :** तू खूष आहेस ना? मजेत आहेस ना? उत्तम! आता मी एकदम रात्रीच घरी येईन.

**प्रियदर्शन :** (धनंजय जाऊ लागतो– तोच उठून) थांबा धनंजय.

**धनंजय :** (थबकत) का रे बाबा?

**प्रियदर्शन :** बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या बैठकीला निघालात तुम्ही?

**धनंजय :** होय, का?

**प्रियदर्शन :** तुमच्या कार्यक्रमपत्रिकेवरील एका महत्त्वाच्या मुद्द्याबद्दल बोलायचं होतं मला तुमच्याशी.

**धनंजय :** कोणता मुद्दा?

**प्रियदर्शन :** कामगारांच्या मागणीबद्दलचा!

**धनंजय :** आय सी! आता तुझ्यामार्फत रदबदली आरंभली वाटतं या कामगार पुढाऱ्यांनी?

**प्रियदर्शन :** कामगारांच्या मागणीचा विचार अंतःकरणाच्या ओलाव्यानं तुम्ही

करावा अशी तुम्हाला विनंती आहे माझी.

**धनंजय :** अंतःकरणाच्या ओलाव्यावर कारखाना चालत नाही, प्रिया !

**प्रियदर्शन :** मग काय कामगारांच्या रक्तावर का कारखान्यातली यंत्रं फिरतात ?

(धनंजय एकदम क्रुद्ध होतात, पण राग आवरतात.)

**नंदिनी :** तुम्ही जरा गप्प बसाल का ? तुम्हाला हव्यात आहेत कशाला नसत्या उठाठेवी ?

**धनंजय :** (राग आवरीत) कारखाना आणि कामगार हा तुझा विषय नव्हे प्रिया ?

**प्रियदर्शन :** रागावू नका धनंजय, पण एका किसनसाठी तुम्ही जीव पणाला लावलात, मग कामगारांच्या कल्याणासाठी नफ्याची थोडी हाव सोडणं तुम्हाला अशक्य आहे का ?

**धनंजय :** म्हणणं काय तुझं ?

**प्रियदर्शन :** तुम्ही हट्ट धरलात तर तुमचे बाकीचे सहकारी तुमच्या शब्दाबाहेर जाणार नाहीत. तुम्ही वेडेवाकडे अमानुष निर्णय घ्यावेत म्हणून तुमचे हितशत्रू टपून बसले आहेत अगदी.

**धनंजय :** ते माहीत आहे मला, करून करून काय करतील हे कामगारपुढारी ?

**प्रियदर्शन :** कामगारपुढारी नव्हे हो— ! कसं सांगावं तुम्हाला ?

**धनंजय :** पुन्हा संप करतील एवढंच ना ? मागची आठवण विसरले तर खुशाल संप पुकारू देत. भुकेनं तडफडायची कामगारांची हौस तरी एकदा पुरी होऊ दे. सहा महिने पुरेल एवढा तयार माल शिल्लक आहे माझ्या गुदामात. संपाचा रागरंग दिसला तर मीच टाळेबंदी पुकारून मोकळा होईन, समजले आहेत काय ?

**प्रियदर्शन :** (काकुळतीने) तेच तेच— त्याच मरणाला भितोय मी. धनंजय, तुमच्या ...तुमच्या...कसं सांगू ? तुमच्या जीवनमरणाचा प्रश्न पणाला लागलाय म्हणून माझी तडफड होतेय हो.

**धनंजय :** (जीवनमरण या शब्दाने उघड गैरसमज होऊन कडाडतात.) कोणाची माय व्यालीय माझ्या अंगाला हात लावायची ? म्हणे जीवनमरणाचा प्रश्न ! या देहाला आखाड्यातली तांबडी माती काही कमी लागलेली नाही, समजलास ?

**प्रियदर्शन :** हाच— हाच तो महाभयानक अहंकार ! अहंकाराच्या मगरमिठीत सापडला आहात तुम्ही धनंजय ! अजून तरी जागे व्हा.

**धनंजय :** काय म्हणालास ?

**प्रियदर्शन :** जो अहंकाराच्या विळख्यात गवसला, त्याची हुषारी, कर्तबगारी, त्याचं औदार्य, फोल आहे सारं काही ! अगदी कवडीमोल आहे ' असा—

**धनंजय :** (क्रोधाने) कसली धुंदी चढली आहे तुला प्रिया ? माझ्या घरात येऊन शिव्यागाळी, माझा अपमान !

**चारुशील :** त्याच्यावर कशाला चिडता आहात विनाकारण ? त्याचं मस्तक नाही ठिकाणावर !

**प्रियदर्शन** : जरा थांबा !– माझं वाक्य पुरं करू द्या ! असा विश्वरहस्यातला सिद्धांत आहे एक. रागवायचं असलं तर विश्वरहस्यावर रागवा. माझा काही संबंध नाही त्यात.

**धनंजय** : विश्वरहस्य ? कसलं रहस्य ? काय गौडबंगाल आहे हे ?

**चारुशील** : मग सांगते आहे काय तुम्हाला ? त्याचं डोकं नाही ताळ्यावर आणि तुम्ही—

**धनंजय** : ( क्षणभर न्याहाळत ) म्हणजे ?...असं असं ! हूं ! तुझी प्रकृती फारच बिघडलेली आहे प्रिया ! चांगल्या डॉक्टराकडून तपासून घ्यायला हवं तुला एकदा !

[ असे म्हणत धनंजय त्वेषाने जाऊ लागतात. तोच समोरून दोन पट्टेवाले हातात एक सूटकेस आणि काही पिशव्या घेऊन प्रवेशतात. त्यांना बघून– ]

**नंदिनी** : अगबाई हे काय ?

**चारुशील** : ( पुढे होऊन पाहात ) कोणी पाहुणे का आले ?

**धनंजय** : ( व्हरांड्यातून न्याहाळत ) अरे ! सर्प्रायझिंग ! हरिभाऊ ! चारू, अग हरिभाऊ आलेले दिसतात.

**चारुशील** : अय्याऽ ! भाऊ आले ?

[ असे म्हणत धनंजय व चारुशील गडबडीने बाहेर जातात. ]

**नंदिनी** : अहो कसल्या तंद्रीत आहात ? खरोखरच भाऊ आले—

[ असे म्हणत नंदिनी बाहेर जाते. पट्टेवाले सामान ठेवून बाहेर परत जातात. प्रियदर्शन मात्र खिशातून वही काढून तिच्यातील एका पानावर पेन्सिलीने मोठी फुली करीत " लढाई हरण्याचा आजच्या दिवसांतला हा दुसरा प्रसंग." असे स्वतःशी उद्गारत धिम्या पावलाने व्हरांड्यात येतो. वही मिटून खिशात घालता घालता विस्मयाने समोर बघून— ]

**प्रियदर्शन** : भाऊ ? या वेळी ? इथं ?

[ तोच बाहेरून मंडळी बोलत बोलत प्रवेशतात. ]

**हरिभाऊ** : ( बाहेरूनच ) या पट्टेवाल्यांना आणि पोलिसांना परत जाऊ द्या आता... नको नको...त्यांच्या सेवेची आणि संरक्षणाची मला काही गरज नाही. अहो, मी चांगला धट्टाकट्टा असताना हवी कशाला मागंपुढं ही वरात ?

[ क्षणार्धाने गलबला जवळ येतो. ]

**हरिभाऊ** ( बाहेरूनच ) नाही, डॉक्टरची काही गरज नाही. त्याच्यासाठी वेगळाच डॉक्टर घेऊन आलोय मी दिल्लीहून ! या योगिराज ! काकासाहेब, तुम्हाला ही मंडळी परिचित आहेतच !

**काकासाहेब** : वा ! परिचित म्हणून काय विचारता ? चेंबर ऑफ कॉमर्समध्ये नेहमी बैठक असते आमची !

[ असे बोलत प्रथम हरिभाऊ, बरोबर चारुशीला, मागे काकासाहेब, पाठो-

पाठ योगीराज शिवानंद, धनंजय आणि सर्वांत शेवटी नंदिनी– प्रवेशतात. हरि-भाऊ– साठी ओलांडलेले, जुन्या जमान्यातले एक वृद्ध पण तडफदार देशभक्त; गेल्या पिढीत क्रांतिकार्याला वाहून घेणारी जी अबोल पण कर्तृत्ववान माणसे होऊन गेली, त्यांतलेच हरिभाऊ एक अवशेष आहेत. दे. भ. काकासाहेब ब्रह्मे आणि योगीराज शिवानंद यांचा अवतार त्यांच्या नावातच सूचित होतो. रंगरूपात आणि वृत्तिवैशिष्ट्यात दे. भ. काकासाहेब ब्रह्मे ब्रह्मदेवासारखे आणि योगीराज शिवानंद महादेवासारखे भासमान झाल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. हरिभाऊंच्या पाठोपाठ प्रवेशत काकासाहेब एका कोचावर ठाण मांडतात लागलीच पिशवीतून टकळी आणि कापसाचे पेळू काढीत सूतकताईला आरंभ करतात. योगीराजांच्या हातात छोटी कुबडी आहे आणि खाकेत मृगाजिनाची गुंडाळी आहे. योगीराज सभोवार निरीक्षण करीत अखेर जमिनीवरच मृगाजिन आंथरतात आणि हातातल्या कुबडीवर रेलून बैठक मारतात. या दोन पाहुण्यांची नजर आल्यापासून प्रियदर्शनवर खिळलेली आहे.

धनंजय प्रवेशताच प्रथम फोनजवळ जातात आणि तबकडी फिरवीत रिसीव्हरमध्ये "...हा मी धनंजय...तेंच सांगतो आहे...गेस्ट आले आहेत माझ्याकडे तेव्हा मला यायला जरा वेळ लागेल...तुम्ही काम करा...आ? तेवढा आयटेम बाजूला ठेवा म्हणजे झालं. दॅट्स ऑल!..." असे म्हणून रिसीव्हर खाली ठेवतात.]

**हरिभाऊ :** (प्रवेशताच) आणि प्रिया कुठं आहे ?

**प्रियदर्शन :** (उचंबळून, पुढे येत) भाऊ–! (धावत जाऊन भाऊंना भेटतो.)

**हरिभाऊ :** हा पाहा गुलाम ! बेटा बरा आहेस ना तू ? रजा घेतल्यावर वाकडी वाट करून बहिणीला भेटायला धावलास; पण दिल्लीला तुझा म्हातारा बाप एकटा आहे; त्याला काळजी लागेल याचा काही विचार ?

**प्रियदर्शन :** गैरसमज झालाय भाऊ तुमचा. दिल्लीला आलो होतो मी. पण त्या वेळी तुम्ही तिथं नव्हता. बिहारमध्ये कोसी नदीवर हाहाकार उडाला तिकडे तुम्ही गेल्याचं कळलं, म्हणून—

**हरिभाऊ :** अरे कोसीवर म्हणजे कुठं हिमालयात परागंदा तर नव्हतो ना झालो ? थांबला असतास चार दिवस दिल्लीला तर कोठली लढाई का हरणार होतास ?

**प्रियदर्शन :** तसं नव्हे भाऊ !

**धनंजय :** चारू, पाहुण्यांचा फराळ व्हायचा आहे हं अजून !

**चारुशीला :** निघालेच. पथ्यपाणी नाही ना आपलं काही ? म्हणजे फराळाचे पदार्थ आणण्यासाठी विचारते.

**धनंजय :** अं ? का हो ?

**काकासाहेब :** चहाफराळ राहू द्या. थंडगार पाणी आणि एक एक पेला दूध आणलंत

म्हणजे आनंद ! काय योगीराज–इथल्या दुधाला अमृताची चव असते बरं का ? ( योगीराज मान डोलावतात. )

**प्रियदर्शन :** भाऊ, तुम्ही असे मध्येच अचानक कसे आलात ?

**हरिभाऊ :** प्रिया, आमच्या आयुष्यात ' मध्येच ' आणि ' अचानक' असं काऽऽही नाही. जिकडे जरूर लागेल तिकडे जायचं एवढं मला ठाऊक !

**काकासाहेब :** कसं बोललात हरिभाऊ ! अहो नदीची वळणं कोणी आखून का देतो ? जिकडे उतार तिकडे ती धावायची ! काय योगीराज ? ( योगीराज आविर्भावाने सुचवतात " लाख बोललात ! " )

**हरिभाऊ :** योगीराजांना जरा तकलीफ झालेली दिसतेय प्रवासाची, नाही ?

**काकासाहेब :** सवय नाही विमानातून कधी प्रवास करायची ? जन्म गेला सगळा कैलासावर बसून तपश्चर्या करण्यात, तेव्हा—

**प्रियदर्शन :** कैलासावर तपश्चर्या ?

**हरिभाऊ :** हो. तुझी ओळख करून द्यायची राहिलीच. पाहिलंत, आमचं हे अस्सं होतं काकासाहेब ! श्रेष्ठींनी जोगाईच्या आश्रमातून उचलून मला राजवाड्यात ठेवलं; पण हे शहरी उपचार काही मुरले नाहीत माझ्या रक्तात.

**काकासाहेब :** आणि आम्हाला तरी नेहमी इथं वावरायची आहे कुठं सवय ? काय योगीराज ? ( योगीराज " काम आटोपा आणि चला येथून एकदा " अशा अर्थाचा आविर्भाव करतात. )

**हरिभाऊ :** प्रिया, हे काकासाहेब बरं, नाव सांगितलं नुसतं म्हणजे पुरे, नाही का ?

**धनंजय :** वा, काकासाहेबांना कोण ओळखत नाही ? अहो काकासाहेब आहेत म्हणून राजकारणाला रंगत आहे. राजकारणातले डावपेच खेळावेत काकासाहेबांनीच.

**काकासाहेब :** ( हसून ) कसचं कसचं ! ' त्याची ' कृपा आहे ही सारी ! ( जोडलेले हात प्रथमच चुकून आकाशाकडे आणि मग सावरून गांधीजींच्या पुतळ्याकडे. )

**हरिभाऊ :** यांना ओळखलंस का तू प्रिया ? हे योगीराज शिवानंदस्वामी !

**प्रियदर्शन :** कुठं तरी पाहिल्यासारखा वाटतोय यांचा चेहरा.

**काकासाहेब :** हं म्हणजे... दाढीमिशांवरून म्हणत असाल तर त्यात काही अर्थ नाही. काल विमानात एक लिंगायत व्यापारी तर म्हणत होते मला, की योगीराजांची मुद्रा थेट शंकरासारखी दिसते. म्हणजे कमाल झाली की नाही योगीराज ? ( हसतात. योगीराज आविर्भावाने सुचवतात की " डोकंच फिरलं असलं पाहिजे त्याचं ? "– )

**प्रियदर्शन :** बिचारे मुके दिसताहेत योगीराज !

**काकासाहेब :** मुके ? छे छे ! अहो आज योगीराजांचा मौनाचा दिवस आहे. त्यांचं मौन आहे म्हणून इथं शांतता आहे. नाही तर योगीराजांनी अगदी धमाल उडवून दिली असती. काय योगीराज ? ( योगिराज क्रुद्ध होतात आणि डोळे वटारून काकासाहेबांकडे बघतात; काकासाहेब हसतात. )

**हरिभाऊ :** प्रिया, अरे तरुणपणचे माझे सहाध्यायी होते योगीराज. आपल्या घरी नेहमी येत असत जोगाईला. योगशास्त्रात यांचा हात धरणारा सबंध भारतात कोणी नाही.
**काकासाहेब :** ( उत्साहाने ) अहो पंचवीस हजार वर्षं कैलासावर नुसत्या हठयोगाची साधना चालली होती यांची !
**धनंजय :** काय म्हणालात ! पंचवीस हजार वर्षं !
**काकासाहेब :** ( चूक लक्षात येऊन ) पंचवीस हजार म्हटलं मी ? छे छे पंचवीस, पंचवीस वर्षं ! काय बरोबर आहे ना योगीराज ?
( " पंचविसांनी काय होतंय, जास्तीच ! " असा योगीराजांचा आविर्भाव. )
**हरिभाऊ :** तुझ्यासाठी मुद्दाम घेऊन आलोय मी त्यांना !
**प्रियदर्शन :** माझ्यासाठी ? म्हणजे ?
**हरिभाऊ :** अरे योगीराजांनी मला यौगिक आसनांचे चार धडे दिले तर माझी कैक वर्षांची पोटदुखी थांबली. पाहा तुला यांचा काही उपयोग झाला तर !
**काकासाहेब :** ( शिताफीने विषय बदलीत ) तुमचे सेनापती बरीच तारीफ करीत होते परवा तुमच्या पराक्रमाची !
**धनंजय :** सेनापती ? हां हां– म्हणजे चीफ ऑफ दि आर्मी स्टाफ !
**प्रियदर्शन :** माझा पराक्रम ? कोणता पराक्रम ?
**काकासाहेब :** काश्मीरच्या आघाडीवरला हो ? एका खिंडीत दुष्मनांची तुम्ही जी कत्तल उडवलीत ती सरकारदरबारी ऋजू झालीय म्हटलं.
**प्रियदर्शन :** ( विव्हल होत ) नको ! त्याची आठवणदेखील नको !
**काकासाहेब :** वा वा, असं कसं होईल? परमवीरचक्र मिळायचंय तुम्हांला त्याबद्दल.
**धनंजय :** ( विस्मयानंदाने ) काय म्हणता ! परमवीरचक्र ?
**काकासाहेब :** हो ! सेक्रेटरीएटमधली खास बातमी आहे ही !
**धनंजय :** असं ? कॉंग्रॅट्स प्रिया. ( प्रियदर्शनचे खांदे धरून उत्साहाने त्याला घुसळीस ) मी पहिल्यापासून म्हणत होतो की हा पठ्या लष्करात नाव काढल्यावाचून राहणार नाही. ब्रॅव्हो...ब्रॅव्हो !
**प्रियदर्शन :** धनंजय, माझ्या पराक्रमाचा अक्षरशः काही संबंध नाही त्यात. निव्वळ माझ्या एका चुकीमुळं हकनाक शेकडो सैनिक ठार झाले त्या वेळी.
**धनंजय :** म्हणून काय झालं ? दुष्मनांचे सैनिक होते ना ते ?
**प्रियदर्शन :** ( सुस्कारून ) ' आपले दुष्मन ' फार वेगळे आहेत धनंजय.
**काकासाहेब :** मी म्हणतो, आपल्याला ' परमवीरचक्र ' मिळाल्याशी कारण ! काय योगीराज ? ( " तर काय ? " असा योगीराजांचा आविर्भाव ).
**प्रियदर्शन :** ' परमवीरचक्र ' ! माझ्यापुढं आता कसल्याही चक्रांची प्रलोभनं टाकलीत तरी मी माझ्या निश्चयापासून तिळमात्रही ढळणार नाही.
**हरिभाऊ :** कसला निश्चय, प्रिया ?

...४

**प्रियदर्शन** : माझ्या कमिशनचा राजिनामा द्यायचा ठरवलाय मी भाऊ !

**धनंजय** : कमिशनचा राजिनामा ? वेडबीड तर नाही लागलं तुला ?

**काकासाहेब** : आर्मी ऑफिसर्सना सध्याच्या तंग वातावरणात राजिनामा कोण देऊ देईल ?

**हरिभाऊ** : अरे, पण राजिनामा कशासाठी द्यायचा ?

**प्रियदर्शन** : भाऊ, तुम्ही गव्हर्नरपदाचा राजिनामा का दिलात ? अधिकारपदाचा त्याग करून जोगाईच्या आश्रमात परत जायचं तुम्ही का ठरवलंत ?

**काकासाहेब** : हरिभाऊ जोगाईच्या आश्रमात जाणार ? ( हसतात ) सांगितलं कोणी तुम्हाला ?

**प्रियदर्शन** : ( विस्मयाने ) म्हणजे ? जोगाईच्या आश्रमात परत जायचा विचार रद्द केलात भाऊ तुम्ही ?

**हरिभाऊ** : ते आज दुपारी हायकमांडच्या बैठकीत ठरेल.

**काकासाहेब** : त्यात ठरायचंय काय ? बैठकीत फक्त शिक्कामोर्तब होणार आहे हरिभाऊ !

**धनंजय** : शिक्कामोर्तब ? कशावर शिक्कामोर्तब ?

**काकासाहेब** : मुख्यमंत्र्यांचा राजिनामा ही आता जितकी अटळ घटना आहे तितकीच या पदासाठी श्रेष्ठींनी केलेली हरिभाऊंची निवड हीदेखील—

**प्रियदर्शन** : ( एकदम वळून ) मुख्यमंत्रीपदावर श्रेष्ठींनी तुमची निवड केली ? आणि भाऊ तुम्ही त्याला संमती दिलीत ?

**हरिभाऊ** : अजून दिली नाही. पण पक्षाचा तसा आदेशच मिळाला तर द्यावी लागेल प्रिया, सैनिकाला स्वतःच्या संमतीचं स्वातंत्र्य असतं का कधी ?

**प्रियदर्शन** : पण भाऊ, हा फार मोठा अविचार घडणार आहे.

**काकासाहेब** : अत्यंत सूज्ञपणाचा निर्णय आहे हा. हरिभाऊंसारख्या निःस्पृह कार्यकर्त्यांनी मंत्रिमंडळात जाऊन कारभारावर काबू ठेवल्याखेरीज आता सरकारची आणि आपल्या पक्षाची इभ्रत सावरणार नाही !

**धनंजय** : ( विस्मयानंदाने ) म्हणजे खरोखरीच हरिभाऊ, तुम्ही या प्रान्ताचे मुख्यमंत्री होणार ? ( हर्षाने ) बाय जोव्ह ! आंधळा मागतो एक डोळा आणि देव—

**प्रियदर्शन** : देव ठेवतो आंधळ्यापुढं खोल खड्डा खणून ! भाऊ, अजून तरी तुम्ही सावध व्हा.

**धनंजय** : चालून आलेलं मुख्यमंत्रिपद नाकारायला सांगतो आहेस प्रिया तू; डोकं ठिकाणावर आहे ना तुझं ?

**हरिभाऊ** : पण हा वाद कशाला ? मुख्यमंत्र्यांना राजिनामा देण्याची पाळी येईल असं मला वाटत नाही.

**काकासाहेब** : हा मात्र तुमचा भ्रम आहे, हरिभाऊ.

**हरिभाऊ :** आणि माझी कैफियत मी श्रेष्ठींसमोर मांडली तर मला अजून वाटतं की —

**काकासाहेब :** झालं, पाहिलंत ना योगीराज ? म्हणजे काल रात्रीपासून मी फुकट तोंडची वाफ दवडली, झालं. आमच्या शब्दाला तुमच्याजवळ पत उरली नाही असं स्पष्ट का नाही सांगत हरिभाऊ ?

**हरिभाऊ :** रागावू नका काकासाहेब ? गैरसमज होतोय तुमचा. मुख्यमंत्रीपदापेक्षा जोगाईच्या आश्रमात माझा जीव गुंतला आहे हे तुम्ही चांगलं जाणतां. आणि खरं सांगू, अन्तःप्रेरणेनं मला फार दिवसांपासून वाटायला लागलं आहे की सत्तेच्या नादी लागून जे श्रेय आपण घालवलं ते आता फक्त सेवामार्गानंच आपल्याला परत मिळू शकेल.

**प्रियदर्शन :** (उत्साहाने) भाऊ, तुम्हाला असं खरंच वाटतं ?

**काकासाहेब :** तुम्हीच असं बोलायला लागलात तर मग राज्यकारभाराची प्रचंड धुरा वाहायची कोणी ?

**प्रियदर्शन :** तुमचा जन्म गेला स्वातंत्र्यलढ्यात क्रान्तीची उभारणी करण्यात. आता राज्यकारभाराच्या रथाचं सारथ्यदेखील आम्हीच करू हा तुमचा हट्ट कशासाठी ?

**काकासाहेब :** सारथ्य करणारे दुसरे कुशल सारथी निर्माण होताहेत कुठं ?

**प्रियदर्शन :** काकासाहेब, काळ थांबलेला नाही, आणि समाजपुरुषाचं कोणावाचून अडत नाही. पण रोज आरशात बघून आपल्याच प्रतिबिंबाला हार घालणारे नेते मात्र अखेर स्वतःमधून भस्मासुर निर्माण करून ठेवतात.

**काकासाहेब :** मग तुमचं म्हणणं तरी काय आहे ? हरिभाऊंसारख्या थोर कार्यकर्त्यांनी म्हातारपण झालं म्हणून संन्यास घेऊन हिमालयावर का चालतं व्हावं ?

**प्रियदर्शन :** त्याची काळजीच सोडा ! हिमालयावर बसून इथं घोटाळे माजविण्याचाच ज्यांचा उद्योग आहे अशा मंडळीत आमचे भाऊ यावज्जन्म बसू शकणार नाहीत.

**योगीराज :** ( आपल्या मौनाचे भान विसरून, दण्ड घेऊन, क्रोधाने उठत ) कोण माजवतो आहे घोटाळे ? तुमचे तुम्हीच धनी आहात या सगळ्या घोटाळ्यांचे. हिमालयावरल्या मंडळींचा काहीएक संबंध नाही त्यात ?

**काकासाहेब :** ( तारांबळ उडून हाताने आवरीत नि डोळ्याने दाबीत ) हां हां हां योगीराज शांत व्हा. आपण कुठं आहोत, काय बोलतो आहोत याचं काही भान ?

**धनंजय :** अरेच्या ! मौन आहे नाही का त्यांचं ? म्हणजे मौन...

**प्रियदर्शन :** योगीराजांचा पित्तप्रकोप हा काही सामान्य मानवाचा राग दिसत नाही !

**हरिभाऊ :** हिमालयावर बरीच वर्षे वास्तव्य करून होते योगीराज. तेव्हा त्यांना वाईट वाटणं स्वाभाविक आहे. योगीराज, रागावू नका. तुम्हाला उद्देशून काही बोलला नव्हता प्रिया.

**प्रियदर्शन :** मुख्यमंत्रीपद स्वीकारण्यासाठी काकासाहेबांनी तुम्हाला इतकी गळ घालावी यात मला काही तरी दगा दिसतोय भाऊ. पाताळयंत्री कारस्थानाचा वास

येतोय मला.

**धनंजय** : दगा ! पाताळयंत्री कारस्थानाचा वास ! प्रिया, अरे कोणत्या युगातली भाषा बोलतो आहेस तू ?

**प्रियदर्शन** : विश्वरहस्याचा प्रसार हाणून पाडण्यासाठी देवांनी कंबर कसलेली दिसते.

**काकासाहेब** : विश्वरहस्याचा प्रसार ? देवांनी ? म्हणजे ?

**धनंजय** : म्हणजे तेच. स्वर्ग आणि देव. हा मंत्र सुरू झाला आज सकाळपासून.

**काकासाहेब** : छे छे छे, फारच परिणाम झालेला दिसतोय डोक्यावर. डॉक्टर भगवंतरावांना घ्या बोलावून आता; आपले भगवंतराव सायकिॲट्रिस्ट ! काही- तरी तात्काळ उपाययोजना केली पाहिजे. नाही तर हाताबाहेर जायची केस ही. काय योगीराज ?

**धनंजय** : डॉक्टर भगवंतराव ? म्हणजे ?

**काकासाहेब** : ( चुकचुकत ) डॉक्टर भगवंतराव ठाऊक नाहीत तुम्हाला ? पाहा पाहा योगीराज.

**धनंजय** : नाही म्हणजे— नाव ऐकल्यासारखं वाटतंय पण—

**काकासाहेब** : इकडे या, मी सांगतो तुम्हाला. त्याचं काय आहे—

[ असे बोलत धनंजयांना घेऊन काकासाहेब मागे व्हरांड्यात जातात व हलक्या आवाजात कुजबुजू लागतात. योगीराज त्यांना जाऊन सामील होतात. पुढील संवाद चालू असतानाच हे खलबत संपते. काकासाहेब फोनपाशी जाऊन तबकडी फिरवतात व रिसीव्हर उचलून हलक्या आवाजात बातचीत करतात. मग धनंजयांना ' येताहेत ' असे खुणावतात. हे सगळे पार्श्वभागी चालले असतानाच— ]

**प्रियदर्शन** : या या सगळ्यांनी मला मूर्खात काढलं तरी भाऊ निदान तुम्ही तरी मला समजून घ्या. मानवाच्या भवितव्यासाठी तरी निदान या क्षणाला तुम्ही आपल्या अन्तःप्रेरणेशी इमान राखा. पक्षशिस्तीच्या नावाखाली तुम्ही आपल्याशी बेइमानी केलीत तर तुमचं सगळं कर्तृत्व मातीमोल झालंच म्हणून समजा.

**हरिभाऊ** : काय बोलतो आहेस तू प्रिया हे ? मानवाच्या भवितव्याच्या आणि माझ्या अधिकारग्रहणाचा काय संबंध आहे ?

**प्रियदर्शन** : फार मोठा संबंध आहे. तुम्हाला जे दिसत नाही त्याचा उमज मला पडला आहे; म्हणून बजावतो भाऊ, या घटकेला तरी मुख्यमंत्रीपदाचा स्वीकार तुम्ही करू नका. तुम्ही पूर्णतेला पोचू नये, विश्वरहस्याचा साक्षात्कार तुम्हाला घडू नये, एवढ्याचसाठी अधिकारग्रहणाचा हा लोभ तुमच्या शत्रूंनी तुमच्या मार्गावर मुद्दाम टाकलाय हो.

**हरिभाऊ** : माझ्या शत्रूंनी ? ( हसतात ) अरे, या दुनियेत मला कोणी शत्रू नाहीत.

**प्रियदर्शन** : तुमचे शत्रू; माझे शत्रू; अखिल मानवजातीचे शत्रू.

**हरिभाऊ** : म्हणजे कोण् ? कम्युनिस्ट का ?
**प्रियदर्शन** : नव्हे हो. कम्युनिस्ट बिचारे मानव. मानवी दुःखाचं त्यांचं निदान चुकलं असेल, पण मानवाचं शत्रुत्व ते कसं करतील ?
**हरिभाऊ** : अरे मग आहेत तरी कोण हे शत्रू ?
**प्रियदर्शन** : देव. स्वर्गातले देव.
**धनंजय** : ( मागे, काकासाहेबांना उद्देशून ) पाहिलंत ? झाला सुरू मंत्र. ( सगळे खदखदा हसतात. )
**हरिभाऊ** : ( हसू आवरीत ) देव ? स्वर्गातले देव ? तुला कुठं भेटले हे देव ?
**प्रियदर्शन** : हसू नका भाऊ. स्वर्गात गेलो होतो मी काल रात्री ! खरोखरीच—
**धनंजय** : ऐका ऐका—
**हरिभाऊ** : अरे अपार करुणेचा देव मानवाचा शत्रू कसा होईल ?
**प्रियदर्शन** : अपार करुणेचा सागर आटला आहे मानवद्वेषाच्या धगीत.
**हरिभाऊ** : अरे वेड्या, मी अधिकारग्रहण केलं तरी स्वतःच्या स्वार्थासाठी मी सत्ता राबवीन असं वाटतं कां तुला ?
**प्रियदर्शन** : तुमचा स्वार्थ असो वा नसो, पण सत्तेच्या सिंहासनावर साधुत्व जरी आरूढ झालं तरी अखेर विसं झडत जाणार साधुत्वाचीच ! विश्वरहस्याचा इशारा आहे हा भाऊ !
**हरिभाऊ** : प्रिया, अमृतासारखे विचार सांगणारं कसलं रे तुझं हे वेड ?
**प्रियदर्शन** : वेड्याच्या मुखातून अमृतवाणी भरावी आणि शहाण्यांनी ती मातीमोल करावी असा तिला देवांचा शाप आहे. भाऊ, वेड नव्हे हे. वस्तुस्थिती सांगतो आहे मी तुम्हाला.
**हरिभाऊ** : वस्तुस्थिती ?
**प्रियदर्शन** : हो, वस्तुस्थिती. काश्मीरच्या खोऱ्यात उडालेल्या रणकंदनानंतरची संध्याकाळ स्पष्ट आठवतेय अजून मला. प्राण पणाला लावून मिळवलेल्या विजयामुळं आमचे सैनिक तळावर बेहोषपणे नाचत गात होते. पण माझ्या डोळ्यांसमोर वाहात होते रक्ताचे पाट. माझ्या कानात घुमत होत्या दुष्मनांच्या अखेरच्या किंकाळ्या. आमचा तळ सोडून मी एकटाच दूर दूर एका पहाडावर जाऊन बसलो. समोर नंदन-वनासारखा रमणीय प्रदेश अथांग पसरला होता. याच, याच भूमीच्या एका तुकड्यासाठी जगातल्या मुत्सद्देगिरीला उधाण यावं, भाऊ भावांचे शत्रू व्हावेत आणि गोकुळासारखी गावं बेचिराख व्हावीत—क्रूर नियतीचा कसला हा विचित्र न्याय ? विधात्याचा कसला हा अघोरी खेळ ? या एकाच व्यथेत त्या प्रशान्त पहाडावर किती तरी वेळ मी तळमळत पडलो होतो. चोरपावलांनी केव्हा तरी संध्या अवतरली आणि अस्मानावर टाकलेलं प्रकाशाचं झिरझिरीत वस्त्र तिनं हलक्या हातानं दूर केलं. तो अनंत आकाशात असंख्य तारे कोठून कोठून लुकलुकत धावत आले, काळ्याकभिन्न

अवकाशात उदारपणे प्रदक्षिणा घालणारे ते ग्रहगोल पाहून माझ्या मनात एक वेडा विचार डोकावला—

हे कोट्यवधी प्रचंड ग्रहगोल कोणत्या अपराधासाठी असे चैतन्यहीन पडले आहेत ? कोणत्या उःशापासाठी एकाकी अवस्थेत खिन्नपणे खाली मान घालून स्वतः-भोवती फिरत राहिले आहेत ? चैतन्याचे आणि जीवनानंदाचे चिमुकले ओघळ या पृथ्वीसारख्या एका क्षुद्र ग्रहावरच नेमके कसे सांडले ? आणि पृथ्वीला स्पर्श करताच मात्र अनंत प्रकारच्या दुःखांनी जागच्या जागी का म्हणून करपून गेले ? ही सबंध विश्वमाला चैतन्यानं फुलली, जीवसृष्टीनं मोहरली आणि वसाहतीसाठी मानवाला खुली झाली तर परस्परांच्या भूमीसाठी मानवानं आरंभिलेली ही यादवी युद्धं तरी थांबतील. पण कसं शक्य आहे हे ? खरंच, काळाला अंत नाही; विश्वाला मर्यादा नाही; चराचरात नजर फेकावी तिकडे अनंत...अगाध ..आणि अमर्याद ! मग जीवसृष्टीच्या ललाटी तेवढा हा मृत्यू का म्हणून ?

( खिन्नपणे हसून )

भाऊ, वेड्यासारखे वाटले तुम्हाला माझे प्रश्न ! होय ना ! पण भाऊ, या वेड्या विचारांनीच मला विश्वरहस्याचा साक्षात्कार घडवला. काल रात्री माझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मला मिळाली !

**हरिभाऊ :** काल रात्री ? प्रिया, अरे—

**प्रियदर्शन :** होय. काल रात्री. आजवर जे मला अस्फुटपणे जाणवत होतं तेच— ( घुटमळतो.)

**हरिभाऊ :** तेच काय ?

**प्रियदर्शन :** नाव उच्चारायला मला परवानगी नाही. पण एका महात्म्याच्या कृपेमुळं स्वर्गात जाऊन तेच मला प्रत्यक्ष बघायला मिळालं.

**हरिभाऊ :** स्वर्गात ? प्रिया, प्रिया डोकं भडकू देऊ नकोस—शांत हो ! शांत हो—

[ याच वेळी व्हरांड्यातून हलक्या पावलाने डॉक्टर भगवंतराव येतात. त्यांची बॅग घेऊन पाठोपाठ शामसुंदर येतो. काकासाहेब आणि धनंजय पुढे होतात; तोच डॉक्टर त्यांना गप्प बसण्याविषयी खुणावतात. डॉक्टर भगवंतराव प्रियदर्शनाच्या मागे जाऊन उभे राहून रोखून बघू लागतात. डॉक्टर भगवंत-रावांच्या मुद्रेत देवाधिदेवांची ओळख पटावी. त्याच वेळी माडीवरून चारुशीला दुधाचे पेले घेऊन, आणि नंदिनी पाण्याची काचेची सुरई घेऊन प्रवेशतात. आणि जिन्यातच थबकून भयचकित दृष्टीने प्रियदर्शनकडे बघू लागतात. ]

**प्रियदर्शन :** प्रतिभेच्या दिव्य उन्मेषातून मानवाला निर्माण करणाऱ्या देवाधिदेवाचं दर्शन मला काल घडलं आणि भगवंतांची विश्वयोजना धुळीला मिळवण्यासाठी टपलेले महादेव आणि ब्रह्मदेव यांनाही मी काल पाहिलं. भाऊ, मी काय सांगतो ते नीट

ऐकून ठेवा. भगवंतांनी या पृथ्वीतलावर ' मानवी जीवना 'चा एक महान प्रयोग आरंभिला आहे. तो पूर्णतेला नेणं तुम्हा-आम्हा मानवांच्याच हातात आहे. प्रयोग यशस्वी झाला तर मग ही सबंध विश्वमाला आपली ! मग मृत्यू नाही ! वार्धक्य नाही ! दुःख नाही ! काही नाही ! मग चराचरात फक्त आनंद ! आनंद ! केवळ जीवनानंद ! आनंदी आनंद गडे ! जिकडे तिकडे चोहीकडे ! (मोठ्याने खळखळून हसतो.)

**हरिभाऊ :** (दुःखाने) अरे अरे ! प्रिया, काय तुझी ही अवस्था !

**धनंजय :** डॉक्टर भगवंतराव आले आहेत भाऊ ?

**प्रियदर्शन :** भगवंतराव ? (ताड्कन् वळून पाहात) कोण भगवंतराव ?

**काकासाहेब :** डॉक्टर भगवंतराव.

[सहजगत्या प्रियदर्शनच्या नजरेत भगवंतरावांच्या एका बाजूला योगीराज आणि दुसऱ्या बाजूला काकासाहेब दृष्टीला पडतात. शामसुंदर मागे उभा आहे. चौघेही प्रियदर्शनवर नजर रोखतात.]

**प्रियदर्शन :** (भगवंतरावांच्या नजरेला नजर देत) भगवंतरारव ? डॉक्टर भगवंतराव ? हे शामसुंदर. तुम्ही काकासाहेब असे, हे हे योगीराज शिवानंद आणि हे हे हे... (एकदम विजेचा झटका बसावा तसा काहीएक बोध होऊन ओरडतो. भाऊ, चारू, धनंजय, हेच हेच ते– हेच ते !

[सर्व मंडळी त्याला धावत येऊन धरतात.]

**हरिभाऊ :** हेच ? अरे हेच कोण ?

**प्रियदर्शन :** अहो हे मदनदेव ! हे ब्रह्मदेव ! हे महादेव ! आणि हे– हे साक्षात (हिसडा मारून सोडवून घेत, भगवंतांचे गुडघे धरीत) देवाधिदेव ! भगवान विष्णू.

**डॉक्टर :** (करुणार्द्रतेने त्याला न्याहाळीत) अरे अरे ! फार मोठा अॅटक आलेला दिसतो. पाणी आणा पाहू झटकन्. रोग्याचं मस्तक गार ठेवलं पाहिजे अशा वेळी.

[नंदिनी धावत जाऊन पाण्याची सुरई घेऊन येते.]

**प्रियदर्शन :** आपण ? आपणसुद्धा ? देवांच्या कारस्थानात आपणदेखील सामील झालात ? (नंदिनी त्याच्या डोक्यावर सुरई पालथी करते. डोक्यावर बदाबदा पाणी पडताच, ओरडून) हा अन्याय आहे. हा अन्याय आहे. देवाधिदेवा, हे अधर्मयुद्ध आहे.

**हरिभाऊ :** अरे बघत काय राहिलात ? कोणी आवरा, आवरा याला —

[बेहोष झालेल्या प्रियदर्शनला सगळी मंडळी आवरू लागतात; तोच]

**प ड दा**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ...
नों. दि. ...
वा. क्र. ...
वि. ... क्र. ...

# अंक तिसरा

[पूर्वीचेच दालन आणि पूर्वीचीच सगळी चीजवस्त. वेळ एका संध्याकाळची. वर गेल्यावर क्षणभराने व्हरांड्यातून डॉक्टर भगवंतराव येतात आणि शोधक दृष्टीने सर्वत्र पाहतात. तोच जिन्यावरून धनंजय आणि पाठोपाठ योगीराज प्रवेशतात. धनंजयाच्या उजव्या हाताला आता प्लॅस्टर दिसत नाही; ह्यावरून मध्यंतरी चार आठवड्यांचा कालावधी उलटलेला दिसत आहे.]

**धनंजय** : ( प्रवेशत ) छे छे छे ! काहीएक सांगू नका ! इनफ ऑफ इट् !

**योगीराज** : पण धनंजय, अहो आसनं शिकायची म्हणजे शरीराला थोडेफार कष्ट पडायचेच.

**धनंजय** : थोडेफार ? आ हा हा ! सर्वांगातून एकदम चमका निघाल्या अशा की... कोण डॉक्टर ? गुड ईव्हिनिंग ! तुम्ही केव्हा आलात ?

**डॉक्टर** : गुड ईव्हिनिंग ! हा काय, आताच येतो आहे नव्हे का ? तुमच्याकडून पेशंटची वार्ता कळेल म्हणून वाट पाहात होतो इतके दिवस. आज अखेर ठरवलं की स्वतः जाऊन चौकशी करून यावी. तुमचा काय चालला होता उद्योग योगीराज ?

**योगीराज** : आसनं शिकवीत होतो मी धनंजयांना !

**डॉक्टर** : आसनं ? धनंजयांना ? अहो प्रियदर्शनसाठी तुम्ही इथं आलात आणि—

**धनंजय** : बरं का डॉक्टरसाहेब, गेल्या आठ दिवसांत प्रियदर्शनचं घरात का पाऊल ठरेनासं झालं आहे त्याचा आज शोध लागला मला.

**डॉक्टर** : काय— काय बुवा शोध लागला ?

**धनंजय** : अहो योगीराजांनी आपल्या चेल्याच्या मागं अहोरात्र या योगासनांचा भुंगा लावला असला पाहिजे. छे छे ! आसनं कसली ही ? ही तर चक्क सर्कस् आहे सर्कस. गरुडासन, मयूरासन, कुक्कुटासन, मत्स्यासन, भुजंगासन—अरे राम राम राम !

योगासनातले हे सगळे पशुपक्षी योगीराजांनी छू करून सोडले अंगावर तर माणूस थिजून जाईल नाही तर काय होईल ?

**योगीराज :** आमच्या योगासनामुळं थिजून जायला पुरते दोन दिवस तरी आमच्या ताब्यात दिला होता का तुम्ही हा चेला ?

**डॉक्टर :** पण धनंजय, तुम्ही या यौगिक आसनांच्या भानगडीत कधीपासून पडलात ?

**धनंजय :** त्याचं असं झालं डॉक्टरसाहेब, टाळेबंदी पुकारल्यापासून गेले आठ दिवस आमचा कारखाना बंद, म्हणून मी रिकामा आणि प्रिया काय घरात आहे आणि नाही, सारखंच. म्हणून योगिराजही रिकामे. तेव्हा म्हटलं या योगासनाचं बंड तरी काय आहे ते बघू या एकदा.

**डॉक्टर :** हात काय म्हणतो आहे तुमचा ?

**धनंजय :** फर्स्ट क्लास. दोन दिवसांपूर्वी प्लॅस्टर काढून टाकलं. आता तक्रार ती इतकीच की या हाताला सध्या कामच उरलेलं नाही काही. त्यामुळं वेळ जात नाही, चैन पडत नाही आणि डोक्यातल्या काळज्या दूर होत नाहीत.

**डॉक्टर :** हरिभाऊ कुठं आहेत ? सचिवालयातून अजून परतले नाहीत ? सात वाजून गेले.

**धनंजय :** सात काय अन् आठ काय ! रोजचंच आहे हे. कामाच्या तासाची बंधनं आहेत फक्त फॅक्टरीतल्या कामगारांसाठी. मुख्यमंत्र्यानं दिवसाकाठी किती राबावं याला काही धरबंधच राहिलेला नाही सध्या.

**डॉक्टर :** आणि चारुताई ? नंदिनीबाई ? त्याही दिसत नाहीत बंगल्यावर ?

**धनंजय :** त्या दोघी हिंडताहेत दुपारपासून प्रियदर्शनच्या मागावर.

**डॉक्टर :** प्रियदर्शनच्या मागावर ? म्हणजे ? कुठं भटकत असतो, काय करीत असतो प्रियदर्शन ?

**धनंजय :** धूमकेतूसारखा भरारा दिवसरात्र हिंडतोय हा गृहस्थ भेटीगाठी, चर्चा, मुलाखती आणि वादविवाद करीत.

**डॉक्टर :** भेटीगाठी ? चर्चा ? मुलाखती ?

**धनंजय :** हो, गेल्या आठ दिवसांत शहरातले सगळे राजकीय पुढारी, सरकारी अधिकारी, संपादक, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कलावंत आणि सर्व धर्मांचे धर्मगुरू त्यानं वेठीला धरले आहेत. बोला आता.

**डॉक्टर :** पण कशासाठी ?

**योगीराज :** कशासाठी म्हणजे ? विश्वरहस्याचा प्रसार करण्यासाठी ! दुसरं काय ?

**डॉक्टर :** म्हणजे ते– ते अजून कायमच आहे का ?

**योगीराज :** सगळं काही आहे तस्सं आहे. फक्त आता घरातल्या माणसांचा छळ संपून बाहेरच्या मंडळींना उपद्रव सुरू झालाय.

**डॉक्टर :** पण बाहेरची मंडळी मुकाट्यानं बरी ऐकून घेतात ही विश्वरहस्याची

बडबड ?

**धनंजय :** ऐकून घेतील नाही तर काय करतील डॉक्टर ! मुख्यमंत्र्यांचा मुलगा आहे प्रिया ! जुन्या राजवटी संपल्या तरी राजपुत्रांचा भाव ओसरला नाही अजून डॉक्टरसाहेब.

**योगीराज :** नुसतं ऐकून घेऊन थांबले नाहीत. काही दीडशहाणे शिष्य झाले आहेत प्रियदर्शनचे. डॉक्टरसाहेब, आता वेड्या माणसाचे चाळे म्हणून हसण्यावारी घालवण्यासारखी गोष्ट उरलेली नाही ही.

**डॉक्टर :** काय म्हणता ? माणसांच्या मूर्खपणाची अगदी कमाल झाली !

**धनंजय :** तरी अजून आमच्या भाविक मंडळींनी मनावर घेतलेलं दिसत नाही हे प्रकरण. नाही तर भक्तगणांचा मेळा जमला की कॅप्टन प्रियदर्शनचे संत प्रियदर्शन-महाराज होऊन माझ्या बंगल्यावर टाळमृदंगाच्या साथीत ' जयजय रामकृष्ण हरी ' ऐकायला मिळालं असतं रोज तुम्हाला !

[ असे म्हणून धनंजय खळखळून हसतात. तोच बाहेरून चारुशीला प्रवेशते. धनंजयांना पाहून दचकून थबकते, गडबडते, गोंधळते.]

**चारुशीला :** अग बाई !

**धनंजय :** कोण, चारू ? तू ?

**चारुशीला :** तुम्ही घरीच ?

**धनंजय :** घरीच म्हणजे ?

**चारुशीला :** ( चाचरत ) क... काही नाही. ( माडीवर जाऊ लागते.)

**धनंजय :** आणि तू एकटीच परतलीस ? नंदिनी कुठं आहे ?

**चारुशीला :** प्रियाला घेऊन येते आहे ती.

**डॉक्टर :** गुड ग्रेशस ! कुठं सापडला हा प्रिया ?

**चारुशीला :** थिऑसॉफी-मंडळात.

**डॉक्टर :** मग त्याला पुढं घालून घेऊन का आला नाहीत ?

**चारुशीला :** चर्चा चालली होती त्याची मंडळाच्या सभासदांशी.

**योगीराज :** पण आता त्यानं तेथून पुन्हा गुंगारा दिला म्हणजे ?

**चारुशीला :** तेवढ्यासाठीच नंदिनी थांबली आहे तिथं.

**धनंजय :** मग तू का अगोदर परतलीस चारू ?

**चारुशीला :** ( चाचरत ) मी...मी... कुठं अगोदर ?...नाही...म्हणजे तसं विशेष काही कारण नाही... ( जाऊ लागते.)

**धनंजय :** ( तिला अडवीत, तीव्र दृष्टीने बघत ) चारू, तू घाबरलेली दिसतेस. खरा काय प्रकार आहे सांग पाहू ?

**चारुशीला :** कुठं काय ? काही नाही ! काही नाही ! ( जाऊ लागते.)

**धनंजय :** चारू, येताना कारखान्यावर जाऊन आलीस तू, होय ना ?

**चारुशीला** : नाही...होय. उभ्याउभी जाऊन आले. का ?
**धनंजय** : शामसुंदर भेटले तुला कारखान्याच्या आवारात, खरं की नाही ?
**चारुशीला** : नाही... हो, भेटले.
**धनंजय** : (जवळ जाऊन अधिकारवाणीने) काय सांगत होता तो तुला ?
**चारुशीला** : (घाबरून मागे सरत) काही नाही... काही नाही... काही विशेष नाही... आपलं एरवीच !
**धनंजय** : (रोखून बघत) एरवीच अं ! मग तुझी जीभ का चाचरली ? अशी भेदरलीस कशासाठी ? बोल बोल, काय भानगड आहे ती मला समजलीच पाहिजे !
**चारुशीला** : काही नाही हो. काही भानगड नाही. खरंच...
**धनंजय** : अस्सं ! तुला सांगायचं नाही तर ! (क्षणभर रोखून पाहून) नको सांगूस. तू सांगितलं नाहीस तरी सगळ्या गोष्टी मला समजल्याखेरीज राहणार नाहीत. त्याच्या हालचालीवर माझं बारीक लक्ष आहे. माझे दूत हिंडताहेत त्याच्या मागावर, समजलीस ?
**चारुशीला** : कोणी तरी येऊन कान भरलेले दिसताहेत तुमचे.
**धनंजय** : कोणी तरी येऊन कान भरायला कशाला हवेत ? दृष्टीसमोर चाललेली बेइमानी बघायला मला काय डोळे नाहीत ? पण अन्नदात्याशी विश्वासघात करणाऱ्या माणसाला तू पाठीशी घालावंस याचं आश्चर्य वाटतं मला चारू !
**चारुशीला** : (निश्चयाने) मला कोणालाही पाठीशी घालायचं नाही आणि तुमच्यापासून काहीही लपवायचं नाही. एक दिवस तुम्हाला सगळं काही मला सांगावं लागणारच होतं. कारखान्याच्या काळजीनं तुम्ही सध्या बेचैन झाला आहात म्हणून मी आतापर्यंत गप्प बसले होते.
**धनंजय** : काळजी दूर करायचा मोठा अजब उपाय दिसतो आहे तुझा. माझ्या कारखान्याचा सत्यानाश झाल्यावर मग शामसुंदरच्या कारवायांवर प्रकाश टाकणार आहेस वाटतं तू ?
**चारुशीला** : (विस्मयाने) कारखान्याचा सत्यानाश ? शामसुंदरच्या कारवाया ? म्हणजे ?
**धनंजय** : आता वेड पांघरून पेडगावला जाण्यात काय अर्थ ? कामगारांना माझ्याविरुद्ध चिथावण्याचे त्याचे सगळे उद्योग मला पुरते कळून चुकले आहेत, समजलीस ?
**चारुशीला** : (थक्क होत) कामगारांना चिथावण्याचे ? म्हणजे तुम्ही... तुम्ही...
**धनंजय** : तुम्ही तुम्ही काय करतेस ? शामसुंदरची चिथावणी नसती तर अवघ्या चार दिवसांत कामगारांनी माझ्यापुढं सपशेल शरणागती दिली असती. तुझा मित्र म्हणून मी त्याच्यावर विश्वास ठेवला, त्याची चांगली अद्दल घडवली त्यानं मला.
**चारुशीला** : इतका वेळ कामगारांच्या उठावाबद्दल का तुम्ही बोलत होता ?
**धनंजय** : मग काय ? तुझ्या नाटक मंडळीतल्या भानगडीबद्दल घसाफोड करीत होतो

मी असं वाटलं होय तुला ?

( चारुशीला हसू लागते. मोठमोठ्याने हसू लागते. वेड्यासारखी हसू लागते. )

**धनंजय :** चारू...चारू... हसण्यावारी घालवण्यासारखी क्षुल्लक बाब नव्हे ही !

**चारुशीला :** ( एकदम गंभीर होत ) फार फार भोळे आहात तुम्ही !

**धनंजय :** ते उघडच आहे. आपल्या हातानं असला जळता निखारा मी माझ्या कारखान्यात घेतला आणि आता चारी बाजूंनी आग भडकली तेव्हा...

**चारुशीला :** कारखाना ! कारखाना ! कारखाना ! माझ्याशी लग्न करण्याच्याऐवजी कारखान्याशी लग्न लावलं असतं तर बरं सुख लागलं असतं— तुम्हाला आणि मलाही !

[ असे म्हणून त्वेषाने माडीवर निघून जाते. धनंजय " चारू... चारू..." अशी हाक मारीत तिच्या मागे जिन्यापर्यंत जातात. मग क्षणभर ती गेलेल्या दिशेकडे बघत, हताशपणे मागे वळत— ]

**धनंजय :** कितीही लाड करा, कशीही हौस पुरवा, अखेर बायका त्या बायकाच ! या जगात कोणावर विश्वास टाकायची सोय राहिली नाही. हक्काच्या बायकोवरदेखील प्रेम करण्यात अर्थ उरला नाही.

[ इतका वेळ मागे उभे राहून डॉक्टर भगवंतराव आणि योगीराज शिवानंद हा प्रसंग लक्षपूर्वक बघत आहेत. डॉक्टरांची मुद्रा चिंताक्रांत तर योगीराजांच्या मुद्रेवर तामसी समाधानाचे स्मित दिसते. ]

**योगीराज :** ( पुढे येऊन धनंजयांच्या खांद्यावर हात ठेवीत ) तुम्ही जरा शवासन करा शवासन !

**धनंजय :** काय म्हणालात ? शवासन ?

**योगीराज :** शवासन केलं म्हणजे तेवढंच मन शांत होतं आणि घटकाभर प्रपंचात गुरफटलेला आत्मा मुक्त होतो.

**डॉक्टर :** पण प्रपंचाबद्दल एवढा तिरस्कार का म्हणून ?

**योगीराज :** मुळातच प्रपंच दुःखस्वरूप आहे म्हणून !

**डॉक्टर :** खोटं आहे. एका आनंदाशिवाय प्रपंचाला दुसरं रूपच नाही.

**धनंजय :** तुम्हालाही विश्वरहस्याचा साक्षात्कार झालेला दिसतोय डॉक्टर ! प्रिया भेटला होता वाटतं अलीकडं तुम्हाला कधी ?

**योगीराज :** फार जुना वाद आहे डॉक्टरसाहेबांचा आणि आमचा. डॉक्टर, तुमचं आमचं या बाबतीत कधीच पटणं शक्य नाही. खुद्द तुकाराम महाराजांनीदेखील म्हटलंय—

**धनंजय :** काय म्हटलंय ?

**योगीराज :** " सहसा प्रपंची करू नये सौजन्य । सेवावा अरण्य एकांतवास ! "

**डॉक्टर :** देवकोटीला पोचलेल्या माणसांना वैराग्याच्या गुहेत नेऊन फसवणं फार सोपं आहे योगीराज !

**योगीराज :** चुकताहात डॉक्टर ! वैराग्याच्या बाबतीत देवांच्यापेक्षा माणसांचीच समजूत घालणं फार सोपं आहे, असं म्हणा.

[ तेवढ्यात बाहेरून काकासाहेब आणि हरिभाऊ बोलत प्रवेशतात. ]

**काकासाहेब :** कोणाचीही समजूत घालणं सोपं नाही. हटवादी झाले आहेत एकापेक्षा एक !

**धनंजय :** ( उत्सुकतेने ) शिष्टमंडळाच्या भेटीचं काय झालं पुढं ?

**काकासाहेब :** शिष्टाई मोडली धनंजय.

**धनंजय :** होय ना ? मला वाटलं तसंच झालं शेवटी !

**काकासाहेब :** कामगार-पुढारी आपल्या मागण्यांपासून एक तसूभरदेखील माघार घ्यायला तयार नाहीत !

**धनंजय :** माथेफिरू माणसांना उगाच भलतं महत्त्व दिलंत तुम्ही हरिभाऊ—

**हरिभाऊ :** छे छे, धनंजय ! अहो चांगला समझोता होत आला होता. पण ऐन वेळी काय झालं, कोणी कळ फिरवली कोण जाणे. पुढाऱ्यांनी आपले शब्दच फिरवायला सुरवात केली; तेव्हा मला आजची बैठक तात्पुरती रद्द करणं भाग पाडलं.

**धनंजय :** तात्पुरती ? म्हणजे हरिभाऊ, तुम्ही पुन्हा भेटणार आहात पुढाऱ्यांना ?

**हरिभाऊ :** धनंजय, यश येणं न येणं या काही आपल्या हातच्या गोष्टी नाहीत. पण शेवटपर्यंत प्रयत्न करीत राहणं हे मुख्यमंत्री म्हणून माझं कर्तव्यच आहे.

**काकासाहेब :** ( हसून ) हरिभाऊ, हा मात्र खडक नांगरून बी पेरायचा प्रयत्न आहे हं तुमचा !

**हरिभाऊ :** गोड फळाची अपेक्षा करणाऱ्यानं खडक नांगरायलादेखील तयार असलं पाहिजे काकासाहेब !

**धनंजय :** शिष्टाई मोडली म्हणजे कामगारांच्या हिंसक उठावांना आता ऊत येईल.

**काकासाहेब :** तेवढ्यानं काय झालंय ? तुमच्या कारखान्यातली टाळेबंदी मागं घेतली गेली नाही तर सार्वत्रिक संपाचं हत्यार उपसण्याची धमकी दिलीय हरिभाऊंना आज कामगार-पुढाऱ्यांनी, आहे माहीत ?

**धनंजय :** ( त्वेषाने ) खरोखरीच इतके उन्मत्त झाले असले हे पुढारी तर हरिभाऊ, अगदी कडक निर्धारानं आणि पोलादी हातानं दडपून टाकल्या पाहिजेत तुम्ही त्यांच्या सगळ्या चळवळी !

**काकासाहेब :** हंऽऽ ! मी तेच सांगतोय हरिभाऊंना की असल्या प्रकरणात दया-माया आणि अहिंसा बिलकुल उपयोगी नाहीत. लाठीमार, वेळप्रसंगी गोळीबार आणि तितकीच गरज पडली तर लष्कराचा जालीम इलाज यांना राज्यकर्त्यांनी डरून कसं चालेल ? काय योगीराज ?

**योगीराज :** अगदी योग्य तोच सल्ला दिलात काकासाहेब. एका हातात राजदंड धारण करणाऱ्यांनी दुसऱ्या हातात शस्त्र घेतलंच पाहिजे. राज्यशास्त्राचा सिद्धांतच आहे हा !

**काकासाहेब :** होऽ ऽ आणि राष्ट्रद्रोही कृष्णसर्प निघाले की जागच्या जागी ठेचलेच पाहिजेत !

**हरिभाऊ :** ( हसून ) लाठीमार ! गोळीबार ! लष्करी इलाज ! किती सहजतेनं आणि केवढ्या उत्साहानं बोलताहात काकासाहेब तुम्ही या अघोरी उपायांबद्दल ? काकासाहेब, हातात राजदंड धारण केला म्हणजे कार्यकर्त्यांनी भूतकाळातला ध्येयवाददेखील विसरला पाहिजे, असाही काही सिद्धान्त आहे का राज्यशास्त्रात ?

**काकासाहेब :** कोणता ध्येयवाद हरिभाऊ ?

**हरिभाऊ :** पाहा— तुम्ही राजदण्डाला स्पर्श न करतादेखील बेचाळीसच्या चळवळीतला तो रोमांचकारी प्रसंग विसरलात. आठवतं तुम्हाला— आठ वर्षांच्या एका बालिकेनं हातातला तिरंगी ध्वज सोडला नाही, म्हणून एका गोऱ्या सार्जंटनं निर्दयपणे तिच्यावर पिस्तुल चालवलं होतं. त्या सार्जंटला शर्थीनं पकडून आणून खवळलेल्या समुदायापुढं भर चौकात जिवंत जाळायला काही उसळत्या रक्ताचे क्रांतिकारक निघाले होते. त्या वेळी समुदायात घुसून, काकासाहेब, तुम्ही क्रांतिकारकांना बजावलंत की, " हात आवरा ! हा बापूजींचा मार्ग नव्हे ! " आणि स्वतःचा जीव धोक्यात घालून तुम्ही त्या सार्जंटची मुक्तता केलीत.

**काकासाहेब :** ( हसून ) तो काळ वेगळा होता हरिभाऊ ? आपण पारतंत्र्यात होतो त्या वेळी ?

**हरिभाऊ :** होय ! आता आपलं पारतंत्र्य गेलं आणि पेटलेल्या क्षणांचा तो काळही संपला. आता उरलो आहोत आपण विझलेले देशभक्त ! हीच दुर्दैवाची गोष्ट आहे काकासाहेब ?

**धनंजय :** पण कामगारांच्या बाबतीत कोणता निर्णय घ्यायचा ठरवलंय हरिभाऊ, तुम्ही... ?

**हरिभाऊ :** तुमच्या बाबतीत मी काय ठरवलंय ते सांगतो हवं तर तुम्हांला धनंजय.

**धनंजय :** ( विस्मयाने ) माझ्या बाबतीत ?

**हरिभाऊ :** होय, कारखान्याची टाळेबंदी तुम्ही प्रथम बिनशर्त मागे घेतली पाहिजे आणि—

**धनंजय :** ( विस्मयाचा धक्का बसून ) काय म्हणलात ? टाळेबंदी मी मागं घेतली पाहिजे ? आणि तीदेखील बिनशर्त ?

**हरिभाऊ :** होय धनंजय, आणि कामगारांच्या पुढं सौजन्याचा हात प्रथम तुम्ही केला पाहिजे असं.

**धनंजय :** अशक्य ! इम्पॉसिबल !

**काकासाहेब :** मग काय बघायलाच नको. कामगारांचं चांगलंच फावलं.

**हरिभाऊ :** तुम्ही तुमच्याकडून सदिच्छा दर्शवलीत म्हणजे कामगारांनाही दोन शब्द अधिकारवाणीनं मला सांगता येतील. टाळेबंदी बिनशर्त मागं घेण्यात तुमचं काहीदेखील

नुकसान नाही धनंजय.

**धनंजय :** प्रश्न नुकसानाचा नसून माझ्या प्रतिष्ठेचा आहे.

**काकासाहेब :** बरोबर ! जान गेली तरी माणसानं प्रतिष्ठा सोडता कामा नये.

**धनंजय :** आज मी कामगारांच्या समोर हार खाल्ली तर रोजच्या रोज माझा अधिकार त्यांनी चेपत नेलाच म्हणून समजा. धंद्यातून उठायची पाळी येईल मला एक दिवस असल्या औदार्यानं.

**काकासाहेब :** तर काय ? कच्चे खाऊन टाकतील तुम्हांला हे कामगारपुढारी. आहात कुठं ?

**हरिभाऊ :** काकासाहेब, धनंजय, समझोत्याचे सगळे मार्गच बंद करून टाकायचं ठरवलंय का तुम्ही ? पुढल्या गंभीर परिणामांची तुम्हांला अजून पुरी कल्पना आलेली दिसत नाही ?

**धनंजय :** पोलीसांचं पाठबळ सज्ज आहे तोपर्यंत कसल्याही गंभीर परिणामाची मला पर्वा वाटत नाही.

**हरिभाऊ :** धनंजय, पोलीसांच्या पाठबळाचा तुम्हांला काडीचाही उपयोग होणार नाही...

**धनंजय :** म्हणजे ? याचा अर्थ काय ?

**हरिभाऊ :** सत्ता स्वीकाराच्या पहिल्याच दिवशी मी जाहीर केलेली प्रतिज्ञा तुम्ही विसरलात का ? नाही धनंजय ! जनतेचा कोणताही उठाव शस्त्रबळानं शमविण्यासाठी मी अधिकारपदावर आहे तोपर्यंत पोलीसांचा उपयोग केला जाणार नाही.

**काकासाहेब :** म्हणजे ? कायदा, शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात आली तरी देखील... ?

**हरिभाऊ :** होय, तरीदेखील ! केवळ शस्त्राच्या भीतीतून निर्माण झालेली शांतता आणि सुव्यवस्था नको आहे मला. पोलीसांच्या कायद्यापेक्षा माणसांच्या चांगुलपणावर माझा जास्त विश्वास आहे काकासाहेब !

**काकासाहेब :** माणसाच्या चांगुलपणावरला तुमचा हा भोळा विश्वासच एक दिवस तुम्हांला गोत्यात आणणार आहे बरं का हरिभाऊ ! काय योगीराज ?

**योगीराज :** स्पष्ट बोलू का ? माणसाचा चांगुलपणा हे एक गोड मनोराज्य आहे देवाचं. त्याचा वस्तुस्थितीशी काहीएक संबंध नाही. पटलं का आता तरी डॉक्टरसाहेब ?

**डॉक्टर :** ( हसून, उपरोधाने ) पटलं म्हणजे ? प्रत्यक्ष डोळ्यांसमोरच बघतो आहे ना मी... ?

**काकासाहेब :** ( शंका येऊन ) काय बघता आहात ?

**डॉक्टर :** (हसून) देवांच्या मनोराज्याचा विध्वंस करण्याची कारवाई इथं कशी चालते ती ?

[ काकासाहेबांची आणि योगीराजांची मुद्रा बघण्यासारखी होते तोच शामसुंदर घाबऱ्या घाबऱ्या प्रवेशतो आणि—]

**धनंजय :** कोण शामसुंदर, तुम्ही ? पुन्हा इथं ? याचा अर्थ—

**शामसुंदर :** ( घाबऱ्या घाबऱ्या ) जस्ट अ मिनिट, आधी मला सांगा, इकडच्या बाजूला आले का ते ?

**धनंजय :** कोण आले ? कोण येणार होते ?

**काकासाहेब :** इकडं कोणी आलं नाही आणि गेलं नाही. पण घाबरायला काय झालं तुम्हाला एवढं ?

**शामसुंदर :** ( परत व्हेरांड्यात जाऊन बघत ) मग ते गुदामाकडेच गेले. शंकाच नको.

**धनंजय :** कोण गुदामाकडे गेले ? नीट सरळ सरळ स्पष्ट सांगा पाहू ?

**शामसुंदर :** कामगार.

**हरिभाऊ :** कामगार ? म्हणजे ? कामगार गुदामाकडं कशाला जातील ?

**शामसुंदर :** गुदाम जाळून टाकण्याचा बेत आहे खवळलेल्या कामगारांचा.

**हरिभाऊ :** ( धक्का बसून ) गुदाम जाळून टाकण्याचा ?

**धनंजय :** गुदाम जाळून टाकण्याचा ? इथपर्यंत मजल गेली काय त्यांच्या मस्तवालपणाची !

**शामसुंदर :** शिष्टाई मोडली असं कळल्यापासून भयंकर भडकून उठले आहेत सगळे कामगार. कारखान्याचीच नासधूस करण्याचा त्यांचा विचार होता; पण गुरख्यानं शिताफीनं गेट बंद करून घेतलं म्हणून जमावाचं काही चाललं नाही. मागच्या खिडकीतून उडी मारून मी पळालो म्हणून बचावलो, नाही तर—

**धनंजय :** तुमच्या कृतघ्नपणाचं प्रायश्चित्त तुम्हाला मिळायलाच हवं होतं शामसुंदर. कामगारांना भडकावायला तुम्ही कारण झाला आहात. तुमच्या सगळ्या कारवाया कळल्या आहेत मला, समजलात ?

**शामसुंदर :** गैरसमज झालाय हा तुमचा साहेब. कामगारांचं नेतृत्व करतो आहे तुमचा किसन.

**धनंजय :** किसन ? शक्य नाही !

**शामसुंदर :** वाटल्यास कारखान्याच्या आवारापाशी जाऊन पाहा डोळ्यांनी म्हणजे खात्री पटेल तुमची ! हात तुटले तरी अजून उपद्‌व्याप संपले नाहीत या किसनबाळाचे.

**धनंजय :** कृतघ्न ! स्वतःचा जीव धोक्यात घालून वाचवला मी या किसनला, त्याला पुरता महिनादेखील झाला नाही, तोच सापासारखा आज माझ्यावर उलटला काय ?

**काकासाहेब :** माणसाची जात ! वेळ आली की ती अशी उलटायचीच ! काय योगीराज ?

**योगीराज :** ते या डॉक्टरसाहेबांना सांगा. माणसाच्या चांगुलपणाची फार स्तोत्रं गात

असतात हे. ( डॉक्टर फक्त अर्थपूर्ण स्मित करतात. )

**धनंजय :** ( रागाने ) सरकार हात बांधून स्वस्थ बसणार असलं तरी मला आता माघार घेता येणार नाही. कारखान्यासकट मला धुळीला मिळवू पाहणाऱ्या असल्या शेकडो सर्पांना ठेचून टाकण्याची माझ्या मनगटांत अजून हिम्मत आहे. ( असे म्हणत जिन्यांतून त्वेषाने वर जाऊ लागतात. )

**हरिभाऊ :** धनंजय, धनंजय शांत व्हा ! काय विचार काय आहे तुमचा ?

**धनंजय :** ( जिन्यातून वळून ) तुमचा शांतिपाठ द्या या उरलेल्या सज्जनांना. माझा रिव्हॉल्वर लोड करायला जातोय मी.

**हरिभाऊ :** धनंजय, असा अविचार करू नका ! धनंजय, धनंजय...

[ धनंजय त्वेषाने निघून जातात. हरिभाऊ असहायतेने मागे वळतात आणि... ]

**हरिभाऊ :** काकासाहेब, या पेचप्रसंगाला काही तोड निघेल असं मला वाटत नाही.

**काकासाहेब :** ( कावेबाजपणे ) हरिभाऊ, तुम्ही आपला हट्ट सोडलात तर तोड काय, तुमच्या अगदी हातात आहे.

**हरिभाऊ :** म्हणजे ? कोणती तोड सांगता आहात तुम्ही ?

**काकासाहेब :** कारखान्याच्या संरक्षणासाठी शस्त्रधारी पोलीसांची एक तुकडी रवानगी करण्याचा कमिशनरसाहेबांना आदेश दिलात तरी पुरे. काय योगीराज ?

**हरिभाऊ :** ( असहायतेने ) पण कसं शक्य आहे ते ? माझी प्रतिज्ञा— छे छे प्रतिज्ञा-भंगाचं पाप शिरावर घेण्यापेक्षा अधिकारपदाचा राजिनामा दिलेला पुरवला.

**योगीराज :** ( हसून ) एकदा पुढं टाकलेलं पाऊल मागं घेता येत नाही हरिभाऊ !

**काकासाहेब :** ( सुस्कारून ) हू ! ठीक आहे. मग धनंजयाचं गुदाम आज काही शिल्लक राहात नाही. आता निदान फायर ब्रिगेडला तरी कळवून ठेवा म्हणजे निदान आग पसरायची नाही फार ! काय डॉक्टरसाहेब—?

**डॉक्टर :** ( हसून ) ते 'आग लावणाऱ्यांना' माहीत !

**योगीराज :** ( गडबडीने ) गुदामाचं राहू द्या हरिभाऊ, पण धनंजयाच्या जिवाची तरी काळजी आहे की नाही तुम्हाला ?

**हरिभाऊ :** ( व्यथित होऊन ) धनंजयाच्या जिवालासुद्धा धोका आहे असं वाटतं तुम्हाला ?

**काकासाहेब :** ( हसून ) खवळलेल्या समुदायाचं मानसशास्त्र माहीत नाही तुम्हाला अजून हरिभाऊ. अहो खवळून उठलेल्या कामगारांचा कोणी नेम सांगावा ?

**हरिभाऊ :** ( व्यथितपणे ) अशा परिस्थितीला मी शरण जावं असाच नियतीनं निश्चय केलेला दिसतो आहे. ( पडलेल्या मुद्रेने जाऊ लागत ) ठीक आहे. धनंजयाची समजूत घालता येते का ते पाहतो मी; नाही तर शेवटी हा उपाय आहेच !

[हरिभाऊ जिन्याने वर निघून जातात. काकासाहेब त्यांच्या मागोमाग

जिन्यापर्यंत जाऊन कानोसा घेतात. डॉक्टरही सहजगत्या जिन्यापर्यंत जातात आणि मग क्षणार्ध थबकून काही एका निश्चयाने मागे फिरतात. तोच रंगभूमी स्वर्गाच्या प्रकाशरंगात उजळते. भगवान विष्णु, ब्रह्मदेव, महादेव आणि मदन वेषान्तरित रूपातच, पण परस्परांना मात्र मूळ भूमिकेत प्रगट होतात. आणि—]

**ब्रह्मदेव :** छान ! सुरेख ! कामगिरी तर उत्तम पार पडली. आता विश्वरहस्याच्या सुरक्षिततेबद्दल मुळीच काळजी करायचं कारण नाही !

**महादेव :** थांबा ! इतक्यात हुरळून जाऊ नका. ब्रह्मदेवा, अजून प्रियदर्शन मोकळा आहे आणि त्याच्या भेटीगाठी, चर्चा आणि मुलाखती जोपर्यंत निर्वेध चालल्या आहेत तोपर्यंत ' विश्वरहस्या 'ला धोका संपला आहे असं मला वाटत नाही.

**ब्रह्मदेव :** महादेवा, त्याची आपण मुळीच काळजी करू नका ! विद्युल्लता सावली-सारखी त्याच्यावर पहारा करीत हिंडते आहे. मानवांच्या समुदायात तिनं त्याला इतका हास्यास्पद करून टाकला आहे की यापुढं कोणताही शहाणा माणूस त्याच्या शब्दावर विश्वास ठेवील असं मला वाटत नाही.

**महादेव :** (गाशा गुंडाळीत) तर मग ब्रह्मदेवा, आता इथं अनर्थाला, आरंभ होण्यापूर्वीच आपण ही रूपं इथंच सोडून अन्तर्धान पावणं मला वाटतं इष्ट होईल.

**ब्रह्मदेव :** केवळ आपली एक जिज्ञासा म्हणून विचारतो हो महादेवा, म्हणजे या कुटुंबाच्या भविष्यात अनर्थाच्या कोणत्या घटना योजून ठेवल्या आहेत आपण ?

**महादेव :** अनर्थाची आखणी करणारा मी कोण ? अनर्थाचा तपशील ठरविण्याचा प्रश्न नियतीच्या कक्षेतला आहे. या कुटुंबातल्या माणसाची वाटेल तशी विल्हेवाट लावायला नियती पूर्ण स्वतंत्र आहे.

**ब्रह्मदेव :** (चिन्ताक्रान्त भगवंताच्या मुद्रेकडे बघून अदबीने) देवाधिदेवा, पृथ्वीचा संहार न करता विश्वरहस्याचं रक्षण करण्याचं आपलं उद्दिष्ट तर जवळ जवळ साध्य झालं, मग आपण असे चिन्ताक्रान्त का ?

**भगवंत :** (उद्विग्नतेने) ब्रह्मदेवा, मृत्युलोकावर पाय ठेवीतोपर्यंत माझी अशी कल्पना होती की माझ्यापुढं फक्त मानवांच्या उद्धाराचाच प्रश्न काय तो उभा आहे. पण मृत्यु-लोकातील संचारात जे मी पाहिलं, ऐकलं आणि अनुभवलं त्यावरून माझी खात्री पटली आहे की मानवांच्या अगोदर मानवी जीवनाचं नियंत्रण करणाऱ्या सगळ्या दैवी शक्तींच्या उद्धाराचा प्रश्न मला तातडीनं हाती घेतला पाहिजे. देवांचं अधःपतन थांबवल्याखेरीज मानवांचा उद्धार होणं शक्य नाही.

**ब्रह्मदेव :** देवांचं अधःपतन ?

**महादेव :** दैवी शक्तींचा उद्धार ?

**भगवंत :** मानवी जीवनात अनर्थाची वादळं तुम्ही निर्माण केलीत आणि अनर्थाच्या तपशिलासाठी मात्र बोट दाखवलंत तुम्ही नियतीकडं ! निष्पाप माणसांची वाताहात

बघून व्यथित होण्याऐवजी तुम्ही हर्षभरित झालात, ब्रह्मदेवा, महादेवा, दैवी शक्तीच्या अधःपतनाचा यापेक्षा दुसरा कोणता पुरावा हवा आहे तुम्हाला ?

**ब्रह्मदेव :** देवाधिदेवा, पण विश्वरहस्याच्या सुरक्षिततेसाठी तरी—

**भगवंत :** सूड घेतल्यासारखा या सगळ्या माणसांचा असला क्रूर छळ करण्याची काही गरज होती का ? मृत्युलोकावर निघताना मी दिलेला आदेश आठवा आणि प्रत्यक्षातली तुमची कृती पाहा. विश्वरहस्यानं आंधळ्या झालेल्या एका मानवाला हसत खेळत डोळस करण्यासाठी आपण इथं आलो आणि एकाऐवजी तीन माणसांचा समूळ उच्छेद करून तुम्ही मोकळे झालात !

**ब्रह्मदेव :** होऽऽ ! कदाचित या एका बाबतीत आमचा तोल गेला असणं शक्य आहे. पण देवाधिदेवा,—

**भगवंत :** या एकाच बाबतीत नव्हे— सबंध जीवसृष्टीच्या बाबतीतच तुम्हा देवांचा तोल गेला आहे. आनंदाच्या एका दिव्य कंदातून फुलून आलेल्या जीवनसृष्टीला, तुम्ही देवांनी अनंत प्रकारच्या दुःखाची धग लावलीत, आणि तिचं निर्माल्य करून टाकलंत. जीवन हीच मानवाला विकृती वाटावी आणि मरण ही जीवसृष्टीची प्रकृती भासावी, अशी या मृत्युलोकाला तुम्ही देवांनी स्मशानाची कळा आणलीत. जीवनाचा हेतू मानवांना सहजगत्या साध्य व्हावा, म्हणून मी स्वर्गलोकीच्या अमृतातून स्त्रीपुरुषांना बद्ध करणारी प्रीती निर्माण केली. पण तुम्ही देवांनी, प्रीतीच्या या निरागस आनंदात-देखील वैफल्याचं विष ओतलंत आणि मानवाच्या ओठाला लावलात हलाहलाचा पेला. महादेवा, मानवी जीवनाबद्दलचे माझे थोर संकल्प आणि तुम्ही साधलेली भयाण सिद्धी यात कुठं ताळमेळच उरलेला नाही.

**ब्रह्मदेव :** आपले संकल्प आणि प्रत्यक्षातली सिद्धी यात कुठंच ताळमेळ उरलेला नाही ही अगदी सत्यस्थिती आहे. पण देवाधिदेवा, या ताळमेळाचा आणि कर्तृत्वाचा मात्र काडीचाही संबंध नाही हे मी पुन्हा एकदा आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

**भगवंत :** महादेवा, तर मग मानवाच्या वाट्याला येणाऱ्या अपरंपार दुःखाला आणि महानैराश्याला जबाबदार कोण ?

**महादेव :** स्पष्टोक्तीबद्दल क्षमा करावी. पण देवाधिदेवा, मानवाच्या अपरंपार दुःखाला आणि महानैराश्याला सर्वस्वी आपण एकटे जबाबदार आहात.

**ब्रह्मदेव :** महादेवा, महादेवा— ?

**भगवंत :** ( धक्का बसून ) महादेवा, काय बोलता आहात तुम्ही ? मी ? मी जबाबदार आहे मानवाच्या महानैराश्याला, दारुण दुःखाला ?

**महादेव :** होय. या अनर्थाच्या परंपरेला आपण कारण झाला आहात. जीवसृष्टीच्या प्रारंभकाली देवसभेत मी जो इशारा दिला होता, तो आपण निर्मितीच्या उन्मादात जुमानला नाहीत; त्याचे अपरिहार्य परिणाम भोगावे लागत आहेत सबंध मानव-जातीला ! अनादिसिद्ध असलेल्या विश्वमालेचा आणि नंतर आपण जन्माला

घातलेल्या जीवसृष्टीचा अर्थाअर्थी कसलाही संबंध नाही, हे आपल्याला पूर्णपणे माहीत होतं; खरं आहे ना ? या विश्वमालेची धारणा, तिची गती, तिचे परिभ्रमण, तिचे उत्पात, तिच्यातील चिरशांतता ही सर्वस्वी वेगळ्या आणि स्वतंत्र नियमांनी बद्ध आहे याचीदेखील आपल्याला पूर्ण कल्पना होती, होय ना ? मग देवाधिदेवा, असल्या विश्वमालेवर जीवसृष्टीचा हा विचित्र प्रयोग आपण का आरंभलात ? या विश्वरूपाशी सर्वस्वी विसंगत असा मानव आपण का म्हणून घडवलात ? असल्या विचित्र, विसंगत आणि विलक्षण प्रयोगांपायी, दारुण दुःख भोगणाऱ्या पशुपक्ष्यांना आणि कीटकांना, निदान दुःखाचं दुःखरूप जाणण्याची शक्ती तरी लाभलेली नाही. पण हलाहल पचविणाऱ्या देवांनाच पटेल असली ही समाजशक्ती दुबळ्या देहाच्या मानवाला आपण का दिलीत ? मग मृत्यू हाच ज्या विश्वाचा महाप्राण आहे, अशा विश्वात सबंध जीवसृष्टीची परवड निघाली तर मानवाच्या पदरात दुःख आणि महानैराश्य यांखेरीज दुसरं कोणतं श्रेय पडणार ? विश्वमालेचे नियम पाळणाऱ्या दैवी शक्तीचा पाणउतारा करण्याअगोदर, देवाधिदेवा, असला दुर्दैवी प्रयोग करू पाहणाऱ्या आपल्या प्रतिभेला आपण दोष द्या !

**भगवंत :** महादेवा, तुम्ही ज्याला निर्मितीचा उन्माद समजलात ती एक दिव्य समाधी होती. विश्वमालेच्या निर्जीव नियमावलीचे तुम्ही माझ्यापुढं कितीही गोडवे गाइलेत, तरी जिच्या कुशीतून जीवनसृष्टीचे कोंभ फुटत नाहीत त्या विश्वमालेचं अस्तित्वच शून्यवत आहे अशी माझी श्रद्धा आहे. आणि माझी खात्री आहे की सदिच्छेनं प्रेरित झालेल्या देवांनी आपली तपश्चर्या पणाला लावली तर विश्वमालेच्या पोलादी यंत्रणेलादेखील वात्सल्याचे अंकुर फुटल्याशिवाय राहणार नाहीत. महादेवा, तुम्ही उदासीन असलात तरी मी अजून आशा सोडलेली नाही. एक दिवस तोही चमत्कार घडलेला तुम्हाला दिसेल.

**महादेव :** असल्या चमत्कारावरला भोळा विश्वास फक्त देवांच्या मनोराज्यातच शोभण्यासारखा आहे !

**भगवंत :** ठीक आहे ! कोण कसल्या मनोराज्यात धुंद आहे याचा निर्णय युगायुगांतरांनी तरी लागेलच. आपली कामगिरी संपली आहे असं तुम्हाला वाटतं ना ? मग तुम्ही आपापली रूपं इथंच सोडून स्वर्गलोकी प्रयाण करायला मोकळे आहात. जा, तुम्हाला माझी अनुज्ञा आहे.

**ब्रह्मदेव :** आणि देवाधिदेवा आपण ?

**भगवंत :** तुम्ही पेरलेल्या अनर्थांच्या बीजांची पुरी विल्हेवाट मला लावलीच पाहिजे; आणि ती लागेपर्यंत मला आता इथंच थांबणं भाग आहे !

[ तोच पूर्वीच्याच प्रकाशरंगात रंगभूमी पुन्हा उजळते. जिन्यातून चारुशीला घाईघाईने धावऱ्या धावऱ्या " काकासाहेब... काकासाहेब..." अशी हाक मारीत प्रवेशते आणि—]

**चारुशीला :** काकासाहेब, तुम्ही तरी माडीवर चला आणि त्यांची समजूत घाला. नाही तर काही तरी अनर्थ घडल्याखेरीज राहणार नाही आज !

**काकासाहेब :** कोणाची समजूत ? धनंजयांची ?

**चारुशीला :** होय. हट्टालाच पेटले आहेत ते. भरलेलं पिस्तुल घेऊन कारखान्याकडे जायला निघाले आहेत. भाऊचंदेखील ऐकायला तयार नाहीत.

**काकासाहेब :** ( डॉक्टरांच्याकडे पाहात ) प्रसंग तर मोठा कठीण दिसतो !

**डॉक्टर :** काही एक कठीण नाही. इच्छा असली म्हणजे मार्ग निघतो आणि सद्भावनेला आवाहन केलं म्हणजे सगळ्यांच्या समजुती पटतात. चला काकासाहेब ! योगीराज, तुम्हीदेखील चला. तुमच्यापेक्षा माझ्या सल्ल्याचीच धनंजयांना आज जास्त आवश्यकता आहे. चारुताई, तुम्ही इथंच थांबा. ( काकासाहेब आणि योगीराज कष्टी मुद्रा करून जिन्याने वर जातात. सर्वांत शेवटी डॉक्टर जातात. जाता जाता डॉक्टर जिन्यात थबकतात आणि शामसुंदर वळून म्हणतात— ) मदनराज, तुमचं काम संपलं आहे. तुम्ही आता परतलात तरी चालेल.

[ शामसुंदर किंचित वाकून " जशी आपली आज्ञा " असे हलकेच पुटपुटतो आणि कुत्सितपणे हसत हसत बाहेर निघून जातो. व्हरांड्यातून तो बाहेर पडला असेल नसेल तोच चारुशीला " शाम...शाम..." अशी हाक मारीत लगबगीने खाली येते. ती हाक ऐकून क्षणार्धाने बाहेर गेलेला शामसुंदर पुन्हा परत येतो. तो शामसुंदर मात्र आपल्या मूळच्या आणि खऱ्या खऱ्या वृत्तिविशेषांत म्हणजे शामसुंदरमधील मदनाचा संचार आता नाहीसा झाला आहे. त्याबरोबरच या शामसुंदरमधील तडफ बोलघेवडेपणा, लाघवीपणा, उतावळेपणा आणि हालचालीतली सफाई मावळलेली स्पष्ट दिसते. रूपावरून वा वेषावरून नव्हे, पण एकंदर बोलण्याचालण्यावरून " हाच का शामसुंदर?" अशी शंका चारुशीलेप्रमाणे प्रेक्षकांनाही पडल्यास नवल नाही. दिङ्मूढ आणि कष्टी मुद्रेने शामसुंदर संथपणे प्रवेशतो आणि— ]

**शामसुंदर :** तुम्हीच हाक मारलीत का मला ?

**चारुशीला :** हो. तू आलास केव्हा आणि निघालास का ? माझ्याशी न बोलताच निघाला होतास वाटतं ?

**शामसुंदर :** तुमच्याशी न बोलता ? छे, तसं काही नाही.

**चारुशीला :** अग बाई ! आज ' अहो जाहो 'ची नवी भाषा सुरू झालेली दिसते आहे !

**शामसुंदर :** अं ? अं ?

**चारुशीला :** ' अं अं ' काय करतोस ? काल विठोबाबरोबर मी पाठवलेले पैसे मिळाले ना ?

**शामसुंदर :** अं... हो मिळाले.

**चारुशीला :** मघाशी गडबडीत विचारायचं विसरलेच मी. तेवढे पुरतील ना ?

**शामसुंदर :** बरोबरच आणले आहेत मी ते पैसे. ( खिशातून एक पाकीट काढून पुढे करीत ) हं. घ्या हे सगळे नीट मोजून. बरोबर साडेचारशे रुपये आहेत.

**चारुशीला :** ( विस्मयाने ) म्हणजे ? पैसे परत कशाला आणलेस ?

**शामसुंदर :** रागावू नका. पण माझी देणी भागवण्यासाठी तुमच्याकडून पैसे घेणं मला प्रशस्त वाटत नाही.

**चारुशीला :** मग देणी कशी भागवणार तू ?

**शामसुंदर :** अं ? हो. तो प्रश्नच आहे.

**चारुशीला :** माझी देणी भागली नाहीत तर इथून आपल्याला निघता कसं येईल आज रात्री ?

**शामसुंदर :** हो, तोदेखील प्रश्नच आहे.

**चारुशीला :** म्हणजे ? तुझा विचार तर बदलला नाही ना ? ( तो गप्प राहतो. ) आज रात्रीच्या गाडीनं निघायचं हा बेत तरी पक्का आहे ना ? ( तरीही तो गप्प राहतो. ) बोल ना ? तू असा मूकस्तंभासारखा गप्प राहिलास तर माणसानं समजायचं काय ? ( तो गप्पच आहे. त्याला नीट न्याहाळत ) तुझ्यात आज काही तरी फरक पडलेला दिसतो आहे शाम ?

**शामसुंदर :** ( बोलण्याची धडपड करीत ) त्या वेळी मी म्हटलं खरं, म्हणजे मला तसं वाटतही होतं. म्हणजे वाटणं योग्य होतं असं नाही मला म्हणायचं. पण आता... आता...आता...

**चारुशीला :** आता आता काय ? आता विचार फिरला तुझा, असंच ना ?

**शामसुंदर :** पुष्कळ व्यावहारिक अडचणी उभ्या आहेत माझ्यापुढं.

**चारुशीला :** व्यावहारिक अडचणी ?

**शामसुंदर :** हो. मला दुसरीकडं नोकरी मिळणंदेखील फार कठीण जाईल. म्हणजे कलाबिला हे सगळं ठीक आहे. पण तसं दुसरं विशेष काहीच नाही माझ्याजवळ. इथली सगळीच गोष्ट वेगळी होती.

**चारुशीला :** कालपर्यंत मोठ्या बेतांच्या वल्गना चालल्या होत्या तुझ्या, आणि आज एकदम एकाएकी हातपाय गाळायला काय झालं तुला ? ( तो गप्प राहतो. ) तुला नोकरी मिळाली नाही म्हणून काही बिघडत नाही. मी नोकरी करीन.

**शामसुंदर :** हो पण...पण...म्हणजे, जबाबदाऱ्या आहेत माझ्यावर. मनात येईल ते करून टाकायला माझा मी स्वतंत्र नाही.

**चारुशीला :** स्वतंत्र नाही ? म्हणजे ? याचा अर्थ काय ?

**शामसुंदर :** लहान भावंडं आहेत माझी त्यांचं शिक्षण व्हायचंय अजून. मी तुमच्या-बरोबर निघून गेलो तर ती उघड्यावर पडतील.

**चारुशीला :** अस्सं ! मग भावंडांना मार्गाला लावून मग या घरातून मला घेऊन

जाणार आहेस वाटतं तू ? आणि कालपर्यंत या भावंडांचा विचार बरा सुचला नाही तुला ?

**शामसुंदर :** तेच आश्चर्य आहे. नाही सुचला खरा. खरं सांगायचं तर हा सगळाच वेडेपणा झालाय !

**चारुशीला :** (धक्का बसून) वेडेपणा ? म्हणजे ? आपण प्रेम केलं एकमेकांवर—हादेखील वेडेपणा झाला असं वाटायला लागलंय का तुला ?

**शामसुंदर :** प्राप्त परिस्थितीत दुसरं काय म्हणता येईल ?

**चारुशीला :** म्हणजे ? मी नाही समजले ?

**शामसुंदर :** सारासार विचार सोडून आपण प्रेम केलं हा पहिला वेडेपणा, ते एकमेकांना बोलून दाखवलं हा दुसरा वेडेपणा आणि नुसतं बोलून थांबलो नाही हा सर्वांत मोठा वेडेपणा !

**चारुशीला :** पण प्रेमासाठी परिस्थितीची बंधनं झुगारून देणं अशक्य आहे का शाम ?

**शामसुंदर :** अशक्य नसलं तरी आवश्यक आहे असं मला वाटत नाही. समाजाला उगीचच धक्के देण्याची काही गरज आहे असं वाटत नाही मला.

**चारुशीला :** माझ्याइतक्या उत्कटतेनं तू प्रेम केलं असतंस तर तुझी भाषा बदलली असती. पण आता मला वाटायला लागलंय शाम, की तुझं खरं खरं प्रेम कधीच नव्हतं.

**शामसुंदर :** प्रेम आहे म्हणून तर या अविचारापासून मी तुम्हाला परावृत्त करतो आहे. प्रेमाला मर्यादा आहेत, तशा प्रतिभेच्या पराक्रमाला नाहीत. म्हणून तुमच्यासारख्या प्रतिभासंपन्न स्त्रीला माझ्या मोहात गुंतून पडणं योग्य होणार नाही. पण या अविचारालाच तुम्ही प्रेम म्हणत असाल तर मात्र तुमची समजूत घालणं अशक्य आहे मला.

**चारुशीला :** (संतापाने भडकून) नादान ! कृतघ्न ! विश्वासघातकी ! शरम नाही वाटत तुला असले शब्द बोलायला ? तुझ्यावरून जीव ओवाळून टाकला मी त्याचं चांगलं प्रायश्चित्त दिलंस तू मला !

**शामसुंदर :** रागावू नका. शांतपणानं विचार करा. काय मिळवणार आहोत घरातून निघून जाऊन ? अनेक माणसांची आयुष्यं बरबाद होतील, तुम्ही स्वतःला दुःखी कराल, मी दुःखी होईन आणि समाजात मात्र आपल्या दोघांची पार नाचक्की होईल !

**चारुशीला :** आता नाचक्की आठवली काय तुम्हाला ? 'अंतःकरणाच्या प्रेरणेपुढे जगाचे धरबंध तुच्छ मानणारा' त्या वेळचा तो तूच नाही का ?

**शामसुंदर :** म्हणजे... कशी काय बोलून गेलो मी ती वाक्यं याचं मलाही आश्चर्य वाटतं.

**चारुशीला :** सर्पानंतर त्याच हातांनी ईश्वरानं तुझ्यासारखा पुरुषाची जात घडवली

म्हणून धजली तुझी जीभ इतक्या मिठ्ठासपणानं बोलायला. अंगात हिम्मत नव्हती तर का माझ्या मनातलं मोहोळ डिवचलंस ! का मला आशा दाखवलीस ? कशासाठी मला अशी जीवघेणी ओढ लावलीस ? का माझ्यापुढं मोहक स्वप्नं रंगवलीस ?

**शामसुंदर :** ( प्रश्न विचारीत ती पुढेपुढे येऊ लागताच तो मागे मागे सरतो. ) मलादेखील तोच प्रश्न पडलाय; कसल्या तरी वेडानंच झपाटलं असलं पाहिजे मला. खरं म्हणजे या — या असल्या भानगडीत पडणारा मी माणूसच नव्हे !

**चारुशीला :** नीच ! कपटी ! भ्याड आहेस तू ! संसाराच्या धोपटमार्गावर सगळी वैफल्यं गिळून ओठ घट्ट मिटून मी निमूटपणे रखडत चालले होते. तू मला भुरळ पाडलीस ! तू मला पेटवलंस आणि स्वतः मात्र विझून नामानिराळा झालास. ( तिच्या डोळयांत पाणी तरळू लागते. ) केवळ्या विश्वासानं मी तुझ्या खांद्यावर मान टाकली होती. माझ्यासारख्या स्त्रीच्या प्रेमातल्या उत्कटतेची तुझ्यासारख्या पुरुषांना कधी कल्पनाच येणार नाही. तुझ्यासाठी घरदार, संसार, इतकंच काय पण अब्रूदेखील सोडून मी वेड्यासारखी धावले होते. आणि तू ? पण तुला दोष देण्यात काय अर्थ ? माझंच चुकलं. मीच वेडी होते.

**शामसुंदर :** हे हे तुम्ही जे सगळं बोललात ते कानाला मोठं छान वाटतं. पण त्याचे प्रत्यक्षातले परिणाम मात्र फार भयंकर आहेत. तुमचाच दोष आहे असं नव्हे. चूक माझी आहे. पहिल्यांदा अपराध माझ्याकडून घडला.

**चारुशीला :** ( चिडून ) अपराध तुझा आणि शिक्षा मात्र मला ! माझ्यासारख्या दुबळ्या स्त्रिया प्रेमाला धर्म मानतात म्हणून तुझ्यासारखी दुष्ट माणसं स्त्रियांचं खेळणं करतात !

**शामसुंदर :** शिक्षेचाच प्रश्न असला तर तुम्ही सांगाल ती शिक्षा भोगायला तयार आहे मी.

**चारुशीला :** पुष्कळ बोललास ! जा, चालायला लाग. तुझं तोंड पाहायची पुन्हा इच्छा नाही माझी. ( पडलेल्या मुद्रेने शाम पाठ वळवतो, काही आठवण होऊन माघारी फिरतो, तोच संतापानं चारुशीला कडाडते— ) आय से यू गेट् आउट !

**शामसुंदर :** तुमच्या इच्छेविरुद्ध क्षणभरही इथं थांबायची इच्छा नाही माझी. एक रिक्वेस्ट करायची होती. ( खिशातून एका चेकची घडी काढून तिच्या हाती देत ) एवढं हे साहेबांना परत द्या.

**चारुशीला :** ( विस्मयाने ) हे काय ? ( हातात घेते व उलगडून बघते. )

**शामसुंदर :** चेक आहे तो.

**चारुशीला :** हा ब्लँक चेक ? यांच्या सहीचा—माझ्या नावाचा— कोरा चेक ? तुझ्यापाशी कसा आला हा चेक ?

**शामसुंदर :** साहेबांनीच खुद्द जातीनं दिला माझ्या हातात.

**चारुशीला :** ( थक्क होत ) यांनी दिला ? केव्हा दिला ? कशासाठी चेक दिला ?

**शामसुंदर :** सकाळी साहेब माझ्या घरी आले आणि मला म्हणाले, "शामसुंदर, धंद्यांतले तुमचे माझे संबंध वेगळे ! पण आता चारूनं घर सोडून तुमच्याबरोबर जायचं ठरवलंय, तेव्हा..."

**चारुशीला :** ( धक्का बसून ) म्हणजे ? यांना ठाऊक आहे ? यांना समजल्या होत्या सगळ्या गोष्टी ? ( शामसुंदर मानेने होय म्हणतो. ) कोणी सांगितल्या यांना ? तू ? ( तो मानेने नाही म्हणतो. ) मग प्रियाचाच कारभार दिसतो आहे हा. ( अधीर-पणाने ) काय म्हणाले ते ? रागावले ? भडकले ? शिव्या दिल्या त्यांनी तुला आणि मला... ?

**शामसुंदर :** अं हूं. मुळीच नाही. तसला प्रकार काहीएक घडला नाही.

**चारुशीला :** ( प्रक्षोभाने ) मग काय काय म्हणाले हे सांग मला, सगळं ! काही सांग ! बोल आधी ?

**शामसुंदर :** सांगतो. मला विचारलं त्यांनी, "चारूवर प्रेम आहे तुमचं ?" मी म्हटलं, "होय" किती तरी वेळ माझ्याकडे बघतच राहिले ते. मग विचारलं त्यांनी, "तुमचं प्रेम आहे म्हणजे नक्की काय आहे ?"

**चारुशीला :** ( विस्मयाने ) मग ? तू काय– काय उत्तर दिलंस ?

**शामसुंदर :** मला वाटतं त्यावर मी पुष्कळ पुष्कळ काव्यमय् भाषेत काही तरी बोलत होतो.

**चारुशीला :** आणि मग !

**शामसुंदर :** माझं बोलणं साहेबांनी बराच वेळ ऐकून घेतलं आणि मग ते मोठ-मोठ्यानं खळखळून हसले. मग– मग, माझ्या अंगावर हा चेक टाकीत ते म्हणाले– "प्रेमातलं हे सगळं काव्य संपलं म्हणजे हा चेक तुम्हांला उपयोगी पडेल." मी नको म्हटलं. पण साहेब म्हणाले, "तुमच्यासाठी नव्हे, चारूसाठी दिलाय हा चेक. इतक्यात तिला काही सांगू नका. पण कधी तशीच पाळी आली तर हा चेक द्या आणि तिला सांगा– सांगा की– "तिच्यासाठी माझ्या घरांची दारं सदैव उघडी आहेत !" एवढं सांगून साहेब निघून गेले !

**चारुशीला :** ( स्तंभित होऊन ) जास्त काही एक बोलले नाहीत ? शिव्या दिल्या नाहीत ? रागावलेसुद्धा नाहीत ? ( तो मानेने नाही म्हणतो. ) आणि हे– हे सगळं तू मला आता सांगतो आहेस ? ( डोळे विस्फारून बघू लागते. शामसुंदर जाण्यासाठी धीम्या पावलाने वळतो तोच पुन्हा आठवण होऊन मागे वळत )

**शामसुंदर :** आणखी—

**चारुशीला :** आता आणखी काय राहिलं ? आणखी कोणता धक्का द्यायचा बाकी उरलाय ?

**शामसुंदर :** इट्स रिअली व्हेरी सॅड, आणि सरप्रायझिंग ईव्हन टु मी ! म्हणजे माझ्या हातून कधीकाळी अशा गोष्टी घडतील याची मला कल्पनादेखील नव्हती. साहेबांची

एका बाबतीत मात्र क्षमा मागायची आहे मला.

**चारुशीला :** म्हणजे ? आणखी काय घडलं तुझ्या हातून ?

**शामसुंदर :** कारखान्यातल्या कामगारांच्या उठावाबाबत... ( घुटमळतो. )

**चारुशीला :** कामगारांच्या उठावाबाबत काय ?

**शामसुंदर :** किसनला चिथावणी मी... मीच दिली होती.

**चारुशीला :** ( धक्का बसून ) काय ? तू ? तू ? किसनला चिथावणी... छे ! मला खरं वाटत नाही...

**शामसुंदर :** कसल्या तरी वेडाचा संचार झाला म्हणजे... खरं न वाटण्यासारखाच आहे तो प्रकार, पण– कसल्या तरी वेडानं झपाटल्यावर खरी न वाटण्यासारखी कृत्यं-देखील सहजगत्या माणसाच्या हातून घडून जातात.

**चारुशीला :** ( क्षणार्ध त्याच्याकडे बघते आणि मग प्रक्षोभ आवरीत ) हे म्हणाले ते खरं होतं तर ! आता मात्र तुझ्यावर प्रेम केल्याबद्दल खरोखरच पश्चात्ताप होतोय मला.

[ चारुशीला सुन्नपणे धाड्कन् कोचावर अंग टाकते. शामसुंदर कपाळाला बोट लावीत ' नशीब माझं ' असे आविर्भावाने सुचवीत धीम्या पावलाने निघून जातो. काही वेळाने चारुशीला कसल्या तरी निश्चयाने उठते आणि टेबलावरील पर्स उचलून बाहेर जाण्यासाठी निघते. तोच बाहेरून तावातावाने बोलत प्रियदर्शन आणि त्याच्या दंडाला धरून नंदिनी प्रवेशतात. आणि— ]

**नंदिनी :** अहो माझं ऐका...अहो, माझं ऐका जरा !

**प्रियदर्शन :** कोणाचं काहीएक ऐकायचं नाही मला. तूदेखील त्यातलीच. कुठं आहेत भाऊ ? धनंजय कुठं आहेत ? ब्रह्मदेव, महादेव कुठं दडून बसली आहेत समस्त देवमंडळी ?

**चारुशीला :** कशाला हवी आहेत तुला ही मंडळी ? आणि घरात पाऊल ठेवलं नाहीस तोच एकदम असं हमरीतुमरीवर यायला रे काय झालं प्रिया ?

**नंदिनी :** बघा तर खरं चारुताई ! येताना सबंध रस्ताभर अस्सा धिंगाणा चालला होता यांचा.

**प्रियदर्शन :** जाब विचारायचा आहे मला सगळ्यांना ! पाताळात जाऊन लपून बसले असले तरी आता तिथं जाऊन एकेकाला खेचून आणल्याखेरीज राहणार नाही मी आज !

**नंदिनी :** हो, हो, जाल तर काय झालं ! वेडाच्या भरात पाताळ धुंडाळायलादेखील कमी करणार नाही तुम्ही.

**प्रियदर्शन :** शट् अप ! इतक्यात इथून मदन गेल्यासारखा दिसला मला. काय म्हणत होता मदन ? अजून त्याचं शरसंधान संपलेलं दिसत नाही. त्याच्याच मागं निघाली होतीस वाटतं चारू.

**चारुशीला :** मदन ? प्रिया, अरे शामसुन्दर होता तो.

**प्रियदर्शन** : गेट बॅक ! मागं फीर ! तुला शामसुंदरचा भास झाला असला तरी मदनाला मी पुरेपूर ओळखतो. मदनाच्या जाळ्यात मी तुला सापडू देणार नाही. हो मागं ! जायचं नाही इथून कुठं !

**नंदिनी** : काय सांगू तुम्हाला चारुताई ! मलादेखील म्हणायला लागले आहेत हो हे की तू विद्युल्लता आहेस, स्वर्गातली अप्सरा आहेस, आणि देवांची पंचमस्तंभी कारवाई करण्यासाठी तू माझ्याशी लग्न केलं आहेस !

**प्रियदर्शन** : हो, मग ! अजूनसुद्धा म्हणतो !

**चारुशीला** : खुळा आहेस झालं तू प्रिया !

**प्रियदर्शन** : ( रागाने ) मी खुळा ! मी वेडा ! मी माथेफिरू ! आणि तुम्ही सगळे मात्र शहाणपणाचे मेरुमणी आहात, नव्हे का ? प्रतिभासंपन्न माणसांना क्षुद्र मोहात सापडायचा अधिकार नाही असा इशारा देणारा प्रियदर्शन वेडा; आणि स्वतःचा संसार सोडून शामसुन्दरच्या मोहात पडणारी चारुशीला मात्र शहाणी, होय ना ? एका उद्दाम अहंकाराच्या पायी तुमची सगळी कर्तबगारी मातीमोल होईल असं बजावणारा प्रियदर्शन खुळा; आणि अविचारानं कामगारांच्या मागण्या धुडकावून लावून सर्वनाश ओढवून घेणारे धनंजय मात्र फार समंजस, नाही का ? सत्तेच्या सिंहासनावर साधुत्व जरी आरूढ झालं तरी अखेर पिसं झडत जाणार साधुत्वाचीच, असं जीव तोडून सांगणारा प्रियदर्शन माथेफिरू; आणि अन्तःप्रेरणेशी प्रतारणा करून मुख्यमंत्रीपद स्वीकारणारे भाऊ मात्र अत्यंत विचारी पुरुष, असंच ना ? तुम्ही शहाणी म्हणवणारी माणसंच शहाणपणाला पारखी झाला आहात, समजलात ! आता माझी पक्की खात्री झालीय की मानवाचा ऱ्हास झाला असेल तर त्याला दैवी शक्तींच्या दुष्टाव्यापेक्षा माणसांचा मूर्खपणाच जास्त कारण झाला आहे. देवांनी माणसाच्या डोळ्याला झापडं लावली तरी भगवंतांनी माणसाला दृष्टिदेखील दिलेली आहे. पण दृष्टी सोडून डोळ्यांच्या झापडांवरच प्रेम करणारी जनावरं झालो आहोत आपण, चारू !

[ तोच माडीवरून डॉक्टर भगवंतराव पाठोपाठ धनंजय आणि हरिभाऊ, आणि सर्वांत शेवटी काकासाहेब आणि योगीराज प्रवेशतात.]

**डॉक्टर** : ठरलं तर मग ?

**हरिभाऊ** : ठरलं.

**धनंजय** : ठरलं, मान्य आहे मला हा तडजोडीचा मसुदा.

**हरिभाऊ** : चला धनंजय, आता आपण ताबडतोब कामगारपुढाऱ्यांची बैठक बोलावू आणि हे प्रकरण एकदा कायमचं मिटवून टाकू. डॉक्टर, तुम्हीदेखील चला या बैठकीला.

**डॉक्टर** : छे छे, माझ्या येण्याची आता काही गरज उरली नाही हरिभाऊ ! सगळं काही सुरळीत होईल. पाहिलंत काकासाहेब, किती थोडक्यात हा–हा गुंता सुटला ?

**योगीराज :** सुटला नव्हे डॉक्टर, तुम्ही सोडवलात...काय काकासाहेब ?

**काकासाहेब :** तर काय, नाही तर ही सगळी माणसं या गुंत्यातच पार लडबडून गेली असती.

**हरिभाऊ :** खरं आहे काकासाहेब, इतकी वर्षं मी राजकारणात काढली, पण पेच-प्रसंगांना तोंड देण्याची एक नवी दृष्टी दिलीत डॉक्टर तुम्ही आज मला.

**डॉक्टर :** छे छे, हा तुमचा विनय आहे हरिभाऊ ! मी काहीएक केलं नाही. काकासाहेब, योगीराज, मी पुन्हा सांगतो, इच्छा असली म्हणजे मार्ग सापडतात; आणि सद्भावनेला आवाहन केलं म्हणजे सगळ्यांच्या समजुती पटतात.

**धनंजय :** चला हरिभाऊ. काही अनर्थ घडायच्या आधी कारखान्यापाशी पोचलं पाहिजे आपल्याला.

**प्रियदर्शन :** ( पुढे येऊन वाट अडवीत ) थांबा ! एक पाऊल उचलू नका. यत्किंचित कोणी हालचाल केली तर माझ्याशी गाठ आहे. याद राखा, मी लष्करी माणूस आहे. अवज्ञा झालेली मला बिलकुल खपणार नाही.

**हरिभाऊ :** प्रिया, अरे तू केव्हा आलास ? प्रकृती बरी नसताना कुठं कुठं हिंडत असतोस तू हल्ली ?

**प्रियदर्शन :** दूर व्हा ! लांब उभे राहा ! या क्षणाला वडील म्हणून नव्हे तर एक ' मानव ' म्हणून मी तुमच्याकडे पाहतो आहे. प्रश्न माझ्या तब्येतीचा नसून तुम्हा सर्वांच्या आध्यात्मिक प्रकृतीचा आहे, समजलात ? सगळ्यांच्या प्रकृती मी आज ठीक करणार आहे. महादेव आणि ब्रह्मदेवदेखील इथंच सापडले हे फार छान झालं. देवाधिदेवा, आपण बाजूला व्हा !

**नंदिनी :** बाई बाई बाई ! यांच्याशी कसं बोलावं अन् काय करावं हेच समजेनासं झालंय मला !

**धनंजय :** अरे— म्हणजे विचार काय आहे तुझा प्रिया !

**चारुशीला :** घरात पाऊल ठेवल्यापासून अस्सा आरडाओरडा चालवलाय त्यानं !

**काकासाहेब :** विचार कसला करता धनंजय— वेड लागलंय या माणसाला. स्वतःला सांभाळा !

**योगीराज :** माझं म्हणणं आहे की ताबडतोब वेड्याच्या इस्पितळात रवानगी करायला हवी याची. नाही तर आपल्यावर हल्लादेखील करायला कमी करायचा नाही हा इसम, हरिभाऊ !

**प्रियदर्शन :** ( अस्तन्या सरसावीत ) वेड्याच्या इस्पितळात माझी रवानगी करता काय ? पण त्याच्या अगोदर तुम्हा देवांची देईन स्वर्गात रवानगी करून, आहात कुठं ? तुम्ही देव असलात तर आपल्या स्वर्गात. हा मृत्युलोक आहे मृत्युलोक, समजलात बच्चंजी ? स्वर्गाचे कायदेकानू इथं लागू नाहीत मेहेरबान !

**काकासाहेब :** ( डॉक्टरांच्या मागे काकासाहेब आणि योगीराज आसरा घेतात. )

धनंजय, हरिभाऊ, अरे कोणी आवरा...

**हरिभाऊ :** प्रिया प्रिया, बेटा शांत हो...

**धनंजय :** जवळ नका जाऊ एकदम हरिभाऊ त्याच्या—

**प्रियदर्शन :** शांततेचा काळ संपला आता. भाऊ, धनंजय, माझ्या शांततेचा तुम्ही अंत पाहिलात. गोडीगुलाबीनं विश्वरहस्याचा स्वीकार कराल या आशेनं वाट पाहिली मी इतके दिवस. पण सक्ती केल्याशिवाय तुम्ही माणसं वठणीवर येणार नाहीत याची खात्री पटलीय मला. आता मुकाट्यानं विश्वरहस्याचा स्वीकार करणार आहात की...

**डॉक्टर :** प्रियदर्शन—

**प्रियदर्शन :** ( चमकून ) देवाधिदेवा—( दोघे एकमेकांच्या दृष्टीत रोखून बघतात.)

**हरिभाऊ :** देवाधिदेवा ! काय करावं या पोराला ? प्रिया, अरे—

**डॉक्टर :** थांबा हरिभाऊ ! पेशंटशी कसं बोलावं हे समजत नाही तुम्हाला अजून ! प्रियदर्शनाची समजूत घालण्याचं काम तुम्ही आता माझ्यावर सोपवा.

**प्रियदर्शन :** समजूत ? कसली समजूत ? कोणाची समजूत ? माझी समजूत घालायची आता कोणालाही जरूर नाही. सगळ्या गोष्टींचा मला अगदी स्पष्ट उलगडा झालाय. विश्वरहस्याचा स्वीकार केल्याखेरीज आता कोणाची सुटका नाही ! दिवाणखान्यातून पाऊल बाहेर टाकू देणार नाही मी आज कोणाला ! दात काढून फिदीफिदी हसायला विश्वरहस्य म्हणजे काय चेष्टा वाटली होय तुम्हाला ?

**धनंजय :** ( हसू आवरीत ) अरे पण विश्वरहस्याचा स्वीकार करायचा म्हणजे काय करायचं ? तुला सगळ्यांनी साष्टांग नमस्कार घालायचा, की कोणत्या करारावर सह्या करायच्या, की...

**डॉक्टर :** तुम्ही मध्ये बोलू नका धनंजय. प्रिया, माझ्या शब्दावर विश्वास आहे की नाही तुझा ?

**प्रियदर्शन :** तुमच्या शब्दावर ? ( क्षणभर रोखून पाहात ) होय. तुम्ही देवांचे पक्षपाती झाला असलात तरी तुमच्या शब्दावर विश्वास ठेवणं मला भाग आहे.

**डॉक्टर :** ( जवळ जाऊन त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत ) तर मग या मंडळीची वाट सोड. मी सांगतो म्हणून त्यांना जाऊ दे.

**प्रियदर्शन :** या या सगळ्यांना सोडून देऊ ! म्हणजे काय सांगताहात आपण देवाधिदेवा ?

**डॉक्टर :** अशाच एका प्रसंगी मी तुझी सुटका केली होती ते विसरलास तू ?

**प्रियदर्शन :** छे छे, तो प्रसंग विसरणं कसं शक्य आहे देवाधिदेवा ?

**डॉक्टर :** मग माझं ऐक. जाऊ दे या सर्वांना. ( प्रियदर्शन नाइलाजानं वाटेतून दूर होतो. हरिभाऊ जातात. त्यांच्या पाठोपाठ योगीराज आणि काकासाहेबदेखील सटकतात. धनंजय जाता जाता थबकून— )

**धनंजय :** अरेच्या ! म्हणजे कमाल झाली ! तुमच्या शब्दानं याचा पारा उतरला

की डॉक्टर ! मानसोपचारातील एक एक इलाज म्हणजे चमत्कारच आहे म्हणायचा ! ( डॉक्टर स्मित करतात तोच चारुशीला पुढे येते. तिला पाहून ) चारू, तू अजून इथंच ?

**चारुशीला** : ( चेक परत करीत ) हो. हा घ्या. साभार परत !

**धनंजय** : म्हणजे तुला कसा मिळाला हा चेक ? शामसुंदरना तर मी बजावलं होतं की —

**चारुशीला** : होय. पण या चेकची काही गरज उरली नाही. तेव्हा—

**धनंजय** : गरज नाही उरली ? म्हणजे ? मी नाही समजलो याचा अर्थ—

**चारुशीला** : सवड झाली तुम्हाला म्हणजे खुलासा करीन मी सगळ्या गोष्टींचा.

**धनंजय** : सगळ्या गोष्टींच्या खुलाशाची काही जरुरी नाही. पण तू....... तुमचा बेत ?

**चारुशीला** : रद्द झाला.

**धनंजय** : तात्पुरता ?

**चारुशीला** : नव्हे कायमचा !

**धनंजय** : असं असं. (जाऊ लागतात. पण दारापर्यंत जाऊन परत फिरतात आणि–) खरंच ?

**चारुशीला** : होय, अगदी खरं ! का ?

**धनंजय** : हातपाय पोळल्याखेरीज असल्या वेडाचा झटका ओसरत नाही असा माझा समज होता.

**चारुशीला** : झटका ओसरण्याइतके हातपाय पोळले आहेत माझे, आणि— ( घुटमळते. )

**धनंजय** : आणि काय ?

**चारुशीला** : आणि... आणि... आणि काही नाही !

**धनंजय** : ( चकित होतात. क्षणार्धाने एकदम खुशीत येऊन ) आज किती आनंद झालाय म्हणून तुला सांगू चारू !

**चारुशीला** : खरंच ? किती झालाय ?

**धनंजय** : कारखान्यात बंद पडलेलं यंत्र एकदम चालू झाल्यावर जसा ब्रह्मानंद होतो ना, अगदी तस्सा ! ( असे म्हणून ते बाहेर जातात. )

**चारुशीला** : ( हसत ) कारखाना ! कारखाना ! कारखाना ! ( धनंजयांच्या पाठोपाठ जाते. )

**नंदिनी** : जन्मात कधी सरळपणानं यांनी कोणाचं ऐकलं असेल तर डॉक्टर आज पहिल्यांदा तुमचंच.

**डॉक्टर** : ( तीव्रतेने तिला न्याहाळत ) ते मला ठाऊक आहे !

**नंदिनी** : ( चमकून पुन्हा सावरीत ) आता तुमच्यावरच माझी सगळी भिस्त आहे

डॉक्टर! ( प्रियदर्शन रागानं तिला आपल्या दालनाकडे बोट दाखवतो. नंदिनी डॉक्टरांच्या मुद्रेकडे साभिप्राय बघू लागते. )

**डॉक्टर** : जा ! विद्युल्लते तूही निघून गेलीस तरी चालेल ! इथलं काम संपलं आहे !

[ नंदिनी अभिवादन करून आत जाते; तोच रंगभूमी स्वर्गाच्या प्रकाशरंगात उजळते आणि– ]

**भगवंत** : ( स्मित करीत ) प्रिया, विश्वरहस्याचा प्रसार करण्यासाठी केवढा हा खटाटोप ! काय हा गदारोळ ! काळाचा आणि शक्तीचा हा अपव्यय !

**प्रियदर्शन** : माणसासारख्या मठ्ठ प्राण्याला जागा करणं म्हणजे महादुष्कर कर्म आहे देवाधिदेवा. मी तर हात टेकले आहेत भल्याभल्यांचा अडाणीपणा पाहून !

**भगवंत** : ( हसून ) तुझा उत्साह मावळलेला दिसतोय एकूण ! उतावळेपणाचा परिणाम असाच व्हायचा !

**प्रियदर्शन** : उतावळेपणा ? कोणता उतावळेपणा घडला माझ्या हातून देवाधिदेवा ?

**भगवंत** : प्रिया, अरे सक्ती करून मानवी मनाला सत्याचा बोध कधी तरी होईल का ?

**प्रियदर्शन** : देवाधिदेवा, समजूत पटत नसेल तर अंतिम हिताच्या हेतूनं सक्ती केली म्हणून बिघडलं कुठं ?

**भगवंत** : मानवी मनाची ठेवणच अजून तू पुरती ओळखलेली नाहीस. प्रिया, अरे वेलीवर डोलणाऱ्या कळीच्या सगळ्या पाकळ्या, बोटाने उलगडून कधी फूल फुलवता येईल का ? मानवी मनात विश्वरहस्याची जाणीव फुलासारखी सहजगत्या उमलावी तेव्हा कुठं मानव पूर्णतेला पोचतो. सत्य उमलायलादेखील आवश्यक तो अवधी दिलाच पाहिजे !

**प्रियदर्शन** : तुम्ही म्हणता ते खरं आहे. पण देवाधिदेवा, मानवी मनात विश्वरहस्याचा उमज सहजगत्या पडेल म्हणून वाट पाहायचं ठरवलं तर युगानुयुगे नुसती वाटच पाहात बसावं लागेल !

**भगवंत** : आणि लोकांना नको असलेलं सत्य त्याच्यावर सक्तीनं लादण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याला अखेर वेड्यांच्या इस्पितळात जाऊन बसावं लागेल. विश्वरहस्याच्या प्रसारापायी उरलेला जन्म वेड्याच्या इस्पितळात काढायची तुझी तयारी आहे का प्रिया ?

**प्रियदर्शन** : ( धक्का बसून ) काय म्हणालात ? वेड्याच्या इस्पितळात ?

**भगवंत** : होय. माझ्यामुळं तुझ्यावरचा आजचा प्रसंग टळला. पण उद्यांची मात्र मी खात्री देऊ शकत नाही.

**प्रियदर्शन** : ( हताशपणे ) तर मग या विश्वरहस्याला, माणसाच्या चांगुलपणाला, साधुत्वाला आणि पूर्णतेलादेखील काहीएक अर्थ उरला नाही म्हणायचा ?

**भगवंत** : पण सबंध मानवजातीला एका रात्रीत पूर्णतेला नेण्याचा हा हट्ट कशासाठी ?

**प्रियदर्शन** : कशासाठी ते उघड आहे. ही विश्वमाला वसाहतीसाठी मानवाला खुली

व्हावी, देवाच्याप्रमाणं मानवालाही अमरत्वाची आणि चिरतारुण्याची संजीवनी प्राप्त व्हावी यासाठी.

**भगवंत** : ( हसून ) वेडा आहेस तू प्रिया ! अरे साधुत्वाचा कधी सौदा करता येतो का ? पूर्णतेला पोचलेल्या मानवाला, सर्व सुखांच्या ऋद्धिसिद्धी प्राप्त व्हाव्या यात न्याय आहे. कधीकाळी हा न्याय या सबंध विश्वमालेत प्रस्थापित होईलदेखील. पण तरी-सुद्धा साधुत्वाची साधना फक्त साधुत्वासाठीच होऊ शकते. त्यात असल्या न्यायाची देखील अपेक्षा नाही.

**प्रियदर्शन** : ( चकित होऊन ) साधुत्वाची साधना— फक्त साधुत्वासाठीच ! पण देवाधिदेवा, विश्वरहस्याच्या बाराव्या सर्गात तर आपण—

**भगवंत** : ( हसून ) ज्यानं तुला विश्वरहस्य सांगितलं त्यानं फक्त शब्द तेवढे तुझ्या पदरात टाकले. विश्वरहस्याचा गाभा तुझ्या हाती कधीच लागू दिला नाही.

**प्रियदर्शन** : देवाधिदेवा,असं कसं होईल ? मानवाच्या उद्धाराची कळकळ बाळगणाऱ्या एका महात्म्यानं मुद्दाम मला स्वर्गात नेऊन हे विश्वरहस्य माझ्या हातात दिलं होतं.

**भगवंत** : मानवाच्या उद्धाराची इतकी कळकळ बाळगणारा दुसरा आहे तरी कोण हा ? महात्मा ?

[ तोच चिपळ्या वाजतात. तंबोरीच्या तारा किणकिणतात. आणि तोच ' नारायण...नारायण ' असे उच्चारीत व्हरांड्यातून नारदमुनी प्रवेशतात.]

कोण नारदा ? तू ? या वेळी इथं कसा ?

**नारद** : नारायण...नारायण... भगवंता, आपल्या प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी आलोय मी !

**भगवंत** : म्हणजे ?

**नारद** : देवाधिदेवा, प्रियदर्शनच्या हातात विश्वरहस्य देणारा दुसरा तिसरा कोणी नसून मी आहे.

**भगवंत** : तू ? तू ? नारदा, तू हे विश्वरहस्य याला दिलंस ? स्वर्गात नेऊन दिलंस ?

**नारद** : नारायण ! नारायण !

**भगवंत** : पण कशासाठी ? का ? का म्हणून तू ही कळ लावलीस ?

**नारद** : आपल्या मनोराज्यातून आपल्याला जागं करण्यासाठी.

**भगवंत** : मनोराज्यातून ? कोणत्या मनोराज्यातून ?

**नारद** : मृत्युलोकावर चाललेल्या या प्रयोगाबद्दलच्या मनोराज्यातून.

**भगवंत** : म्हणजे ?

**नारद** : भगवंत, आपण एकटेच एका गोड मनोराज्यात धुंद होता तेव्हा म्हटलं एकदा तरी मृत्युलोकचा फेरफटका करायला आपल्याला भाग पाडावं.
आणि वस्तुस्थिती दाखवावी तसे नुसते आपण कसे याल ! म्हणून हे विश्वरहस्य या अति उत्साही,पोराच्या हाती मी दिलं आणि देवांची धावपळ घडवली. तसदीबद्दल क्षमा

करावी देवाधिदेवा. पण आता तरी खात्री पटली ना ? आता तरी आपला संपूर्ण भ्रमनिरास झाला ना ?

**भगवंत** : कसली खात्री ? कोणता भ्रमनिरास, नारदा ?

**नारद** : महामृत्यूच्या कक्षेत घिरट्या घालणारी ही विश्वमाला, आंधळ्या दैवी शक्तीचे निरुत्साही कर्तृत्व आणि धड पशू नव्हे आणि धड देवही नव्हे अशा अवस्थेत युगानुयुगे घोटाळत पडलेला दुबळा मानव — असला महायोग जमल्यावर जीवसृष्टीचं आपलं सुंदर स्वप्न उद्ध्वस्त झालं आणि मानवी जीवनाच्या आपल्या भव्योदात्त कल्पनेची धिंड निघाली तर त्यात काय आश्चर्य ? देवाधिदेवा, क्षमा करा. पण मृत्युलोकावर चाललेला हा प्रयोग पूर्णपणे फसला आहे.

**भगवंत** : नारदा, तुलादेखील असं वाटतं ?

**नारद** : हा कोणाच्याही वाटण्याचा प्रश्नच नाही. तुमचा अनुभव तुम्हाला काय सांगतो आहे भगवंता ? या कुटुंबातल्या माणसांना या घडीला घडणाऱ्या अनर्थापासून तुम्ही वाचवलंत. पण कोट्यवधी मानवांनी आपल्या मूर्खपणानं स्वतःवर घेतलेल्या शेकडो प्रकारच्या संकटांना आपण कुठं कुठं म्हणून सावरणार ?

**भगवंत** : ( भगवंतांच्या डोळ्यांत अश्रू येतात. गहिवरून ) खरं आहे नारदा, तू म्हणतोस ते खरं आहे. माझा प्रयोग फसला आहे. नुसता प्रयोगच फसला असं नव्हे, तर मातीतून जन्माला आलेल्या माणसातून थोर वैष्णव निर्माण करण्याचं माझं सुंदर स्वप्नदेखील भंगलेलं आहे !

**नारद** : ( विस्मयाने ) देवाधिदेवा, आपल्या डोळ्यांत अश्रू ! काय पाहतो आहे मी हे भगवंता ?

**भगवंत** : नारदा, माझ्या डोळ्यांतल्या अश्रूंचा अर्थ कळायला माझ्यासारखी सुंदर स्वप्ने पाहावी लागतात आणि पाहिलेली स्वप्नं उद्ध्वस्त होण्याचा अनुभव घ्यावा लागतो ! ( क्षणार्धाने स्वतःचा तोल सावरीत ) ठीक आहे. झालं ते झालं ! आता पुन्हा एकदा नव्यानं या सगळ्यांचा प्रारंभ करायला हवा ! चल नारदा—

**नारद** : ( विस्मयाने ) म्हणजे ? देवाधिदेवा, याचा अर्थ आपण—

**भगवंत** : ( हसून ) अर्थ स्पष्ट आहे ! काळ अनंत आहे; विश्वमाला अमर्याद आहे; आणि प्रयोग करण्याची माझी उमेद अजून मावळलेली नाही. चला जाऊ या आपण स्वर्गात.

[ भगवंत जाऊ लागतात, तोच प्रियदर्शन पुढे होऊन अधीरपणाने विचारतो— ]

**प्रियदर्शन** : देवाधिदेवा, विश्वमालेमध्ये दुसऱ्या एखाद्या ग्रहावर आपला प्रयोग यशस्वी होईलदेखील. पण मग या पृथ्वीतलावरल्या आम्हा मानवांचं भवितव्य काय ? हा जीवसृष्टीचा प्रयोग असाच अर्धवट खितपत पडणार काय ?

**भगवंत** : ( मागे वळतात आणि स्मित करून ) धीर धर ! धीर धर ! वाट पाहा !

( भगवंत जातात. )

**नारद :** ( भगवंत गेलेल्या दिशेकडे खिन्नतेने बघत, हसून ) नारायण ! नारायण ! देवाधिदेवा, या मनोराज्यातून आपण केव्हा जागे होणार ?

[ नारदमुनी निघून जातात. प्रियदर्शन दिङ्मूढपणे तसाच उभा आहे. हळूहळू समोरचे आकाश तारकांनी उजळते. रंगभूमीवर प्रकाश अंधुक होत जातो. " मनोराज्य...देवांचं मनोराज्य..." असे पुटपुटत प्रियदर्शन भयाण प्रत्ययाने स्वतःशीच विषण्णतेने हसतो. तोच नंदिनी डोकावते— ]

**नंदिनी :** ( दारातून डोकावत ) गेले डॉक्टर ?

**प्रियदर्शन :** ऊं ? हो, गेले.

**नंदिनी :** खरंच किती थकून गेला आहात तुम्ही दिवसभरच्या श्रमानं ! झोप नाही का आली अजून ? ( असे म्हणत प्रेमाने त्याच्याजवळ जाते. )

**प्रियदर्शन :** झोप ? छे, आता मला जाग आली आहे ! खरी खरी जाग !

**नंदिनी :** जाग ?

**प्रियदर्शन :** ( व्हरांड्याकडे जात ) होय ! आता मला कधीही स्वप्नं पडणार नाहीत ! पुन्हा मला कसले भास होणार नाहीत. कोणत्याही मनोराज्यात यापुढं मी धुंद होणार नाही !

[ व्हरांड्यात खांबाला टेकून प्रियदर्शन आकाशाकडे बघत पाठमोरा उभा आहे. आकाशात लुकलुकणारे ग्रहगोल बघता बघता त्याला देवांचे...

" असतो मा सत् गमय ।
तमसो मा ज्योतिर्गमय ।
मृत्योर्मा अमृतं गमय..."

हे प्रार्थनागायन दूरवरून पुन्हा एकदा ऐकू येऊ लागते आणि क्षणार्धातच— ]

पडदा

IRBK-0120591

IRBK-0120591

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. 20409 नों. दि. 2/99/08
वि. 3/126 क्र.